# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि.१९/४/२००३

आज दि.२०/४/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा महापालिकेच्या सभागृहात मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंडोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री.सय्यद मुझफ्फर हुसेन | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती |
| ४) | श्री.ध्रुवकिशोर मनसाराम पाटील | सभागृह नेता |
| ५) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ६) | श्री. बोर्जीस हेरल जॉर्ज | गटनेता |
| ७) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ८) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ९) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १०) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ११) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १२) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १३) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १४) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १५) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १६) | श्री.अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १७) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १८) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १९) | श्रीम. गोहिल शानू | सदस्या |
| २०) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २१) | श्री. पाटील रोहिदास शंकर | गटनेता |
| २२) | श्रीम.पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २३) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २४) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २५) | श्री.हंसू कमलकुमार पांडे | सदस्य |
| २६) | श्रीम.सुनिता कैलास पाटील | सदस्या |
| २७) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २८) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २९) | श्रीम. सावळे निर्मला बाबुराव | सदस्या |
| ३०) | श्री.रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ३१) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३२) | श्रीम. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३३) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३४) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३५) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३७) | श्रीम.जयाबाई यशवंत भोईर | सदस्या |
| ३८) | श्री. पटेल आसिफ गुलाब | सदस्य |
| ३९) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |
| ४०) | श्री.वैती चंद्रकांत सिताराम | गटनेता |
| ४१) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४२) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४३) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४४) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४५) | श्री. मेंडोसा स्टीवन जॉन | सदस्य |
| ४६) | श्री. पाटील रोहीदास आत्माराम | सदस्य |
| ४७) | श्री. कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ४८) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४९) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ५०) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सदस्या |
| ५१) | श्रीम.भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ५२) | श्री. घोन्सालविस जोजफ जॉन | सदस्य |
| ५३) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५४) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५५) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५६) | श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ५७) | श्री.शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ५८) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५९) | श्री.चौहान महेंद्रसिंग | सदस्य |
| ६०) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६१) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६२) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६३) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६४) | श्री.भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ६५) | श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण | सदस्या |
| ६६) | श्री.पाटील परशूराम दामोदर | सदस्य |
| ६७) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ६८) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६९) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ७०) | श्री.म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ७१) | श्रीम.जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७२) | श्री.शहा रक्षा एस. | सदस्या |
| ७३) | श्री.मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ७४) | श्री.जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ७५) | श्री. ठाकुर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | श्री. सुवर्णा रोहीत मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | श्री. परेरा टेरी पॉल | नामनिर्देशित सदस्य |

**<u>अनुपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील अशोक बळवंत | गटनेता |
| २) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |

**<u>रजेचे अर्ज आलेले सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४) | श्री. पांगे संजय | नामनिर्देशित सदस्य |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा.महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, मा. उपमहापौर , विरोधी पक्षनेते, उपस्थित सर्व सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी वर्ग, पत्रकार बंधू आणि नागरीक आपले सर्वांचे स्वागत. विषय पत्रिकेनुसार आरोग्य, वैद्यकीय सेवा नालेसफाई, प्रभाग निहाय साफसफाई या महत्वाच्या विषयावर चर्चा करून निर्णय घेऊन आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाल अशी आशा बाळगते. सर्व शहरवासीयांना इस्टर सणाच्या हार्दिक शुभेच्छा ! मा. सचिवांनी सभेचे कामकाज सुरू करावे. तत्पुर्वी महत्वाचे म्हणजे मी यापुर्वी विरोधी पक्षनेत्यांच्या नेमणूकीचा निर्णय दिला होता. तो आता मा. हायकोर्टाने उचलून धरला आहे त्यामुळे मी श्री. परशुराम पाटील यांना विरोधी पक्षनेतेपदी कायम करीत आहे. व त्यांचे व त्यांच्या पक्षाचे हार्दीक अभिनंदन करते. धन्यवाद !

**रक्षा शहा :-**

मा. महापौरांच्या आदेशाने मला सभागृहात पाच मिनीटे बोलण्याची परवानगी द्यावी.

**प्र. सचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात होते.

**रक्षा शहा :-**

मला सभागृहात माझ्या प्रश्नाचे उत्तर पाहिजे.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराचा तास सुरु होतोय. प्रश्नोत्तराच्या तासानंतर तुम्हाला काय बोलायचे ते बोला.

**प्र सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने महासभा सुचना क्र. १ दि. १९/०४/२००३ रोजीची विषयपत्रिका प्रश्नात्तराचा तास आहे. ११.३५ वाजता सुरू झालेला आहे. १२.०५ वाजता त्याची वेळ संपेल मागील सभेतील प्रश्नोत्तराच्या तासापैकी ब भागातील प्रश्न बाकी होता. प्रश्न क्र. १ ओमप्रकाश अग्रवाल यांनी विचारलेला प्रश्न आहे त्यांना प्रश्नाचे लेखी उत्तर दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेबा मी जो प्रश्न विचारलेला आहे. त्याचे जे उत्तर दिलेले आहे. त्या प्रश्नाच्या पुरक म्हणून दोनतीन प्रश्न विचारतोय. सर्व प्रथम मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीच्या खाली जो मासळी बाजार आहे. त्याबाबतीत त्याचे भुईभाडे ज्या ठिकाणी ते मच्छिमार विक्रेते बसतात त्याची वसुली महापालिका करते की खाजगी बाजार लिलाव घेतोय तो करतोय त्याचा रितसर खुलासा झालेला नाही. दुसरी गोष्ट मला महापालिकेने उत्तर देताना ९२ गाळयांची यादी दिलेली आहे. आणि त्यांचे भाडेही दिलेले आहे. २०० ते २५० रूपये प्रत्येकाचे भाडे असल्याची त्यामध्ये नोंद केलेली आहे. ते भाडे मासिक आहे. कि वार्षिक आहे म्हणजे एका गाळयाला १९२ रू. किंवा ३०० रू. आहे ते मासिक आहे कि वार्षिक आहे. याचाही उल्लेख मला दिलेल्या उत्तरांत नाही आहे. ह्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे मला मिळाली तर पुढचे मी पुर्ण करणार आहे.

**विजय पाटील :-**

जुनी इमारत जी आहे. नगरपालिकेची त्याच्या खाली जो बाजार भरला जातो त्याची बाजारवसूली जी आहे. ती ठेकेदार करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याची प्रोसीडींगमध्ये नोंद करून घ्यावी. तुम्ही दिलेले भुईभाडे मासिक आहे की वार्षिक आहे.

**विजय पाटील :-**

ते भाडे वार्षिक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे एका वर्षाचे १९२ रूपये.

**विजय पाटील :-**

हो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम साहेब, म्हणजे ग्रामपंचायत त्यानंतर नगरपालिका, आज महापालिका एक साधारण माणूस रस्त्यावर बसतोय त्याच्या कडून ठेकेदार दहा ते वीस रूपये प्रत्येक दिवशी घेतो आणि एक पक्का गाला जो महापालिकेच्या उत्पन्नाचा मोठा स्त्रोत आहे. वर्षाचे फक्त १९२ रूपये म्हणजे महिना १५ रू. भाडे म्हणजे किती हलगर्जीपणा या सभागृहामध्ये म्हणजे या महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून चालत आहे. याची आपण नोंद घ्यावी आपण ज्या ठेकेदाराला बाजार लिलाव देतो त्यामध्ये बाजार रस्त्यावर त्याच्यावर नोंद केलेली आहे की हेहे रस्ते या ठिकाणी तो वसुल करणार आहे. त्यामध्ये महापालिकेच्या वास्तुमध्ये बसणाऱ्या लोकाकडून तो ठेकेदार पैसे वसुल करू शकत नाही ती वास्तु नगरपालिकेच्या ठेक्यामध्ये येत नाही तेही त्या ठेकेदाराने वसुल केलेले आहे आणि नगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये जो तोटा झालेला आहे त्या ठेकेदाराने जेवढे पैसे वसुल केलेले आहेत त्याच्या बाबतीत काय सभागृहाने निर्णय घेतला आयुक्त साहेब तो तुम्हाला विचारतोय म्हणजे सभागृहात मला याचा निर्णय पाहिजे. पाच वर्षापर्यंत तो खाजगी ठेकेदार आपल्या मालकीच्या जागेवर ज्या मालकीच्या जागेवर त्याला हक्क नाही आहे. त्याठिकाणी तो पैसे वसुल करतोय. दुसरी गोष्ट ९२ गाळयांचे जे वार्षिक उत्पन्न त्यांनी दाखविले आहे. म्हणजे १५ रू महिना फक्त आज आपल्या नगरपालिकेच्या कंपाऊंडमध्ये जी दुकाने होती त्यांना आपण गाळे दिलेले आहेत त्या गाळयांचे भाडे किती फक्त १५ रू. महिना म्हणजे शेवटी अधिकाऱ्यांना काय सांगायला पाहिजे हेपण आम्हाला समजत नाही. आपण टॅक्स मध्ये वाढ करतोय, पाण्यामध्ये वाढ करतोय. जे खरोखर उत्पन्न ह्या महापालिकेचे आहे. त्याकडे आपण दुर्लक्ष करीत आहोत. पहिली गोष्ट मला अधिकाऱ्यांनी सांगावे कि बाजारपेठ आपली जी जुन्या महापालिकेच्या खाली त्याची जी वसुली ठेकेदाराने केली आहे. ती योग्य आहे की अयोग्य आहे त्याचे उत्तर मला द्या.

**विजय पाटील :-**

लिलावाच्या यादीमध्ये समाविष्ट नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग त्या रक्कमेचा आपण काय निर्णय घेणार आहोत ज्या ठेकेदारांनी ती रक्कम वसुल केलेली आहे त्या बद्दल महापालिका काय निर्णय घेणार आहे. कशापद्धतीने आपण वसुल करणार साहेब त्यांच्या बाजार लिलाव संपलेला आहे. माझ्या महितीप्रमाणे नवीन लिलाव आलेला आहे. मागची थकबाकी काढतांना तो ठेकेदार पुन्ही बाजार घ्यायला गेला तर तो त्या नावाने न भरता दुसऱ्या नावाने भरेल तो थकबाकी देणार नाही. एकतर मला सांगा त्या ठेकेदाराने ज्या गैर पद्धतीने बाजार वसुली केलेली आहे. आणि या कायद्याखाली आम्ही वसुल करू शकतो त्या कायद्याचे कलम मला सांगावे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी जो मुद्दा मांडलेला आहे. हा अतिषय महत्वाचा आहे आणि महापालिकेच्या उत्पन्नाशी निगडीत आहे. आपण जी बाब निर्दशनास आणलेली आहे ती खरोखर मनपाच्या दृष्टीने अतिशय महत्वाची आहे. हा महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीखाली जे गाळे आहेत. त्याची वसुली ठेकेदारांच्या अखत्यारीत येत नसतांना त्यांनी वसुल केली गेलेली आहे. असे उत्तर याठिकाणी दिले गेलेले आहे आणि जर असे झाले असेल तर त्याची तपासणी केली जाईल आणि कायदेशीर दृष्ट्या त्याच्याकडून कशापद्धतीने ही वसुली करता येणे शक्य आहे. त्यासंदर्भात निश्चितपणे कार्यवाही केली जाईल. आता सद्यस्थितीमध्ये एवढेच म्हणु शकतो व पण वसुली नक्की केली जाईल त्याच्याकडून.

**मोहन पाटील :-**

याठिकाणी सन्मा. सदस्य अग्रवालजी यांनी चांगला मुद्दा उपस्थित केलेला आहे. शहरामध्ये मिराभाईंदर महानगरपालिका झाल्यानंतर विविध ठिकाणहुन जो रेव्हेन्यू आपल्याला मिळाला पाहिजे आणि त्या दृष्टिकोणातून बजेट मध्ये वाढ होऊन नागरीकांना सुविधा निर्माण करता आल्या पाहिजेत,

विकास साधता आला पाहिजे यादृष्टीकोनातुन चांगला प्रश्न याठिकाणी उपस्थित केलेला आहे आणि आपल्या मिरा-भाईंदर शहरामध्ये पक्क्या स्वरूपाची जी मार्किट्स आहेत त्यांनी उदाहरणादाखल भाईंदर पश्चिमध्ये मार्किट दिले परंतू असे उत्तन ते चेण्यापर्यंत अशा काही ठिकाणी आपण समाज मंदीर बांधून त्याठिकाणी मार्किट भरतोय आणि काही ठिकाणी मार्किट आहेत त्या ठिकाणी आपण मार्किट भरवतोय तर त्याठिकाणी आपण रस्त्यावर १० ते १५ रूपये वसुल करतोय तर त्याठिकाणी नक्कीच त्याला छत देत आहोत. इलेक्ट्रीसिटी देत आहेत, पाण्याची सुविधा देत आहेत. त्यांना चांगली जागा उपलब्ध करून दिलेली आहे तर त्या ठिकाणी बसणारा जो व्यापारी आहे त्याचा चांगला रेव्हेन्यू आपल्याला मिळाला पाहिजे म्हणून त्याचे निश्चित धोरण यांच्याप्रश्नाच्या माध्यमातून आपल्याला घेता येईल आणि घेतले पाहिजे असे मला या सभागृहामध्ये सांगायचे आहे तर अश्यापद्धतीने जे मार्किट आहेत त्या मार्केटमधून आपल्याला चांगला रेव्हेन्यू उपलब्ध होऊ शकतो आणि तश्या पद्धतीने सर्वेही आपल्या पालिकेमार्फत झालेला आहे आणि आपण तसे एक निश्चित धोरण ठरवून आपल्याला रेव्हेन्यू वाढवता येईल असे मी यांच्या सुचनेला संबोधून सांगत आहे. खर तर सुचना चांगली आहे.

**मा. आयुक्तः-**

ग्रामपंचायतीच्या काळापासून काही भुईभाडयाने जागा दिलेल्या असतील किंवा दुकाने दिलेली असतील त्याच्यामध्ये देखील वाढ झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. काही मार्केट अतिषय जुने झालेले होते ते तोडून आपण नवीन बांधले त्याठिकाणी काही डिपॉझीट आणि भाडे नवीन आपण लावले. परंतूत्याच्या मध्ये गाळेधारक कोर्टामध्ये गेले ही आत्ताची वस्तूस्थिती आहे. परंतू या पंचायतीच्या काळापासून फिक्स असलेल्या भाडयाला आपल्याला किती त्याचामध्ये वाढ करता येईल, कायद्याने आपल्याला किती मर्यादेपर्यंत वाढ करता येईल नवीन जे मार्किट आपण बांधलेले आहे त्याच्यामध्ये आपण कुठला रेट फिक्स करायचा या संदर्भामध्ये लवकरच आम्ही एक प्रस्ताव देतो आणि तो प्रस्ताव मान्य झाल्यानंतर याच्यामध्ये नक्की आपल्याला जास्त रेव्हेनू मिळू शकेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब गोष्ट अशी आहे की जे ९२ गाळे आहेत. आणि त्याच्यातील आपण वास्तु तिकडे नवीन बांधलेली आहे ते गाळेधारक कोर्टात गेले आपणही कोर्टात गेलो. हा नगरपालिकेच्या काळामध्ये हा विषय मी उपस्थित केला होता. त्यावेळी की मिरा-भाईंदर महापालिकेच्या स्वतःच्या ज्या खाजगी वास्तु आहेत त्यांच्या भूईभाडे विषयी काय निर्णय घेणार आहोत त्यावेळी असे सांगण्यात आले. एक कमिटी स्थापन केलेली आहे. त्यामध्ये नगरपालिकेचे त्यावेळचे मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी, पी. डब्लूडीचे अधिकारी हे निर्णय घेऊन भाडे ठरवणार आहेत. त्या गोष्टीला अडीच वर्षे झालेली आहे. आज एक सन्मा. नगरसेवक या सभागृहात नाही. नेहमी म्हणतात आंधळ दळतोय आणि कुत्रा खातोय हीच परिस्थीती या सभागृहाची आणि शहराची चालु आहे. म्हणजे तीन वर्ष झाली तरी मला या सभागृहामध्ये उत्तर दिलेले नाही आणि आपण तीन वर्षामध्ये जे उत्पन्नाचे स्त्रोत महापालिकेचे आहे. त्याबद्दल आपण निर्णय घेवू शकला नाही मग ही पालिका, महापालिका किती सक्षम आहे इकडचे अधिकारी किती सक्षम आहेत याचा आपण विचार करावा आणि याच्यामध्ये अधिकारी आहेत ज्यावेळी उत्तर दिले होते त्याची प्रासिडींग माझ्याकडे आहे. त्यावेळी उत्तर देताना त्या विषयाला फॉलअप केले गेले नाही असा याचा अर्थ आहे. आज दुकानधारकांना महापालिकेच्या स्थापनेच्या एक दिवस अगोदर त्यांना गाळे वाटप करण्यात आले ते ही नियमाविरूद्ध आहे आपण कोर्टात गेलेलो आहोत त्यांना खाली करण्याचा आदेश दिलेला आहे. त्यागोष्टीला चार महिने झालेले आहेत. आपल्याकडून कुठलीही कारवाई अजूनपर्यंत झालेली नाही असे वाटते. म्हणजे नगरपालिकेला फक्त सभगृहामध्ये सन्मा. नगरसेवकांनी विषय उचलला त्याला दोन ओळीचे उत्तर दिले म्हणजे समाधान झालेले आहे, विषय संपलेला आहे. अशी जी प्रथा या सभागृहामध्ये चालू ठेवायची आहे. कि कुठच्या विषयाला निर्णय आणायचा आहे. आता आपण बघितले मासिक १५ रू. भाडे म्हणजे एका पक्क्या गाळयचे आज आपण रोज आठआणे झाले आणि महापालिकेच्या ग्रामपंचायत काळापासून दोन रूपये मिनिमन फेरीवाल्याकडून घेत होत. दोन रूपये एक रूपया, यांना आठआणे भांडे म्हणजे शेवटी अधिकारी कसुरवार आहेत की नाही.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला मी उत्तर दिलेले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब उत्तर मला नेहमीच मिळतेय पण त्याला फॉलअप होतनाही मी सांगीतले नगरपालिकेच्या काळातध्ये हा प्रश्न उपस्थित केला होता या भुईभाडयाचा अधिकार महापालिकेला नाही सभागृहाला नाही याच्यामध्ये एक समिती नेमली गेली आहे. यामध्ये जिल्हाधिकारी आहेत, मुख्याधिकारी आहेत, पी.डब्लू.डीचे अधिकारी आहेत. मग तो अहवाल कुठे गेला म्हणजे तुम्ही मागणी केली की नाही केली हे तरी सभगृहामध्ये कळू द्या

**धनेगावे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन होण्यापुर्वी एक दिवस अगोदर नगरपालिकेच्या जुन्या इमारती समोरील गाल्यांचे वाटप केले गेले होते. त्या गाल्यांच्या भाडयाचे निश्चितीचा प्रस्ताव नगरपालिका अस्तिवात असताना नगरपालिका अधिनियम ९२ खालील जी कमिटी आहे त्या कमिटीकडे भाडे मंजूरीचा प्रस्तावा सादर केला होता. परंतू महानगरपालिका निर्माण होईपर्यंत भाडे मंजूरीचा प्रस्ताव मंजूर झाला नाही आणि दरम्यानच्या कालावधीमध्ये ते गालेधारक कोर्टामध्ये गेले होते त्यावेळी महापालिका अस्तित्वात होती म्हणून तो महापालिकेनी मागच्या सभेमध्ये निर्णय घेऊन भाडे आकारणीच्या नोटीसा पण त्यांना दिल्या होत्या परंतू कोर्टात पेंडींग असल्यामुळे ते भाडे वसुल झाले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही मागणी फक्त तेरा गाळयासाठी केली कि अन्य गाळयासाठी केली.

**धनेगावे :-**

फक्त नवीन गाळे बांधले फक्त त्या गाळयासाठी

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जुन्या गाळयांचे नगरपालिकेच्या उत्पन्नाचे घेणे देणे नाही आहे का ? ग्रामपंयायत काळापासून भुईभाडे ०.५० पैसे चौरसफुट आहे.

**धनेगावे :-**

आपण जिल्हाधिकाऱ्यांना जो पाठवलेला प्रस्ताव फक्त त्या नवीन गाळयासाठी होता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग जुन्या गाळयांचे काय जुने तसेच राहू द्यायचे. ते महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत नाही आहे का ? ते कोर्टात जायच्या आधी कमिटी स्थापन झाली आहे ती कमिटी स्थापन होऊन प्रस्ताव गेला असेल आणि जर जबरदस्तीने ते गाळे त्याठिकाणी कोणीतरी दिले असतील कशाहीपद्धतीने दिले असतील, या सभागृहामध्ये ठराव पण नाही आहे. जर नगरपालिकेला अधिकार आहे. अशा गाळेधारकांचा गाळा सिल करून ताब्यात घेण्याची म्हणजे वाटेल तसे त्यांनी करावे या महानगरपालिकेमध्ये महापालिका अधिकाऱ्यांचे कर्तव्य नाही आहे. की सभागृहामध्ये जी कमिटी ठरते, त्या कमिटीच्या प्रस्ताव जातो. त्याआधी गाळे वाटप होतात. कोणतीही पुर्णता या सभागृहामध्ये झाली नाही किंवा दिली गेली नाही असेल तर सांगा कि ह्या स्थायी समितीने कि मागच्या बॉडीने हा प्रस्ताव केला आहे. गाळेधारकांना गाळे द्यायचा किंवा एका माणसांच्या अधिकारावरती हे गाळ दिले गेलेले आहेत.

**मा. आुयक्त :-**

प्रशासकीय कारकीर्दित झालेले आहे का?

**धनेगावे :-**

साहेब २७ फेब्रुवारी २००२ ला नगरपालिका असताना.

**मा. आयुक्तः-**

त्याला मान्यता आहे का ?

**धनेगावे :-**

नाही मान्यता नाही त्याला, ते गाळे अनधिकृतपणे वाटप केले गेले होते. त्या गाळयाबाबत आम्ही हायकोर्टामध्ये ॲफीडेव्हीट पण फाईल केले आहे केस विड्रो झालेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब जेव्हा आपली प्रॉपट्री कोणी ताब्यात घेतोय त्यांचा अधिकार नाही त्या प्रॉपट्री वरती आणि तो घेतल्यावर आम्ही कोर्टात जातो ही बाब गंभीर आहे म्हणजे कोणी महापालिकेवर कब्जा केला आणि सांगितले आम्ही कोर्टात गेलो आहोत तर हे तुमचे उत्तर बरोबर नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर परवानगी बोलतोय

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब पहिला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळे दया.

**लिओ कोलासो :-**

आपल्या प्रश्नांच्या सबंधीतच मी बोलतोय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मला माहिती आहे माझ्या फेवरला बोलणारे कसे फेवरला बोलतात महापौर मॅडम प्रश्नात्तर तास चालू आहे. मागच्या वेळी मी चुक केली आहे. एकाला बोलायला दिले म्हणून ती चुक मी आता करणार नाही.

**रिटा शहा :-**

महापौर मॅडम गेल्या मिटींगला मला सचिवांनी सांगितले ज्याचा प्रश्न असेल तेच प्रश्न आणि उपप्रश्न शकतात. इतर सदस्यांना तुम्ही बोलायला कशी परवानगी देता.

**मा. महापौर :-**

त्यांना तुमच्या प्रश्नासबंधी बोलायचे असेल काय बोलतात ते ऐकून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्यावेळी मी ऐकूण घेतलेले आहे. मॅडम जो विषय चाललेला आहे तो गंभीर बाब आहे. म्हणजे अधिकारी वर्ग फक्त प्लान पास करा या शहराचे वाटोळे करायला घेतले आहे आणि खरोखर जे शहराचे महापालिकेचे उत्पन्न आहे.

**लिओ कोलासो :-**

याला आमचा आक्षेप आहे शहराचे वाटोळे करायला घेतले आहे अशातला प्रश्न नाही आहे हा मॅडम मी विनंती करतो आपल्याला या विषयावरती त्यांना पुर्ण बोलू द्या व नंतर आम्हाला या विषयावरती बोलायला द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महपौर मॅडम ही सभागृहाची पद्धत नाही. एक नगरसेवक ज्याचा प्रश्न आहे त्या प्रश्नावरती विचारतोय आणि ही गंभीर बाब आहे आयुक्तांनी कबुल केलेली आहे ही गंभीर बांब आहे. ग्रामपंचायत कालापासून दोन रूपये वसूल करतात आणि अधिकाऱ्यांना माहिती नाही ह्यांना हे तरी नाहीती आहे का नगरपालिकेची प्रॉपट्री आहे की नाही.

**धनेगावे :-**

गारोडीया साहेब तुम्ही जो प्रश्न उपस्थित केला होता तो नगरपालिकेच्या नविन गाळयासंदर्भात होता त्यामुळे तुम्ही वेगळेवेगळे आरोप करू नका ही विनंती आहे आपल्याला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी अजूनही तुम्हाला सांगतोय तुमची डूटी आहे. महापालिकेची डूटी आहे. जसे तीन वर्षामध्ये तुम्ही प्रॉपर्टीचे तुम्ही परत करआकारणी फेरफार करता, वाढ करतात. ह्या गाळयांची तुमची डयूटी नाही आहे का सांगा मला डयूटी नाही.

**मा. आयुक्त :-**

मला वाटते या संदर्भामध्ये मी आपल्याला सविस्तर उत्तर दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही साहेब ह्या गाळयांच्या वाटपामध्ये, ह्या गाळयांच्या भुईभाडयामध्ये अधिकाऱ्याकडून चुक झालेली आहे, कसूर झालेली आहे. आणि नगरपालिकेचे लाखो रूपयाचे नुकसान झालेले आहे. या नुकसान भरपाईपोटी ह्या अधिकाऱ्यांना जबाबदार ठरवले पाहिजे. ते कोणीही असू दे. मी कोणाचे नाव घेत नाही. तें कोर्टात गेले. एक साधी गोष्ट ती त्यांच्या हक्काची नाही त्याच्यावर तो ताबा करतो आणि कोर्टात गेले.

**मा. आयुक्त :-**

कोर्टात गेल्यानंतर आपल्याला काही करता येत नाही हे आपल्याला माहिती असाव. बाब जेव्हा न्यायप्रतिष्ठा असते त्याच्यावर आपल्याला निर्णय घेता येत नाही. ही साधी कॉमनसेंसची गोष्ट आहे. ह्या सभागृहात चर्चा करता येणार नाही. आपल्याला जे आरोप करायचे आहेत ते जरूर करा परंतु आम्ही जे आपल्याला सांगतोय जुन्या गाळयांच्या बाबतीत एक पॉलीसी आपण निश्चितपणाने या सभागृहाकडून मंजूर करून घेऊ. आपणच बोलाल की आमचे थोडे ऐकाल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ऐकतो ना, बोला.

**मा. आयुक्त :-**

त्यामुळे मी हेच सांगतोय तुम्हाला कि जुन्या गाळयांच्या बाबतीत आम्ही कबुल केलेले आहे की ग्राम पंयायतीच्या काळापासून आजपर्यंत जवळजवळ नगरपालिका झाली तेव्हा देखील झालेले नाही आणि अजुनही झालेले नाही. तर पण पंचायतीच्या काळामध्ये फिक्स केलेले दर आहेत बदलण्याची आवश्यकत आहे त्याच्यातील कायदेशीर बाबी तपासुन घेऊन आपल्याकडे सभागृहापुढे हा प्रस्ताव आम्ही आणतोय असे म्हटल्यानंतर तो विषय तिथे संपायला पाहिजे आणि नवीन गाळयांच्या वापराबद्दलची जी मॅटर आहे ती कोर्टामध्ये आहे त्याची चर्चा ह्या सभागृहामध्ये करता येणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब हा प्रश्न विचारून चार महिने झालेले आहेत. हा प्रश्न जेव्हा मी उपस्थित केला त्याची तारीख बघा चार महिने आधी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. जर या चारमहिन्याच्या कारकिर्दी मध्ये याला फॉलअप केला असता तर आज ही पाळी या सभागृहामध्ये आली नसती.

**मा. आयुक्त :-**

फॉलअप म्हणजे काय करायचे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जे प्रस्ताव आहेत भुईभाडे वाढीचे ते स्थायीसमिती पुढे आणायचे बाकीचे विषय येतात ना स्थायी समिती मध्ये हा विषय का नाही आला.

**मा. आयुक्तः-**

ठिक आहे नविन गाळयांच्या बाबतीत जे सांगितले मी आपल्याला

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एकंदर मी सांगतो भाईंदरचे ९२ गाळे

**मा. आयुक्त :-**

पुढच्या बैठकीपर्यंत हा प्रस्ताव तयार करून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण साहेब अधिकारी दोषी आहेत. मागच्या मालमत्तेच्या नुकसानी पोटी कारवाई नाही अशा अधिकाऱ्यावरती कारवाई झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

**मा. महापौर :-**

तुम्हाला सांगितले आहे ना आता बसा

**अनंत पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, ग्रामपंचायतीपासून ते आतापर्यंत जे गाळे दिलेले आहेत त्यात राई, मुर्धे, उत्तन पर्यंतचे जे गाळे काही लोकांना दिलेले आहेत परंतू काही गाळे त्या जागेवर अस्तिवात नाहीत त्यांनी वारंवार भुईभाडे भरून सुद्धा त्यानां गाळे दिले नाहीत तरी यासदंभामध्ये नगरपालिकेने योग्य त्या दराने आतापर्यंत जे भुईभाडे भरतात त्यांना तुम्ही गाळे देणार का ? कारण पुर्वीपासून ग्रामपंचायतीने दिलेले गाळे आहेत. ते काही नगरपालिका आल्यानंतर त्या रस्त्यामध्ये ते गेलेले होत. परंतू ते ग्रामपंचायतीच्या वेळेस भुईभाडे भरत होत. तसेच ते आजतागायत नगरपालिका महानगरपालिकेचे सुद्धा ते भुईभाडे भरतात, परंतू त्यांनी रिपेरिंग करीता परवानगी मागितली आहे त्यांना रिपेरिंग करण्याची परवानगी दिलेली नाही. तरी ती परवानगी आपण देऊ शकाल का? तरी ती परवानगी मिळावी अशी विनंती आहे.

**विजय पाटील :-**

अर्ज आलेले आहेत का ?

**अनंत पाटील :-**

होय अर्ज आलेले आहेत आणि ते साहेबांकडे सुद्धा आलेले आहेत.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम मी अगोदर सन्मा. सदस्य ओमप्रकाश बोलत असताना खर तर मी त्यांचे समर्थन करण्यासाठीच बोलणार होतो परंतू ते एवढे वाईल झाले की शेवटी या शहराचे वाटोले झालेले आहे. इथपर्यंत त्याचे भाष्य गेले हे खर तर आक्षेपार्ह आहे मी त्याच्या संदर्भात काय बोलणार होतो आणि त्यांनी काय बोलले तर मा. आयुक्त साहेब आपण खरेतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सुचना मांडली आहे. डायसवरून ती आपण एक्सपेंट केली. खरे तर हे अत्यंत चागले चित्र आहे की जे वैगुण्य आहे ज्या प्रशासनतील त्रुटी आहेत त्या सन्मा. सदस्य उपस्थित करतात आणि मोठया दिलाने जेव्हा प्रशासन ते मान्य करते तर ही खरोखरच वाखाण्यासारखी गोष्ट आहे. हे मी बोलणार होतो पण हे मुद्दामहून ओमप्रकाशजी सांगेन की आपल्या बद्दल सुद्धा मी या नोटसमध्ये लिहिले मी ते मुद्दाम वाचुन दाखवितो आहे की ओमप्रकाशजी यांनी असे विचारले की कोणत्या कालमाखाली आपण कारवाई करणार त्यांनी विचारले ते आणि आपण त्याच्यावर मा. आयुक्त साहेबांनी उत्तर दिले ते मी लिहिलेले आहे. ही अटेंम्प्टेड ही ॲप्रीशिएटेट श्री. ओम ओम्स अटेंम्प्ट आपल्या मुद्याचे त्यांनी समर्थन केले. वाखाणणी केली मी आपल्या सभागृहाच्या निदर्शनास आणेल की कमिशनर साहेबांनी ह्या प्रश्नावरती जी जो नवीन गाळयांचा प्रश्न आहे हायकोर्टामध्ये ज्याचे मॅटर आहे तो सोडून इतर जे गाळे अद्यापी नोंदीवरती आलेले नाहीत आणि ज्याचा रेव्हेन्यू अद्यापही महानगरपालकेला मिळत नाही आपण त्यामध्ये उत्तर दिलेले आहे की तपासणीकरून त्याबद्दल निश्चित ती कारवाई करण्यात येईल आणि आपण पुढे म्हटलेले आहे की याची संपूर्ण वसुली करण्यांत येईल तर मला वाटते दॅट इज इनफ फॉर अस. धन्यवाद !

**धनराज अग्रवाल :-**

रोड वायडिंगमध्ये जे गाळे तोडलेले आहेत त्यांना परत मिळणार आहेत का ?

**धनेगावे :-**

रोडवायडींगमध्ये जे गाळे तोडलेले आहेत त्या लोकांना परत गाळे देण्याबाबतचे तत्कालीन नगरपरिषद आणि विद्यमान महापालिकेची कुठलेही धोरण अद्यापपर्यंत निश्चित झालेले नाही आणि सद्यस्थितीत आपल्याकडे गाळे उपलब्ध पण नाहीत.

**धनराज अग्रवाल :-**

निश्चित धोरण कोण करणार आहे.

**धनेगावे :-**

महापालिका सभागृह

**धनराज अग्रवाल :-**

महापालिका म्हणजे आपण दिले आहे का ऑफीसर म्हणून कि आपण काय धोरण ठेवायला पाहिजे.

**धनेगावे :-**

सद्यस्थितीत आपल्याकडे गाळेच उपलब्ध नाही आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

ज्या मालकाचे गाळे तोडून टाकले आहेत. ते गाळे धारक रोडवर आलेले आहेत, ते रडूनरडून रोज जातात तुम्ही तसा प्रस्ताव मांडत नाहीत त्यांना देणार कि नाही देणार.

**धनेगावे :-**

रस्तारूंदीकरणाची मोहिम हाती घेतली होती त्यावेळी हायकोर्टामध्ये तीनचार पिटीशन पण झाल्या होत्या त्यावेळी हायकोर्टामध्ये आपण हेच म्हणणे मांडले आहे आपल्याकडे गाळे उपलब्ध नाही आहेत. आणि गाळे उपलब्ध करून देऊ शकत नाही.

**धनराज अग्रवाल :-**

आपण आजपर्यंत त्यांचे भाडे वसुल केलेले आहे.

**धनेगावे :-**

भाडे वसुल केले आपली मालमत्ता होती ती आपण भाडयाने दिली भाडे वसुल केले रोड वायडिंग केले हे आपल्याच कामासाठी केले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

त्यांना गाळे आपण पहिला दिले होत. काय हिशोबाने दिले होत.

**धनेगावे :-**

ते तत्काळीन ग्रामपंचायतीने दिले होते. तत्काळीन नगरपरिषदेने दिले होत आज त्यांना देणे बंधनकारक नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर साहेब यांच्यावर एक सुचना नक्की मी सांगतोय.

**मा. महापौर :-**

ज्यांनी प्रश्न विचारला होता त्यांना उत्तर दिले आहे. तुम्ही बसा तुम्हाला दुसरे काही विचारायचे असेल ते विचारा.

**रोहिदास पाटील :-**

त्याच्यात दुरूस्ती करायची नाही का ?

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेबांनी सांगितली आहे ना दुरूस्ती.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला महापालिकेच्या हिताच्या गोष्टी ऐकायची मनस्थिती नसेल तर सांगण्यामध्ये काही आम्ही विषय सोडू देणार. काय हरकत नाही. ओमप्रकाशजींनी कोण्याव्यक्तीवर आरोप केलेला नाही. एकतर त्यांनी सांगितले कि महापालिकेच्या उत्पन्नाची बाब आहे. उत्पन्नाच्या बाबीमध्ये अधिकाऱ्यांकडून कसुर झालेला आहे असे आमचे मत आहे. हे व्हायला पाहिजे. आता जसे धनेगावे साहेबांनी सांगितले त्यातलाच एक भाग सांगतोय की ह्या जनतेला न्याय देण्यासाठी आपण इथे बसलेला आहोत रस्ता रुंदीकरणाचा कामकाजामध्ये ज्यांचे नुकसान झाले ती यादी सादर करायला पाहिजे होती किंवा ह्या ह्या लोंकांना बाधीत झाले. तुमच्या रेकॉर्डप्रमाणे तुम्ही तोडते वेळी बरेच व्हिडोओ काढले होत.

**मा. आयुक्त :-**

सदरचा प्रश्न ह्या प्रश्नाशी निगडीत नाही. आपल्याला त्याच्या संदर्भात माहितीपाहिजे असेल तर ती वेगळी दिली जाईल.

**रोहिदास शं. पाटील :-**

ती पुर्ण माहिती माझ्याकडे आहे. मी फक्त सभागृहाच्या लक्षात आणून देतोय कि ही जी कामे त्या पद्धतीने त्यावेळेत केली तर जो माणून भरकटला जातो त्याच्यावर अन्याय होणार नाही आता दोनशे तीनशे चारशे लोकांचे पुनर्वसन करायचे की काय करायचे ही इतक्या वर्षापासून अशी जर यादी सभागृहापुढे आली असती किंवा आयुक्तापुढे आली असती. प्रशासनाच्या पुढे आली असती तर त्याच्यावर विचार करणे सोपे गेले असते. पण जे विचारलेच नाही आणि आता आपल्या मनात येईल त्याप्रमाणे आपण कारवाई करत राहतो. लोकांकडून आपण टॅक्स वसूल करतो, जाहिरात रेंन्ट घेतो. बेदरसेटचे टॅक्स चारचार पाचपाच हजार रूपये वसुल केले आणि मनात आले तेव्हा तोडून दिले. हा नियम कुठचा कुठपर्यंत चाललेले आहे हे नगरपालिकेच्या हिताचे आम्ही समर्थन करू पण नगरपालिकेच्या हिताखली तुम्ही दादागीरी करत असाल तर दादागीरी बोलला की तो शब्ध झोंबतोय झोंबायचे काही कारण नाही आणि याच्यात सत्ताधारी पक्षाच्या महापारांचा कुठे हात येतोय कामकाजाख्वया पद्धतीचा हात येतो इथे. जेसलपार्क मध्ये जी तोड केली त्यादिवशी काही कारण नव्हते. तुम्ही त्यांचे टॅक्स वसुल केले. वेदर सेट टॅक्स पण वसुल केले आणि एका क्षणामध्ये चक्काचुर करून गेले. लोकांनी सांगितले तरी लोक काढतील तुम्हाला जे मान्य नाही. शहराच्या हिताचे जे करू इच्छिता पण तुम्ही मनात येईल ते कराल आणि कायदा फक्त सर्वसामान्यासाठी कायदा नगर सेवकांसाठी अधिकाऱ्यांसाठी कोणताही कायदा नाही का ? हा त्यांचाप्रश्न आहे. तुम्ही जर सांगितले असते जे दोषी अधिकारी भेटतील त्याच्यावर कार्यवाई करू तरी उत्तर झाले असते.

**रिटा शहा :-**

मा. महापौरांच्या आदेशाने बोलू इच्छिते. प्रश्न उत्तर नाही माझे पण मागच्या मिटींगमध्ये दुसऱ्याचा प्रश्न होता त्याच्यामध्ये उठून बोलायला इच्छित होत तेव्हा सचिवांनी मला असा कायदा दाखवला कि ज्याचा प्रश्न आहे तोच प्रश्न आणि प्रती प्रश्न करू शकतो आणि परत दुसऱ्या मिंटींगमध्ये वेगळेच काहितरी होते तर कायदा नेमका काय आहे. फक्त मला बसवण्यासाठी आदेश असेल तर मी मान्य करते.

**रक्षा शहा :-**

मा. महापौर आपल्या आदेशाने बोलू इच्छिते मी २४ तारखेला एक पत्र दिले होत. आयुक्त, महापौर आणि सभागृह सदस्य म्हणून त्यावेळेला मी नावाचा उल्लेख केला नव्हता की कोणी माझा

अपमान केला आहे. त्यावर आम्ही शिंदे साहेबांना भेटलो होतो. आणि शिंदे साहेबांनी परत सांगितले होत तुम्ही नावाचा उल्लेख करा. माझे अधिकारी कोण आहेत ते मला समजायला पाहिजे त्यावर मी २८ आणि ३१ तारखेला विरोधीपक्ष नेता आणि स्वतः आपल्याला लेटर दिले होते. की नाईक साहेब आणि विजय पाटीलांनी माझा अपमान केलेला आहे त्यावर आपणही नाईक साहेबांना बोलवले होते आणि विचारले होते की नक्की तुम्ही काय सांगितले. त्यावेळेला मी तुमच्या कडे बाजू मांडली की मी अश्या प्रकारे कराबाबत गेली होती आणि त्यावेळेला सकाळी माझ्या पत्राचे उत्तर शिंदे साहेबांनी परवाच्या दिवशी १६ तारखेला दिलेले आहे. १६ तारखेच्या पत्रामध्ये खुलासा न करता त्यांनी त्यांचा खुलासा दिलेला आहे माझ्या प्रश्नाचे उतर दिलेले नाही. त्यांनी खुलासा केलेला आहे मी चुकी केलेली आहे मी खोट बोललेली आहे की अश्वीनकुमार शहा व इतर यांच्या टॅक्स बाबत मी बोलायला गेलो होते. पण माझे म्हणणे असे आहे की मी त्याबाबत गेलेच नव्हते त्यांनी मला काही विचारलेच नाही आहे आमचे गटनेते रोहिदास पाटील यांनी आम्हाला संध्याकाळी साडेचार वाजता बोलवले होते आणि आम्ही त्यांच्या केबीनमध्ये गेलो होतो. केबीनला गेल्यानंतर मला काही प्रश्न विचारला नाही आणि काहीच बोलले नाही आणि सरळ मला सांगितले जा मॅडम तुमचे काम करणार नाही माझे डोक खाऊ नका. भाईंदर मध्ये साडेसात लाखाची वस्ती आहे. सगळीच डोक खाणारी माणसे असतील जर त्यांना एवढा त्रास होत असेल तर बाहेर बोर्ड लावायला पाहिजे सकाळी विजय पाटीलच्या समोर मी विजय पाटील आणि नाईक साहेब तिघेजण होतो कराबाबत गेल्यानंतर त्यांनी मला तसेच उत्तर दिले होते. की शिंदे साहेबांच्या केबीनला एकवेळा जाता लोक घाबरतात दुसरी वेळा जायला बघत नाहीत. माझ्या केबीनला चारचार वेळा येऊन तुम्हाला संतोष नाही. मग ते शब्द विजय पाटील साठी युज नव्हते. ते माझ्यासाठी बोलले होते म्हणून मला ते मान्य नाही. इकडे आपण सन्मानीत सदस्य म्हणतात चक्क माझा अपमानच होत आहे तर आम्ही सन्मानीत कुठे आहोत हा प्रश्न परत परत घडू नये त्यासाठी बोलले होत की त्याचा काहीतरी खुलासा करावा नाईक साहेबांना काहीतरी सांगावे त्यावर आपण मला असे म्हणतात कि मी खोटे बोलेले माझ्या जवळ पुरावा आहे. ह्या तीन महिन्यामध्ये त्यांनी किती कामे केलेली आहेत. ते पुरावे सादर करायला मी तयार आहे. आणि तुम्ही पण त्यांना विचारा की ह्या तीन महिन्यात सगळया प्रभाग विभागाचे फाईल आणाव्या आणि कोणाकोणाचे टॅक्स त्यांनी कमी करून दिलेले आहेत ते बघावे. मी तर महानगरपालिकेमध्ये अश्वीनकुमार शहा व इतर पार्श्वपूजा बिल्डींग यांचा फेरबदल केलेला आह. फेरबदल केल्यानंतर नगरपालिकेनी जबाब दिलेला आहे की वीस दिवसात ते कर आकरणी मध्ये आपल्यालाला काही कामे करायचे असेल तर वीस दिवसांत कळवायचे ते मी विचारयला गेले होते की तुम्ही तीन माणसाचे का केले बाकीच्या सहा माणसांचे का केले नाही ते इतरमध्ये बसतात की नाही बसतात ते विचारायला गेले होते. त्यासाठी मला विजयपाटीलांनी वीस दिवस बसून ठेवले आहे आणि त्यानंतर नाईक साहेबाजवळ घेऊन गेले आणि असे उद्धटप्रकारे मला उत्तर मिळते मग आम्ही लोकांची कामे करायची की नाही. आणि गैरसमज त्याबाबतीतही होतोय त्याच बिल्डींगचे ४/२/२००३ ला त्यांनी टॅक्स लावून दिलेला आहे तो पण पुरावा माझ्याजवळ आहे तर मला त्याचा खुलासा सभागृहामध्ये करायला पाहिजे त्यांनी माफी मागायला पाहिजे मी नाईक साहेब आणि विजय पाटील यांचा निषेध करते. मा. महापौर आपल्यासमोर पण ते बोलले होते त्यावेळेला ते असे बोलले होत मी तुम्हाला अपशब्ध बोललो आणि मी त्याचा जबाब तुमच्या समोर दिला होता मॅडम अपशब्ध नाही माझा अपमान केलेला आहे. तुम्ही मला जाकारा दिलेला आहे मी माझ्या स्वतःच्या कामासाठी गेलेली नाही. माझ्या वार्डाचे काम आहे. एक माणूस करू शकतो एकमाणूस करू शकत नाही त्याचे कारण काय ? त्याचा मला खुलासा पाहिजे.

**मा. महापौर :-**

सध्या नाईक साहेब रजेवरती आहेत ते आल्यानंतर आपण चर्चा करू.

**रक्षा शहा :-**

विजय पाटील इथे उपस्थित आहेत त्यांना विचारावे.

**मा. आयुक्त :-**

वास्तवीक या संदर्भात आपण ज्यावेळेला माझ्याकडे लेखी तक्रार केली त्यावेळी मी त्यांचा खुलासा घेतला. त्या खुलाशामध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की सन्मा. सदस्यांच्या बाबतीमध्ये कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन केलेले नाही कुठल्याही प्रकारे अपमानकारक शब्ध त्यांना वापरलेला नाही जे काम प्रशासकीय नियमात बसत नाही ते काम करण्याला नकार दिल्यामुळे त्यांनी माझ्यावरती हा आरोप केलेला आहे.

**रक्षा शहा :-**

ते खोटे आहे. माझे म्हणणे आहे की मला खोट म्हणतात पण ते स्वतः खोटे आहेत कारण ते मा. महापौरांच्या समोर पण बोललेले आहेत की मी असे शब्द वापरलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

मला व्यक्तीशः असे वाटते की हा प्रश्न जो आहे हा सभागृहाच्या बाबतीमध्ये इथे चर्चा करून सोडवण्यापेक्षा वेगळयाप्रकारे महापौरांच्या समोर चर्चा करून या संदर्भात निर्णय घ्यावा. ह्यासाठी सभागृहाचा बहूमुल्य वेळ खर्च व्हावा असे मला स्वतःला वाटत नाही.

**रिटा शहा :-**

साहेब सभागृहाचा बहुमुल्य वेळ म्हणजे महिलांची इज्जत काही नाही का ? मी पण आपल्याला एक पत्र दिलेले आहे. मी मा. महापौरांना आणि मा. उपमहापौरांना सुद्धा पत्र दिलेले आहे. मला त्या पत्राचे उत्तर अजुनही मिळालेले नाही. म्हणजे महिलांच्या इज्जतीचा काही अर्थच नाही.

**मा. आयुक्त :-**

एकेकाचे उत्तर मला देवू द्या हा जो प्रश्न आहे. ह्याच्या मध्ये काही करण्याचा उल्लेख आहे. की जी कामे बेकायदेशीर आहेत आणि मी करू शकलो नाही असे त्यांनी म्हटलेले आहे. नक्की तुम्ही जे सांगितले कि त्यांना कुठल्या दुसरी कामे बेकायदेशीर घेतली आहेत.

**रक्षा शहा :-**

तुम्ही त्यांचा खुलासा घेतला आहे त्यावर त्यांनी असे सांगितले आहे ३१ तारखेला आम्ही बसलो. आम्ही ३१ तारखेला नाही २४ तारखेला बसलो होतो त्यांच्यासमोर आणि त्यानंतर मी तीन वेळा पत्र दिलेले आहे. तुम्ही त्यांच्या बरोबर ३१ तारखेला जर बसला असाल.

**मा. आयुक्त :-**

चर्चाच आपल्याला करायची होती तर नाईक साहेब असल्यानंतर करणे जास्त इस्ट ठरेल.

**रक्षा शहा :-**

म्हणुनच ते गैरहजर राहिलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

गैरहजर राहिलेल नाही. ते रजेवरती आहेत.

**रक्षा शहा :-**

परवाच्या दिवशी १६ तारखेला बोलले होत म्हणून ते गैरहजर राहिलेले. १६ तारखेला मी परत विजय पाटीलांना बोलली होते हा शब्द मी सभागृहात उचलणार आहे. त्यांनी सांगितले जा काय करायचे ते करा.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला घाबरून रजेवर नाही गेले ते.

**रक्षा शहा :-**

विजय पाटील या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांना उत्तर विचारा विजय पाटील तुम्ही उत्तर द्या.

**विजय पाटील :-**

सन्मा. सदस्या रक्षा बेन शहा यांना नाईक साहेबांनी किंवा मी वैयक्तीक असे अपमानास्पद वगैरे असे काहीही बोललेलो नाही.

**रक्षा शहा :-**

मग याचा अर्थ काय झाला.

**विजय पाटील :-**

कशाचा .

**रक्षा शहा :-**

मी तुमचे काम करणार नाही.

**विजय पाटील :-**

कधी बोललो असे बोललोच नाही.

**रक्षा शहा :-**

माझ्या जवळ पुरावा आहे. मुक्ता रांजणकर, रोहिदासजी पाटील, गजानत भोईर सगळयांचा मी उल्लेख केलेला आहे साहेब १६ तारखेच्या पत्रामध्ये मी सगळयांचा उल्लेख केलेला आहे एवढे

एवढे नगरसेवक बसले होत म्हणून तुम्ही त्या नगरसेवकांना विचारा ते बोलले होते की नाही. बाहेरचे कार्यकर्ते पण होत. कार्यकर्त्यांची नावे देऊ का मी.

**विजय पाटील :-**

मा. महापौर मॅडम अशा प्रकारचे उत्तर माझ्याकडून किंवा नाईक साहेबांकडून दिले गेलेले नाही त्यांना.

**कैलासबेन जानी :-**

पण नाईकासाहेबांनी मा. महापौरांसमोर सांगितले आहे की माझे डोके खाऊ नका असा मी शब्द वापरलेला आहे. तरी सुद्धा मा. महापौरांना एक्शन घ्यायला पाहिजे तुमच्या समोर कबुल केलेले आहे त्यांनी की माझे डोके खाऊ नका तुम्ही बाहेर जा.

**मा. महापौर :-**

नाईक साहेब आल्यानंतर आपण चर्चा करू.

**कैलासबेन जानी :-**

असे सांगा की पुढच्या मिटींगला हा विषय घ्या आम्हाला बोलायला पाच मिनिटे द्या.

**रक्षा शहा :-**

वीस दिवस गेल्यानंतरही आपल्याजवळ हे प्रकरण आलेले आहे. त्यांना काम नाहीच करायचे होते तर त्यावेळेलाच मला सांगु शकले असते.

**मा. महापौर:-**

पुढच्या विषयाला सुरूवात करा.

**रक्षा शहा :-**

मला त्याचा खुलासा करा.

**कैलासबेन जानी :-**

मॅडम पुढच्या मिटींगला पाच मिनिटे बोलायला देणार असे आश्वासन द्या.

**रक्षा शहा :-**

आपण सांगा मला हयाचा खुलासा केव्हा देणार ते.

**मा. महापौर :-**

ह्या विषयावर दालनात सर्व एकत्र बसून विचार विनिमय करू सभेमध्ये नका.

**कैलासबेन जानी :-**

कारवाई करायला सक्षम नाही आहांत का तुम्ही. असे सांगा की मी सक्षम नाही. आयुक्त साहेबांची जबाबदारी आहे.

**उपमहापौर :-**

मा. आयुक्त साहेब सन्मा. सदस्या श्रीमती रक्षा बेन शहा आणि कैलास बेन जानी यांनी या ठिकाणी सभागृहामध्ये जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो खरोखर अतिशय महत्वाचा आहे आपण आयुक्त पदावर या महानगरपालिकेत आल्यानंतर सुद्धा सर्व सदस्यांची ही मनापासून भावना आहे की कारभार चांगला चालला आहे. प्रशासन चांगले सुधारत चालले आहे पण त्याच्या व्यतिरिक्त सभासदांना जो प्रतिसाद अधिकाऱ्यांकडून मिळायला पाहिजे तो मिळत नाही. ही तेवढीच सत्यता आहे. आणि यांची जबाबदारी ही निश्चितपणे महापौरांची किंवा इलेक्टेड रिप्रिसेंटेटिव्हची नसते तर ती आयुक्तांची आहे. डेप्युटी म्युनिसीपल कमीशनरांची आहे. आणि जर आपले अधिकारी अशाप्रकारचे वक्तव्य जर करीत असतील तर ते अतिशय चुकीचे आहे. याबाबतीमध्ये आयुक्त साहेबांनी मी सभागृहाच्यावतीने सांगू इच्छितो की संबंधित आपल्या सर्व अधिकाऱ्यांना त्यांनी व्यवस्थित माहिती देण्याची जबाबदारी त्यांची आहे. एखादे काम जर नियमाबाहेर असेल तर तसे ही त्यांनी सांगावे की हे करता येत नाही. कारण अमुक अमुक नियम आड येत आहे. पण तूमचे काम मी करणार नाही किंवा वेळ नाही. मिटींगमध्ये बिझी आहे. अशाप्रकारचे जे उडवाउडवीचे उत्तर मिळत असतात. ते अतिशय चुकीचे आहे. आपल्या नजरेसमोर आम्ही वेगवेगळे प्रश्न जे अधिकारी लोक बघत नाही असे प्रश्न तुमच्याकडे मांडण्यांत आलेले आहेत. आणि त्यांच्यावरही काही कार्यवाही होत नाही. एखादया अधिकाऱ्याला आपण काही सुचना दिली, काही घरपट्टीचे प्रश्न होते त्यासंदर्भात आपण सुचना दिली नंतर त्या अधिकाऱ्याकडे आमचे सदस्य गेले तर त्यांना सांगण्यात आले की, आम्हाला तशी काय सुचना नाही असे. लॅक ऑफ कॅडिनेशन, ॲडमिनिस्ट्रेशन आणि प्रशासनामध्ये

दिसून येते आहे. मला असं वाटत याची पुर्ण जबाबदारी आयुक्त साहेब ही आपली आहे. आणि सभासदांची व्यवस्थिपणे नीट वागण्याची ही जबाबदारी त्यांनी स्विकारली पाहिजे. आणि व्यवस्थित, नीट नियमाप्रमाणे जे उत्तर असेल ते त्यांनी दिले पाहिजे अशी सुचना आपण सर्व संबंधित अधिकाऱ्यांना द्यावी अशी आमची तुमच्याकडे विनंती राहणार.

**रोहिदास पाटील :-**

उपमहापौर साहेबांना धन्यवाद देतोय मा. महापौर साहेब ह्याच्यात दोन मुद्दे आले मान, अपमान, सन्मान किंवा अपशब्द हा जो कुठेही सकल तुम्हाला विचारायचा आहे तो विचारा पण मॅडमचे म्हणणे असे आहे. ह्यातली वस्तुस्थिती जी सभागृहातल्या ह्या सर्व सन्मा. सदस्यांनी व अधिकाऱ्यांनी लक्षात घ्यावी की, त्यांचा आग्रह असा आहे की त्याच बिल्डींगमध्ये ज्यापद्धतीने तुम्ही अन्य काम केलेले आहे. त्याचबिल्डींगमध्ये तुम्ही त्यांना ज्या रोहिदास पाटील आणि इतर अशी नोटीस बजावलेली आहे. म्हणजे एका सोसायटीत आपण ज्यावेळी नोटीस बजावतो त्यावेळी चाळीस लोकांचे नाव लिहित नाही एक आणि इतर असे लिहितो जो नेहमी येतो त्याचेतरी लिहितो किंवा सेक्रेटरी सोसायटी लिहितो किंवा सोसायटीचेच नाव लिहितो. त्यातली तीन काम झाल्याचे त्यांचे स्पष्ट मत आहे की त्याच पद्धतीची ज्यापद्धतीच काम त्या सांगत होत्या त्या कोणतेही खोटे काम सांगायला गेल्या नव्हत्या असं त्याच मत आहे. ज्या अन्य लोकांच काम केले आहे. तुम्ही त्याच पद्धतीच हे काम आहे. त्याची बाजू खरी आहे असे त्यांचे ठाम मत आहे. ह्याचा निकाल लागायचा आणि तो सभागृहाची ही अपेक्षा आहे. आमचे गट म्हणून ही अपेक्षा आहे की , आयुक्त साहेबांचे इतके कडक स्पष्ट निवेदन व्हावे की २४ तासाच्या आत ४८ तासाच्या आत हया केसचा निर्णय लावू. शिक्षा कुणाला किती करावं हा नंतरचा विषय आहे. निर्णय लागुन तर सभागृहाला खात्री व्हायला पाहिजे की आपण रामराज्याकडे चाललो आहोत म्हणून.

**रक्षा शहा :-**

बरोबर आहे साहेब, आणि न विचारता मी केबीनमध्ये फक्त शिरले होते संध्याकाळी मी त्या कामाबाबत गेलेली नव्हती. खाली मला त्यांनी बघुनच जाकारा दिला आहे. म्हणजे तुम्ही काय कामासाठी आला आहात ते सुद्धा ते बोलले नाही. असे उत्तर ते अधिकारी देऊ शकतात का?

**मा. आयुक्त :-**

सन्मा सदस्यांच्या बाबतीत जो प्रसंग घडलेला आहे आणि त्या प्रसंगाच्या अनुषंगाने जी चर्चा झालेली आहे. रोहिदास पाटील साहेब या प्रकरणाचे साक्षीदार आहेत असे त्यांनीच म्हटलेले आहे आणि आमचे उपआयुक्तही सांगत होते की आपणही त्यावेळेला तेथे होता म्हणून नक्की काय घडले आहे ते तुम्हाला तिघा चौघांनाच याच्यातील माहित आहे. काय अपशब्द वापरले, निश्चित काय झालेले आहे प्रत्यक्षात ज्या प्रकरणावरती निर्णय दिला गेलेला आहे की तशा प्रकारची दुसरी प्रकरणे केली गेली आहेत आणि हयांच्याच प्रकरणाला नकार दिलेला आहे. हा जो मुळ मुद्या आहे हा देखील मी तपासून घेतो. दुसरी गोष्ट जर असा अपशब्द वापरला असेल त्यांनी तर त्याचा त्यांनी खुलाशामध्ये नकार दिलेला आहे. की मी अशा प्रकारचे कुठलेही काही बोललेलो नाही. आता पुष्कळ चर्चा झाली. उपमहापौरांनी त्याचा समारोप करतांना अतिशय मौलिक सुचना केल्या की जर खरोखर असे घडत असेल, सदस्यांच्या भावना दुखवण्याचा प्रसंग अधिकाऱ्यांकडून वारंवार येत असेल तर तश्या प्रकारच्या सक्त सुचना मी माझ्या सर्व अधिकाऱ्यांना देईन आणि मला जर असे आढळले की नाईक साहेबांना देखील याच्यामध्ये काही सुचना द्याव्या वाटल्या तर मी त्यांना देखील यापुढे सर्व सन्मा सदस्यांशी नम्रपणाने वागण्याचा आणि इतर सदस्यांना नम्रपणाने वागण्याच्या, जी कामे कायदेशीर असतील ती नक्कीच होतील परंतू जी न होणारी कामे आहेत काही कायद्यात बसत नसतील तर ती आपल्याला पटवून देण्याचा प्रयत्न हा अधिकाऱ्यानी केला पाहिजे अश्याप्रकारे परिपत्रक मी ताबडतोब काढतो आणि यापुढे असा प्रसंग घडणार नाही. याची मी आपल्याला हमी देते धन्यवाद !

**मा. महापौर :-**

आता हा विषय संपलेला आहे. मा. आयुक्ता साहेबांनी पण या विषयावर सांगितले आहे व उपमहापौरांनी पण सांगितले आहे.

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मला फक्त एवढेच म्हणायचे आहे की सर्वाबरोबर त्यांनी चांगल्या पद्धतीने वागायला पाहिजे. माझे म्हणणे असे आहे की संध्याकाळी मला त्यांनी कमीत कमी विचारायला पाहिजे होते की मी कोणत्या कामासाठी आलेली आहे.

**शशीकांत भाईंर :-**

मा. महापौरांची परवानगी असेल तर प्रश्नात्तराचा तास संपलेला आहे फक्त मला दोन तीन मिनिटे बोलायचे आहे. आज प्रश्नात्तराच्या तासामध्ये २५ नंबरचा जो प्रश्न आहे. त्यापासून जी प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत ती पुढील सभेत घेतली जातील असे सरळ सरळ उत्तर दिलेले आहे. आपले अधिकारी सक्षम नाहीत का आता उत्तरे द्यायला असे का घडते त्यावर आम्हाला उपप्रश्न विचारायचे असतील तर त्यावर अभ्यास आम्ही करू शकतो की नाही.

**मा. आयुक्त :-**

हे प्रश्न दोनतीन दिवसच अगोदर आलेले आहेत काही माहिती त्याच्यामध्ये काढायची आहे त्यामुळे चुकीचे उत्तर देण्यापेक्षा थोडी वेळ मागून घेतलेली कधीही चांगली आपल्याला सविस्तर उत्तरे दिली जातील.

**सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय आजच्या सभेसाठी दोन रजेचे अर्ज आलेले आहेत. सन्मा सदस्य प्रफुल्ल काशीनाथ पाटील व श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे यांचे दोन रजेचे अर्ज आलेले आहेत प्रकरण क्र. १ दि. ११/२/०३ व दि. २४/२/०३ रोजीची महासभेत इतिवृत्तांत कायम करणे बाबत.

**रिटा शहा :-**

मागच्या सभेला पेजवाईज सुरू केले होते पेज क्र. १ पासून सुरू करावे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, पेजवाईज मागच्या सभेला अशा साठी जर कुठे करेक्शन असेल किंवा कुठे ओमीशन असेल आणि ते ॲड करायचे असेल तर तेवढया पुरताच पेजवाईज जायला सांगितले होते.

**रिटा शहा :-**

गेल्या वेळी असे ठरले होते की पहिल्या पेजपासून सूरू करायचे पहिल्या पेजमध्ये कोणाचे ऑबजक्शन नसेल तर ते पास करा. मग गेल्यावेळी मी उठली होती तेव्हा मला मध्येच बसवले होते. पेज वाईज घ्या. म्हणून पेज क्र. १७ साहेब पहिला सभागृह नेत्यांना आपण विचारा की त्यांना कसे काय करायचे आहे कारण या ठिकाणी रूलींग कोण पण कशी पण देतात.

**उपमहापौर :-**

मला असे वाटते इतिवृत्त साधारण शंभर पानांचे आहे आणि पेजवाईज मोजायचे असेल तर आपल्याला सर्वांना केजी क्लास इथे सुरूवात झाली असे वाटेल.

**रिटा शहा :-**

साहेब हे केजी क्लास की नर्सरी नाही चालले संपुर्ण शहराचा प्रश्न आहे याच्यामध्ये

**उपमहापौर :-**

पान क्र. ३ रोहित सुवर्णा काय सुचना आहे आपली सांगा लवकर

**रोहित सुवर्णा :-**

लाईन नंबर दोन भाईंदर वासीयांतर्फे आदरांजली वाहणे असा शब्द आहे तिकडे मिरा भाईंदर वासीयांतर्फे श्रद्धांजली वाहने असे ॲड केले पाहिजे मिऱ्याचे लोक सोडून गेलेत.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ८ मध्ये माझ्या नावाखाली एकतर संपूर्ण प्रोसिंडींग करीता जे आपले शॉर्टहॅंडचे डिक्टेशन होते माझे असे स्पष्ट मत आहे की आयुक्त साहेब ही गंभीर बाब आहे. सर्वच प्रोसिंडींगमधील मी सांगतोय तुम्हाला एकतर आपली टेपींग होते ते कोण वाचत, नाहीत ऐकत नाही, व्यवस्थित त्यानुसार ते केले जात नाही सपूर्णपणे ग्रॅमॅटीकल मिस्टेक भरपूर आहेत. याबद्दल माझे दुमत नाही. पण आहे किंवा नाही,करावं किंवा नाही करावं ह्या महत्वाच्या शब्दांनी संपुर्ण प्रोसिंडींगचे डेफीनेशन त्याचा अर्थ बदलतो अशा शब्दामध्ये सुद्धा बदल फार मोठया प्रमाणात केले आहेत आणि हे फार घातक आहे. बऱ्याचश्या सदस्यांच्या तोंडों काही गोष्टी घातलेल्या आहेत मी माझे फक्त बोलतो माझ्या मध्ये पान नं ८ एम.जे.पी.चे.पत्र लेखी कळविलेले आहे. तो प्यारा वाचा तुम्ही एकुण १३ प्रस्ताव दिलेले आहेत. तेरा विथ ड्राईंग माझे कवरींग लेटर एम.जे.पी.ला दिले

नगरपालिकेला दिले त्यावेळी आमच्या नगराध्यक्षांना दिले होते. हे प्रस्ताव त्या मॅपमध्ये समाविष्ट करण्यांत आलेले आहेत असे मला एम.जे.पी.चे लेखी पत्र कळविले आहे असे मी बोललोय. त्याच्यानंतर अशी अनेक ठिकाणी हे काम चालु झालेले नाही आहे. असे एकुण तेरा प्रस्ताव मी मिरा-भाईंदरच्या सर्व ठिकाणचे म्हणजेच माझे त्यावेळचे ॲक्नॉलॉजमेंट म्हणजे त्या पत्राचे ॲक्नॉलॉजमेंट काय त्याच्यात लाइनींग काय केल्यात काही कळत नाही साहेब. कसलाही कळविले म्हणजे काय कळवले लेखी कळवले लेखी उत्तर मिळालेय.

**मोहन पाटील :-**

आपली दुरूस्ती आपण सुचवावी.

**मिलन म्हात्रे :-**

आमची आम्ही सुचवतोच, पण संपूर्ण याच्यात आहे नाही तुम्ही रितसर जरा आयुक्त साहेब प्रोसिंडींग स्वतः वाचा आपल्याला त्याची कल्पना येईल तुमच्या उत्तरामध्ये सुद्धा भरपुर अशा गोष्टी आहेत की लाईन वाचल्यानंतर काय कळत नाही काय लिहिले आहे ते.

**रोहिदास पाटील :-**

पुर्ण विराम, स्वल्पविराम

**मिलन म्हात्रे :-**

ते तर सोडून द्या अगदी केला होता, केले आहेत असे नाही काहीतरी विचित्रच भाषा आहे सगळी म्हणूनच मी सांगतो कि ती टेप व्यवस्थित ऐकूण त्याची प्रोसिंडींग लिहीली गेली पाहिजे. नाहितर आमच्या समोर टेप वाजवा आम्ही वेळ देऊ एक दोन तास आपण चेक करूया एकत्र.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम परवानगीने बोलतोय पेज नं. ८ वर मी दशोरे साहेबांना विचारले होते कुठे पाईपलाईन टाकायची त्याचा मॅप किती महिने झाले तरी आजपर्यंत मिळाला नाही त्या दिवशी त्यांनी सांगितले की पंधरा दिवसाच्या आत तुम्हाला देण्यात येईल. आणि मी सांगितले होते की पंधरा दिवसात आतातरी तुम्ही वचन पालन करणार का. बोलले होय. परंतू महिना होऊन गेला मला पत्र अजून मिळालेले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब सभागृहामध्ये जेव्हा लक्षवेधी मांडली गेली. दोन लक्षवेधी मी दिल्या होत्या दोन्ही लक्षवेधीवर चर्चा झालेली आहे. निर्णय झालेला आहे. निर्णयाची ज्या व्यक्तींनी सन्मा. नगरसेवकांनी लक्षवेधी मांडली आहे. त्यांना लेखी उत्तर त्या लक्षवेधीचे दिले पाहिजे कि नाही दिले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

चर्चेमध्ये उत्तर दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चर्चेमध्ये उत्तर सविस्तर आलेले नाही चर्चेचे आलेले आहे. कारण बी.एस.ई.एस. चा आपण निर्णय घेतलेला आहे. आजही बी.एस.ई.एस. आपली माणसे नेमलेली आहेत. नेमलेली माणसे देखील फिरत नाहीत. आजही इलेक्ट्रिकचे पोल बंद आहेत. मला उत्तर मिळाले असते तर मी बी.एस.ई.एस च्या अधिकाऱ्यांकडे गेलो असतो कि आमच्या आयुक्तांनी कबुल केलेले आहे. तुमच्यावर बंधनकारक आहे तुम्ही का करत नाही पण या प्रोसिंडींगमध्ये दोन्ही लक्षवेधीचा निर्णय झालेला आहे. त्याचे मला लेखी स्वरूपात पत्र द्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब पान. क्र. ९ वर आपले जे आता लिओ कोलासो साहेब बोलले थोडे उपरोधक बोलले ते कारण उपआयुक्तांचे स्टेटमेंट आहे. ते मी वाचुन दाखवतो. मा. महापौर महोदय यामध्ये जवळजवळ सतरा अठरा पत्र पाठवलेली आहेत आणि समक्षी नामदार मा. आर.आर. पाटील साहेबांनी समक्ष भेट घेतलेली आहे. त्यांना जिल्हापरिषदेकडून वेळोवेळी त्याची जी किंमत ठरवून देण्याचा प्रस्ताव सुरू होता. जिल्हा परिषदेने मागीतलेली रक्कम न देता मोफत मिळावे म्हणून शासकीय मंत्री लेवलला आहे. कारवाई चालू आहे. काय अर्थ आहे त्याचा जरा बघा.

**मोहन पाटील :-**

ते बरोबर आहे दुरूस्ती सुचवावी.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम पेज क्र. १७ त्याच्या मध्ये दशोरे साहेबांनी स्टेटमेंट दिलेले आहे. माझ्या हिशोबाने मी जेव्हा प्रश्न विचारला होता. तेव्हा त्यांनी असे सांगितले होते की मी नवीन आलेलो आहे. ह्या बद्दल माझा स्टडी नाही. मी स्टडी करून तुम्हाला सांगणार. पण ह्याच्यामध्ये आता असे प्रोसिंडींगमध्ये आलेले आहे कि कोर्टाने असे आदेश दिलेले आहेत की जो पर्यंत निर्णय लागत नाही तो पर्यंत ते कनेक्शन कापायचे नाही कापु नये असा आदेश दिलेला आहे. पण कनेक्शन कोर्टामधून काही निर्णय लागायच्या अगोदर सकाळी १० वाजताच्या अगोदर कनेक्शन कापले गेले होते. मग असा निर्णय झालेला असेल तर त्याचा अर्थ असा झाला की महानगरपालिकेमध्ये एवढा मोठा कॉम्प्लीकेशन झाला तर आपल्या महानगरपालिकेचा एकही अधिकारी कोर्टात गेलेला नाही. आपला वकील सुद्धा तिथे हजर झालेला नहाी. म्हणून कोर्टाने असा आदेश दिलेला असेल कनेक्शन कापु नका कारण कनेक्शन ऑलरेडी जेव्हा तिथे ही केस बोर्डावर आली तेव्हा कनेक्शन कापुन झालेले होते. आणि दशोरे साहेब आता बोलतात कि असा असा निर्णय झाला प्रोसिंडींगमध्ये असे आलेले आहे नेमके खरे काय ?

**दशोरे :-**

ते नऊ कनेक्शन कापण्यात आले होते. त्या दिवशी मी मागच्या सभेला सांगितले होते की याबाबत कोर्ट केस झालेली आहे. आणि कोर्टाने असे असे आदेश दिलेले आहेत आणि आपले जे म्हणणे आहे की कोर्टात कोण गेले होते तर आपल्या महानगरपालिकेतील मिसेसे आपटे ह्या ॲडव्होकेटची नेमणूक केलेली आहे. आणि वेळोवेळी जेव्हा तारीख झाली तेव्हा त्या कोर्टात जाऊन आल्या. मागे २१/३ ला कोर्टाची तारीख होती आता त्यांनी १८/५ ची तारीख दिलेली आहे. आणि कोर्ट केस चालु आहे.

**रिटा शहा :-**

त्या मॅडम कोण आहेत त्या आपल्या वकील आहेत का ?

**दशोरे :-**

होय.

**रीटा शहा :-**

मग आपल्या वकिलांना अधिकाऱ्यांनी सांगितले नाही की सकाळीच कनेक्शन कापली म्हणून मग कोर्टाने असा आदेश कसा दिला कनेक्शन कापु नका म्हणून ऑलरेडी कापुन झाले होते जेव्हा कोर्टाचा निर्णय झाला होता.

**दशोरे :-**

जेव्हा कापुन झाले होते.

**रीटा शहा :-**

मग ॲडव्होकेटने काय केले आणि आपल्या अधिकाऱ्यांनी काय केले

**दशोरे :-**

अधिकाऱ्यांनी जे रिपोर्ट दिले त्याप्रमाणे

**रिटा शहा :-**

मग अधिकाऱ्यांना असा रिपोर्ट दिला आहे. कनेक्शन कापून नाही झालेले आहेत. नाईक साहेबांनी स्वतः एक्सेप्ट केलेले आहे. प्रोसिंडींगमध्ये ते नमुद झालेले आहे की कुठल्याही पॉलीटिकल दबावाखाली आम्ही हे अनधिकृत कनेक्शन लावून घेतले आणि दहाच्या अगोदर केस बोर्डावर येण्याच्या अगोदर ते कनेक्शन कापुन घेतलेले आहे. मग तुम्ही काय आणि तुमच्या जागेवर जे काही अधिकारी होते त्यांनी सांगितले नाही का ॲडव्होकेटला.

**दशोरे :-**

कोर्टाने जे आदेश दिले ते.

**रीटा शहा :-**

कोर्टांनी आदेश कसा दिला आपल्या रिपोर्टवर आदेश देते कोर्ट

**दशोरे :-**

देतो पण आता जू कोर्टाने आदेश दिलेले आहेत ॲज इट इज जसे आहे तसे.

**रीटा शहा :-**

तुम्ही आपल्या चुका मान्य करत नाही  कोर्टावर टाकतात. कोर्टात आपण जे सादर करतो त्याच्यावरच कोर्ट निर्णय देते. मग आपल्या अधिकाऱ्यांनी केले काय आणि आपल्या वकिलाने केले काय.

**दशोरे :-**

तेव्हा जे रिपोर्ट हेते त्या बेसीसवर जसे कोर्टाने आदेश दिले.

**रीटा शहा :-**

आता त्या कनेक्शनचे काय एफ.आय.आर.  दाखल केला का तुम्ही.

**दशोर :-**

आपण जे कनेक्शन दिले होते त्याप्रमाणे रेग्युलर होते.

**रीटा शहा :-**

रेग्युलर नव्हते कोर्टाच्या बोर्डावर ती केस यायच्या अगोदर ती कनेक्शन कापून झाली होती.

**दशोरे :-**

कोर्टाच्या निदर्शनास आलेले आहे. कोर्टाने तसा स्टे दिला आणि कोर्ट केस चालू आहे. तो पर्यंत आपण काही करू शकत नाही त्यांनी १८/५ ची तारीख दिलेली आहे.

**रीटा शहा :-**

ते कनेक्शन पहिला कापून झाले होते. स्वतःच्या बळावर त्यांनी कनेक्शन परत लावून घेतले आहे. मग महानगरपालिका काय करते. कंटेप्ट ऑफ कोर्ट झालेला आहे तिथे. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे, शासन आणि प्रशासनाचा तेथे नेमका कचरा झालेला आहे आणि तुम्ही अशी उत्तरे देता तुम्ही कोर्टावर. मग तुम्ही लोक काय करता आहात.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब.

**रीटा शहा :-**

साहेब मला एक बोलायचे आहे की जो काय रूलिंग करायचे असेल तो डायस वरून करावा. लिओ कोलासो साहेब इथे महापौर नाही आहेत सर्व गोष्टीत ते उठतात. माझ्या प्रश्नामध्ये उठायची त्यांना गरज नाही.

**लिओ कोलासो :-**

मी आपणाशी बोलत नाही मी मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय साहेब हा कामकाजाच्या पद्धतीचा विषय आहे. रीटा शहा साहेबांनी जे काही प्रश्न विचारलेले आहेत ते बरोबत आहेत ते कंप्लायंशी सबंधीत आहेत. आम्हाला विषयाप्रमाणे प्रोसिंडीग मंजूरीचा विषय आहे की त्या सभेमध्ये घडलेल्या घटना, बोललेली वाक्ये जशीच्या तशी आहे. तंतोतंत आहेत. वाक्य खरी आहेत खोटी आहे. ह्यांच्यानंतर मी मा. महापौरांच्या माध्यामांतून सांगेन की हे जे सर्व सभागृहात चाललेले आहे त्यामध्ये आपल्या प्रशासनाचा एक त्रुटीचा भाग आहे की एका मिटींगमध्ये २५,३०,४० कमेंटमेंटस् होतात आपण सभासदांना उत्तरे देतात कि हे करण्यात येईल. केले जाईल, ॲक्शन घेण्यात येईल. तोडण्यात येतील पाडण्यात येतील पण त्यांचे कंप्लायेंस रिपोर्ट सुद्धा प्रोसिंडिंगमध्ये सोबत आपण पुढच्या सभेपासून द्या म्हणजे हा प्रश्न निर्माण होणार नाही.

**रीटा शहा :-**

साहेब ते बोलतात तसेच मी सांगितले कारण दशोरे साहेबांनी तेव्हा मला असे उत्तर दिलेले नव्हते त्यांनी सांगितले होते की मी नवीन इंजिनीअर आहे. ह्याच्यावर माझे जास्त काही रिडींग नाही. पुढच्या मिटींगला मी सांगणार आणि ह्याच्यामध्ये असे नमुद झालेले आहे. कोर्टाने असे असे सांगितले आहे. त्याच्यावर माझे ऑबजेक्शन आहे.

**दशोरे :-**

मा. महापौर साहेत मी असे नव्हते सांगितले की मी नवीन आहे. जेवढी माहिती उपलब्ध होती तेवढी मी तेव्हा दिलेली होती.

**रीटा शहा :-**

तुम्ही तेव्हा सांगितले नव्हते की याचा स्टे आहे आणि कोर्टाने तसे आदेश दिलेले आहेत की कापु नका म्हणून कोर्टाने केव्हा आदेश दिला कापु नका म्हणून त्याची तारीख टाका त्याच्यामध्ये कुठल्या तारखेला कोर्टाची आर्डर झालेली आहे.

**दशोरे :-**

आपल्या पत्राचे उत्तर मा. सचिवांनी दिलेले होते.

**रीटा शहा :-**

कोर्टाचे आदेश मलाही मान्य आहे. तुम्ही कोर्टाच्या आदेशाची तारीख टाका ह्याच्यामध्ये.

**दशोरे :-**

कोर्टाच्या आदेशाची तारीख टाकतो.

**मा. आयूक्त :-**

त्याची जी ऑडीओ टेप आहे ती ऐकु आणि त्यांनी काय उत्तर दिलेले आहे. ते मिनिट्स मध्ये तसे रेकॉर्ड करू .

**रीटा शहा :-**

आणि जेव्हा मी उठते हे असे नाही ते चुकीचे चालले आहे महापौर मॅडम आदेश देतील तो मला मान्य आहे. इकडचे नगरसेवकांनी उठून मला बसावयचा प्रयत्न केला तर मी बसणार नाही. तेवढेही सांगून देते. कारण महापौर फक्त इथे एकच आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगी बोलतोय मी आपल्याला दोनतीन वेळा विनंती केली होती, की जो दिलीप पोरवालच्या बाबतीत गुंड हा शब्द वापरला हा शब्द प्रोसिंडींगमधून काढून टाकावा अशी मी तुम्हाला दोनतीन वेळा विनंती केली होती. तुम्ही त्यावेळेला असेही बोलले होते की काढला जाईल. पण गुंड हा शब्द प्रोसिंडिंगमधून काढला गेला नाही. तर पुन्हा माझे ऑबजेक्शन आहे. की गुंड हा शब्द एका व्यापाराच्या बाबतीत वापरला आहे. तर तो प्रोसिडिंगमधून काढावा. आणि यापुढे सुद्धा महापौरांनी लक्षात ठेवावे जो व्यापारी असेल जो इन्कमटॅक्स भरत असेल, प्रतिष्ठीत असेल त्याच्याबाबतीत असे अपशब्द कोणताही सभासदांनी वापरले गेले तर आम्ही सुद्धा खपवून घेणार नाही. आणि महापौरांनी ते शब्द प्रोसिंडिंगमध्ये घेऊ नये याची गंभीर नोंद घ्यावी अशी नम्र विनंती करतो.

**तुलशीदास म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो एखादया व्यक्तींने जर चोरीची कनेक्शन लावलेली असतील आणि तो किती ही टॅक्स भरणारा असेल तर ते चालणार नाही. त्याला चोरच बोलले पाहिजे.

**मिलन पाटील :-**

त्याला कोर्टाने चोर बोललेले नाही त्याला आदेश दिले आहेत का तर तुम्ही त्याला चोर बोलूच शकत नाही. चोर म्हणून कोर्टाचे आदेश आहेत तसे आणि कोर्टाने पुन्हा त्याला कनेक्शन जसे आहेत तसे लावण्याचा आदेश दिलेला आहे तर तो चार होऊच शकत नाही. त्याला ॲथोराईज मुनिसीपालीटीने दिलेले आहेत. मुनिसीपालीटीने ताबडतोब त्याच्यावर पोलिस कारवाई केली असती. हे ॲथोराईज आहे म्हणून मुनिसिपालीटी गुपचुप बसलेली आहे. आणि मुनिसीपालीटीमध्ये त्यांनी रीतसर काम केलेले . कोर्टाचा आदेश आहे त्याच्या बद्दल तो गुड होऊ शकत नाही. आयुक्तांनी कधीच त्याच्यावर कारवाई केली असती कारण हे चोरीचे कनेक्शन नाही.

**रीटा शहा :-**

चोरीची कनेक्शन नाही मग नाईक साहेबांनी ते कसे मान्य केले की कुठल्याही पॉलीटीकल प्रेशरखाली मी कनेक्शन लावले आहे आणि म्हणून मी कापून घेतो.

**मिलन पाटील :-**

ते त्यांनाच विचारा.

**रीटा शहा :-**

मी त्यांना कशाला विचारू मी डायसवर विचारणार, महापौरांना विचारणार कोणाला विचारायचे ते मला समजते.

**तुलशीदास म्हात्रे :-**

त्या बिल्डींगध्ये लोकसुद्धा राहत नाहीत  आणि तिथे नऊ कनेक्शन बेकायदेशीर लागतात आणि एखादा सदस्य आरोप करतो तर एखादया व्यक्तींनी त्याला खर म्हणजे साथ द्यायला पाहिजे. आपल्या नगराचे आर्थिक नुकसान होते. अशा तऱ्हेने सवयी आपण कुठेतरी मोडल्या पाहिजेत.

**मिलन पाटील :-**

माझे ऑब्जेक्शन फक्त गुंड हा शब्द वापरला आहे त्याबाबत आहे. बाकी त्याच्या कनेक्शनच्या बाबतीत शासन किंवा मुनिसीपालीटी काय असेल ते बघुन घेईल तो प्रश्न माझा नाही. माझे फक्त गुंड ह्या शब्दालाच ऑब्जेक्शन आहे.

**रीटा शहा :-**

मिलन पाटील साहेब एकदा बोलतात त्याच्याशी काही प्रश्न नाही परत सांगतात की ते कायदेशीर आहे. मग कायदेशीर आणि बेकायदेशीर शाबीत कोण करणार आहे.

**मिलन पाटील :-**

मॅडम अजून तुम्ही रुलींग दिलेली नाही हा शब्द तुम्ही की नाही प्रोसिडींगमधून.

**मा. महापौर :-**

हो तो शब्द काढणार प्रोसिंडींगमधून.

**मिलन पाटील :-**

धन्यवाद !

**मिलन म्हात्रे :-**

पेज नं. १६ मध्ये उच्च पाण्याच्या टाक्या संदर्भात मी बोललो होतो सभागृहामध्ये जेवढया उंच पाण्याच्या टाक्या आहेत. असे मी बोललो होतो. त्याच्यात फक्त उंच टाक्या, टाक्याच आहे उल्लेख केलेला आहे. फारबरब्रिगेटच्या संदर्भात झाले होत. आपल्या नियोजित उंच पाण्याच्या ज्या टाक्या आहेत. नियोजित आणि एक्झिटींग हा संपूर्ण प्यारेग्राफ त्याच्यामध्ये टाक्या भरलेल्या असून सुद्धा खाली करण्याची व्यवस्था फायरब्रिगेटमध्ये टाकी भरण्याची व्यवस्था नाही हे शब्द वगळले आहेत. इनलेट आऊटलेट याद्वारे अग्नीशमन बंबामध्ये पाणी भरण्याची व्यवस्था ही अगोदर व्यवस्था करा असे म्हटलेलो आहे. संपूर्ण प्यारेग्राफ त्याला काही मिनिगच लागत नाही. पान क्र. २६ मध्ये माझ्या सेकंड प्यारेग्राफ मध्ये नॉनसेलचे प्लॅट आहेत व त्याची गेल्या दहा वर्षामध्ये टॅक्सेशन  बिल्डर लोकांनी दिलेले नाही  आहेत वगैरे असे दिले आणि ती आपण काउंट करता तर काऊंट करत नाही असे मी बोललेलो आहे म्हणजे आपल्या हिशेबाला ती नाही आहेत.

**रीटा शहा :-**

मा. महापौर मॅडम पान क्र. ३४ मध्ये मागच्या वेळी मी कर आकारणी बाबत एक विषय उपस्थित केला होता. त्याच्यामध्ये साहेबांनी मला उत्तरही दिले होते की नगररचना विभागाकडे पाठवणार आणि त्याचे उत्तर येणार साहेबांना मी समक्ष जाऊन भेटले तेव्हा साहेबांनी मला सांगितल कि पहिल्या प्रकारे चालले आहे तसे ते करून देणार असे आपण मला उत्तरही दिले होते नंतर मी विजय पाटीलकडे गेली होती अधिकाऱ्यांची आम्ही काय कंप्लेंन्ट करत नाही मला असे वाटते की वरचे लेवलचे अधिकारी आणि खालचे लेवलचे अधिकारी यांच्यामध्ये काहीतरी तालमेल नाही. काहीतरी यांचे कंफ्युजन आहे. मला असे सांगितले की आयुक्त साहेबांनी काही आदेश दिले नाही ते लेखी तोंडी नेहमी अशीच उत्तरे देतात मग नेमके खर काय आहे. मी कोणाची नागरीकांची बाजू घेत नाही फक्त शासनाने क्लिअर करावे कि कर आकारणी कशाप्रकारे तुम्ही घेणार. ज्या लोकांची जुनी आकारणी आहे त्या प्रमाणे त्यांना जुन्या रेटने लावणार आहेत.  कि रेग्युलर रेटने लावणार आहात हे कंन्फ्यूजन एकदा महासभेमध्ये तुम्ही डिक्लर करून ते सोडवून द्या. साहेब आपण मला याचे उत्तर नाही दिले कारण मी आपल्याला समक्ष येऊन भेटली होते.

**मा. आयुक्त :-**

याचे उत्तर त्याही वेळेला मी दिलेले होते. की ज्यावेळी आपण असेसमेंट करतो त्यावेळचा जो प्रचलित दर असेल त्या दरानेच ती असेसमेंट करायची आहे. असे कायदा सांगतो आणि तसे आदेश मी त्यांना दिलेले आहेत.

**रीटा शहा :-**

मी आपल्या कार्यालयात समक्ष भेटायला आली होती तेव्हा आपण मला उत्तर दिले होते की मॅडम ज्या लोकांचे प्रकरण असे पेंडींग आहे जसे ९८ ला राहायला आहेत आणि आता आपल्याकडे अर्ज केलेला आहे. तर त्या बिल्डींगमध्ये काही लोकांना अगोदर पहिला लावलेला आहे ९८ पासून

जो रेट लागला होता तो लावला आहे. तेव्हा आपण मला सांगितले तश्या प्रकाराने पहिले चालले होते त्याप्रकारे जेवढी प्रकरणे पेंडीग आहेत. ती करून घ्या पण माझ्याकडे अशी प्रकरणे नाही.

**मा. आयुक्त :-**

ज्यांचे ॲप्लीकेशन असतील आणि ते आमच्याकडे पेंडींग असतील त्याच्याबाबतीमध्ये ती निर्णय होईल.

**रीटा शहा :-**

ॲप्लीकेशन आहेत. त्याच्यामध्ये अधिकाऱ्यांचा काहीतरी कंन्फ्जून आहे ते आम्हाला परत तारखा सांगतात हे सांगतात ते सांगतात म्हणजे त्यांचे कन्फ्यूजन आपण दूर करा.

**कैलासबेन जानी :-**

पान क्र. २५ वर बोलू इच्छिते रोहिदास पाटील यांनी सांगितले आहे. की कोर्टाच्या निदर्शनास आलेले आहे. टॅक्सबाबत तर ही चर्चा टॅक्सबाबत बरीचशी झालेली आहे तरी नक्की का ठरवले आहे.

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र. ३८ मध्ये ओळ क्र. १० त्याठिकाणी तत्कालीन चिफ सेक्रेटरी विजय देशमुख असे झालेले आहे. विजय देशमुख ऐवजी बी. जी. देशमुख असे मी बोललो होतो.

**रीटा शहा :-**

पान क्र. ५६ वर मी विचारले आहे माझ्या ठरावाचे काय झाले. त्या ठरावाबाबत मला अजून उत्तर मिळाले नाही. मला फक्त बोलायचे आहे की तो ठराव झालेला होता. माझे अनुमोदन पण झालेले होते आणि तो ठराव पेंडींग होऊन मिटींग पेंडीग झाले होती तेवढीच मला आठवण द्यायची आहे आपल्याला.

**उपमहापौर :-**

आयुक्त साहेब मला असे वाटले की मागे सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी जी सुचना मांडली ती अतिषय चांगली आहे कि इतिवृत्तांतासोबत कंप्लायेंस रिपोर्ट दिले पाहिजेत याची आपण काळजी घ्यावी.

**सचिव :-**

२४/२/२००३ चे इतिवृत्तांत तपासावे.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ८ वर फार मजेशीर बाब झालेली आहे कारण माझ्या माहिती नुसार आपल्या सभागृहातील सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहाण हे आचकलीत मराठी ऐवढे फार वेळ बोलू शकतात हे ह्याच्यावरून कळून येते कारण याच्या खाली हिंदीमध्ये आहे सगळे त्यांचे आणि वरचा फार मोठा प्यारेग्राफ मराठीमध्ये आहे. त्याच्या मराठीची बाराखडी फार चांगली येते त्यांना. हा अनुवाद केला आहे. कोण डिक्टेक्टर आणलाय की ते कुठे जाऊन मराठी व्यवस्थित शिकून आलेत जरा ती कॅसेट वाजवा आणि त्याच्यात ट्रान्सलेटर बसवलाय का बघा. सभागृहात हिंदीत बोलतात पण पान भरून सगळं मराठीत आलेले आहे आणि हे जसेच्या तसे खाली हिंदीत लिहीले आहे. आणि वरचा अख्खा प्यारेग्राफ मराठी मध्ये आहे. धन्य आहे आपली डिक्टेक्टर हे जे सगळे आहे त्यांचे नेहमी हिंदीमध्ये वचन असते कारण काही सदस्य आमचेही हिंदी भाषीक आहेत.

**रीटा शहा :-**

मा. महापौर मॅडम पान क्र. २५ मध्ये मी त्याबद्दल आपल्याला पत्रही दिलेले आहे. आयुक्त साहेबांना, उपमहापौरांना, मा. मुख्यमंत्री, नगरविकास खाते, जिल्हाधिकारी, उपमुख्यमंत्री ह्यांना सुद्धा पत्र दिलेले आहे. हे पत्र देऊन काय असते नाही आपण डायसवर बसता आम्ही आपला मान ठेवू आपण आम्हाला बसायचा आदेश दिला तर बसु सुद्धा पण एक महिला नगरसेविका जेव्हा उठली त्याचा तुम्ही विरोध करा, चर्चेचा विरोध करा, माझ्या विषयाचा विरोध करा. हरकत नाही मला. मला बसवण्याचा प्रयत्न देखील करा कारण मी जास्त बोलतोय असे ऐकले आहे. सात वर्षे गप्प होते आणि आता जास्त बोलते असाही आरोप माझ्यावर आहे हे मी ऐकले आहे पण एका महिला नगरसेविकाच्या घरात मला हसबंड दिला की आदमी दिला त्याला मी शिवू शकली नाही आणि बांधू शकली नाही हे प्रश्न उपस्थित करायचा मी अधिकार कोणत्याही नगरसेवकाला दिलेला नाही. आणि असा अपमान महेंद्रसिंग चौहाण यांनी माझा केलेला आहे आणि आपण त्याबाबत काय ॲक्शन घेतली आणि त्यांना मी आज भर सभागृहामध्ये सांगते अश्या माणसाला नगरसेवक होण्याचा अधिकार

नाही आणि हाऊसमध्ये बसायचा सुद्धा अधिकार  त्यांना नाही. आपण अजूनपर्यंत त्याबद्दलचा काय निर्णय मला दाखविला नाही. सांगितला नाही आणि लेखी उत्तर सुद्धा मला दिलेले नाही. आपण महिला दिनाच्या दिवशी माझा सन्मान ठेवलेला होता मुद्दाम मी नाही आली तिकडे मला नंतर शाल आणि सर्टीफीकेट आले मला सर्टिफिकेट्सची गरज नाही. ह्या सभागृहामध्ये आपण पण एक महिला आहात आणि या शहराची आपण प्रथम महिला महापौर आहात आणि महिला नगरसेविकेचा अपमान म्हणजे आपला स्वतःचा अपमान आहे आणि आपण त्याबद्दल काय निर्णय घेणार  आहात ते पहिले सभागृहामध्ये सांगा आणि आता मला परत हे सांगू नका की प्रोसिडींग मंजूरी आहे आणि याच्यामध्ये असा विषय नाही आणि तसा विषय नाही एका महिलेच्या अस्मितेचा प्रश्न आहे. आपण आपला अधिकार वापरून याबाबत निर्णय देऊ शकता.

**धनराज अग्रवाल :-**

मेरी एक सुचना है की इस तरह के आऊट ऑफ जो कोई बातचित होयेगी वो आप स्टडीकरके उसको निकाल देना चाहिए जो विचारविमश जो सभागृहके लिए, गाव के लिए, विकास के  लिए, जो कोई मुद्दे है वो ही प्रोसिंडींग मे आने चाहिये इस तरह के मुद्दे प्रोसिडींगमे आने नही चाहिए ऐसा मेरा सुझाव है.

**रीटा शहा :-**

साहेब माझा प्रश्न असा नाही मी कोणाला घाबरत नाही प्रोसिंडींग मध्ये आले तर मला काही फरक पडत नाही जे काय जिवंत आहे मिरा भाईंदर मध्ये ते माझ्या बद्दलचे वैयक्तिक सर्व लोकांना माहित असते मी काय अंधारात सिक्रेट जाऊन कामे करत नाही. माझा काय वैयक्तिक मामला आहे ते लोकांना आणि मलाही माहित आहे. पण सभागृहाचा तो विषय नाही माझ्या घरात काय चालले आहे. आणि माझ्या घराचा प्रश्न काढलेल्या नगरसेवकाला या हाऊसमध्ये बसायचा काहीच अधिकार नाही आणि त्याबाबत निर्णय महापौर मॅडमनी घेतला नाही तर या सभागृहासमोर उपोषणाला बसायची माझी तयारी आहे. कारण द्रौपदीचे चिरहरण झाले आणि ते इतिहासामधून काढून टाकले म्हणून इतिहास संपला नाही एका नगरसेवकांनी एका महिलेच्या अस्मितेचा अपमान करायचा प्रयत्न केला उदया दुसरा नगरसेवक करणार आतापर्यंत तुम्ही त्यांना नोटीस तरी पाठवली आहे काय.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर मॅडम जेष्ठ नगरसेविका रीटा शहा ह्यांच्या बद्दल असे अपशब्द वापरला गेल्यानंतर पुढच्या सभेमध्ये देखील हा विषय आला त्यावेळेला महेद्रसिंग चौहाण साहेब यांनी सांगितले माझा तसा बोलण्याचा उद्देश नाव्हता परंतू ज्या प्रकारे तो उल्लेख केला गेला त्यावरून सभागृहामध्ये महिला नगरसेविकेचा नव्हे तर संपुर्ण महिलांचाच अपमान झाल्याचा प्रकार त्या दिवशी घडला याबाबत महेंद्रसिंग चौहाण साहेब यांनी देखील मोठेपणा दाखवला होता आणि मी असे बोललो नाही मला कोणाला दुखवण्याचा माझा प्रयत्न नव्हता परंतू त्यावेळेला त्यांनी त्या विषयावरती दिलगीरी व्यक्त केली असती तर त्यादिवशी हा विषय संपला असता त्यानंतर आमच्या पक्षाच्या जेष्ठ नगरसेविका रीटाजी शहा यांनी सदर बाब महापौर मॅडम, आयुक्त साहेब यांच्याही निदर्शनास आणलेली आहे आणि आज हा विषय संपण्यासाठी महेंद्रसिंग चौहाण साहेबांनी थोडासा मनाचा मोठेपणा दाखवुन आज या सभासगृहासमोर दिलगीरी व्यक्त करावी आणि याच्यापुढे कुठल्याही नगरसेवकांना आपण काय बोलतोय आणि याच्यामुळे कोणाला किती त्रास होईल याचा विचार करावा आणि हा प्रश्न समोपचाराने मिटवून घ्यावा नाहीतर अनाठायी त्याला एक वेगळे स्वरूप येईल आणि पुन्हापुन्हा तो विषय चर्चेला येतोय तर तो का येतोय तो कसा आपल्याला संपवता येईल याबाबत आयुक्त साहेबांनी तातडीने हालचाली करायला पाहिजे.

**हेरल बोर्जिस :-**

सन्मा. महापौर साहेबा पान क्र. २५ वर सन्मा. सदस्या रीटा शहा यांनी सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण यांच्याबाबत चौहाण साब आपण प्युन नाही आहात तर एक सन्मा. सदस्य याची तुलना एका प्युनच्या बरोबर केली जाते तर हे सुद्धा सभागृहामध्ये आक्षेपार्ह व्यक्तव्य आहे.

**रीटा शहा :-**

साहेब मी प्युन बोलली ते बरोबर आहे त्यांनी सांगितले रीटा शाहांनी चहा नाही आणला कॉपी नाही आणली मी प्रश्न चहा कॉपी बाबत विचारत नाही आपण नेहमी मला पॉईन्ट करा मी चहा कॉपी बाबत आणि नास्ताबाबत कधीही विचारत नाही. प्रोसिंडींगच्या कॉप्या काही चहा कॉफी नसते. ते सुद्धा जेष्ठ आहेत आणि पॉलीटीक्स मध्ये एम.ए. केलेला आहे आणि प्रोसिडींगच्या कॉपीला चहा कॉफी समजत असतील तर ती दुखाची गोष्ट आहे. मी त्यांना सिनिअर मानले आहे आणि

सिनिअर मानत आहे. नेहमी त्यांना सन्माननीय सांगते पण नेहमी नेहमी माझ्या विरोधात उठतात त्याचे पण मला दुख नाही कारण ते मला बसावयाचा प्रयत्न करतात. पण प्रयत्न फक्त विषयाच्या आधारावर करायचा माझ्या घरात आदमी दिलेला आहे की नाही दिलेला आहे त्याचे महत्वाचा विषय इथे नाही की माझ्या घरात किती आदमी आहे आणि आहे की नाही मी स्पष्ट बोलते मला कोणाची लाज वाटत नाही. जेव्हा नगराची सेवा करायला मी बाहेर निघाली आहे तर माझे वैयक्तीक आणि कॅरेक्टर काढायला मी अधिकार दिलेला नाही अश्या प्रकारचा आणि मा. महापौर मॅडमने यांनी त्याचा निर्णय द्यावा आपल्या अधिकाराचा वापर करून त्या स्वतः एक महिला आहेत मी मान्य करते ना मी त्यांना बोलली आणि कशाला बोलली त्यांनी असे सांगितले की रिटा शाहनी चहा कॉफी आली नाही हे आले नाही ते आले नाही तो त्यांचा लुकआऊट नाही मी चहा कॉफी बद्दल विचारले नाही इथे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर यांच्या परवानगीने बोलू इच्छितो या ठिकाणी सन्मा सदस्य महेद्रसिंग चौहाण साहेब यांच्या विषयी जे वक्तव्य या ठिकाणी दिलेले आहे. त्याबद्दलची चर्चा सुरू आहे. चर्चेमध्ये सन्मा सदस्या रिटा शहा यांनी महिल्यांच्या विषयी आदर केला पाहिजे अशा पद्धतीचे याठिकाणी त्यांनी वक्तव्य केलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन झाली त्याच्यानंतर सभगृहामध्ये आमच्या सहकारी म्हणून त्यांनी याठिकाणी काम केलेले आहे आणि हे काम करीत असताना शहरामध्ये विकास कामे व्हावीत आणि या सभागृहातून चांगला मॅसेज या शहरामध्ये गेला पाहिजे अशा पद्धतीने दहा वर्ष सन्मा. सदस्या रीटा शहा आणि आम्ही यांच्याबरोबर याठिकाणी प्रशासकीय काम याठिकाणी केलेले आहे यावेळी सन्मा. महापौर म्हणून महिला या ठिकाणी आहेत. महिलांचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाला आपण गेला नाहीत असे आपण नमुद केलेले आहे. परंतु महिला महापौर असताना महिला दिन व्हावा या चांगल्या हेतूने आपल्याला बोलावले होते. आपल्याला जरूर तो राग असेल परंतू ह्या सर्व बाबतीचा विचार केल्यानंतर प्रोसिडींगमध्ये जे काही वक्तव्यआहे ही वक्तव्य प्रोसिंडींगमध्ये यायला नाही पाहिजेत. परंतू सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण यांनी त्याच्याखाली सांगितले आहे की माननीय सदस्या मी आपल्याबद्दल काहीही बोललेलो नाही. मी आपला आदर करतो मी कोणत्याही महिलेबाबत एकही शब्द बोललेलो नाही कारण मी आपला सन्मान करतोय आपण माझे नाव देखील घेऊ नका मा. महापौर मॅडम मी कोणत्याही महिलेचा अपमान केला नाही मी फक्त त्यांनी बोललेले शब्दच पुन्हा बोललेलो आहे देवाने सर्वांकडे दिला आहे एक एक व्यक्ती तोंड शिवायला आणि खोलायला परंतू मी कोणत्याही महिलेचा अपमान होईल असा एकही शब्द बोललेलो नाही अशा पद्धतीचे वक्तव्य सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण यांनी या प्रोसिडींगमध्ये नमुद केलेले आहे आणि या सभागृहामध्ये त्यांनी बोललेले आहे. जर या ठिकाणी हे शब्द बोललेले आहेत जे इतिवृत्तामध्ये आलेले आहेत हे शब्द आपण इतिवृत्तामधून काढावेत अशी सुचना मी करतोय आणि कोणत्याही महिलेचा अपमान व्हावा किंवा होईल, होणार नाही याची खबरदारी सन्मा सदस्य म्हणून आम्ही याठिकाणी घेतलेली आहे. याच्या पुढे देखील घेणार आहोत आणि या ठिकाणी जे शब्द प्रोसिडींगमध्ये सन्मा. सदस्या रीटा शहा यांच्या बद्दल आलेले आहेत ते शब्द प्रोसिंडींगमध्ये काढावेत अशी मी सभागृहामध्ये आपल्याला निवेदन करत आहे.

**रीटा शहा :-**

माझे ऑब्जक्शन आहे ते शब्द काढायचे नाही. मी ती मागणी करीत नाही की ते शब्द काढावे. ते शब्द काढल्यानंतर माझा अपमान झाला नाही असे नाही. मी अगोदर पण सांगितले आहे द्रौपदीचे चिरहरण झाले ते तुम्ही इतिहासातून काढूण टाकले म्हणजे संपले असे नसते. झालेले आहे ते झाले आहे. मी त्यांना प्युन सांगितले आहे ते प्युन सांगितले ते मी मान्य करते. पण कशाला सांगितले जेव्हा त्यांनी माझ्या वैयक्तीक मामल्यावर आणि मोहन पाटील साहेब सांगतात की मी कुठल्याही महिले बद्दल ते माझ्या बद्दल नाही सांगितले जेव्हा मुक्ता रांजणकर शब्दाच्या विरोधसाठी उठल्या तेव्हा त्यांनी त्यांना सांगितले ते मला नाही सांगितले त्यांनी माझ्या घरातील आदमी शिवायला दिला कि तोडायला दिला तो त्यांचा प्रश्न नाही. आणि त्यांनी सभागृहामध्ये माझी त्याबद्दल माफी मागावी अशी माझी मागणी आहे.

**महेंद्र सिंग चौहान :-**

मा. महापौर महोदय, मै अपने परवानगीसे बोलना चाहता हूँ काफी देरसे मिनिट्स सुधारणेकी बात चल रही है. मै किसी को बिठानेकी बात नही करता. शहर के विकासके लिए हमेशा बात की है शहरके विकासके अलावा मैने कोई बात नही की पिछली मिटींगमे जब मुझे कुछ

आवश्यक बाते करनी थी. लगातार चालीस मिनिटसे बयालीस बार मा. नगरसेविका रीटा शहा एकीस बार उपआयुक्तने इनका जवाब दिया दसबार आयुक्त महोदयने जवाब दिया, पाच बार आपने रुलींग दिया व्यवस्थाके प्रश्न पे मैने सवाल आपसे पुछके किया मेरा मुँह किसीकी तरफ नही था मै सिर्फ आपकी तरफ देखता हुँ. मैने अपने उत्तरणमे बोलाथा कि कोई मेरा मुँह क्या मा. महापौर मॅडम हम आपके इशारे पे बैठते है हम आपके इशार पे उठते है. हम आपसे बात करते है. अगर आपका इशारा होगा तो बैठ जायेगे आपका इशारा होगा तो चल जायेंगे . सवाल उस बात का नही है मैने किसीका कुछ बात कही . इन्होने क्या क्या कहा अशी माननीय नगरसेवकने मुद्दा गुंडो को उठाया अशी दुसरा मुद्दा मेरे दोस्तने उठाया प्युन का मा. चंद्रकांत वैतीजीने कहॉ मुझे आप शायद भूल गये होंगे मैने फिर भी कहॉ सबकुछ बोलने बावजुद मेरा एक उत्तरण है मै बना देता हूँ आज तक एक वर्ड गलत नही बोला है मेहरबानी करके इसी तरहकी बाते निकाली दी जाय हम नही चाहते हमारे किसी नगरसेवक का कोई अपमान हो या कई किसी को परेशानी हो. मै आप सब लोगोको इतनाही बताना चाहता हूँ कि व्यवस्था के प्रश्नपर मै बोलू या ना बोलू मुझे हाऊस की व्यवस्था चाहिए आप लोगोको अपने काम की बाते सुनानी है एक ही क्वेशन को बयालीस बार चालीस मिनिट मे आप बोलेंगे. हम लोग कहा जाय, हम भी तो नगरसेवक उस एरिया के है . हम भी उस शहर को देखते है आप सबलोग उस शहरको देखते है कौनसी महिला का मैने विरोध किया है. मेरे साथ अठरा अठरा बीस बीस महिलाए चुन के आयी है. हमने कभी आपका सहयोग नही दिया आप मेरे ही वार्ड की नगरसेविका है मेरे हर बॅनर हर पोस्टर मे आपका नाम है. आप नही आती थी तब भी मेरे पोस्टर मे आपका नाम होता था. मैने कौन से दिन आपका विरोध किया है. लेकिन असलीयत के अलावा मैने कुछ भी कही बोला हो तो आप बताइए ये व्यवस्था का प्रश्न मा. आयुक्त महोदय आपने ग्यारह बार जवाब दिया एकही सवाल पर, उपआयुक्त मिस्टर नाईकने एकवीस बार उसी सवालको जवाब दिया. हमको संतुष्टीका कही कुछ सीमा ही नही है क्या. पॉच बार महापौर महोदयाने अपना रुलींग दिया कि आगे काम बढिए. हमारा भी तो एरिया है. हमभी कही ना कही की समस्या लाते है. हम को सुनके का कब मौका कब हमे मौका देंगी. मै तो अभी आपसे परमिशन लेके खडा हुआ उसके बाद शायद लास्ट तक मेरा कोई सब्जेक्ट नही आयेगा बोलनेका. मै नही चाहता की मेरी बात आप न सुने. नही चाहता नगरसेवक मेरी बात ना सुने. मै नही चाहता ये गॉववाले न सुने इनके लिए मै कितना भला चाहता हूँ. एक भी काम मेरा पर्सनला हो बारा सालमे चौऱ्याशीसे लेके अबतक हाऊसमे बोलना हूँ एकभी काम पर्सनल मेरा हो तो आप बता दिजीए विकास के कामो मे शहरके उड्डाण पुल के बारेमे, गार्डनके बारेमे, झाड लगानेके बारेमे सुबह से शामतक हम बोलते है. हमेशा बोलते हे रीटा जी दुनिया पहिले सन्मान करती है मै बादमे इनको जी लगाता हूॅ. उसके बावजुदभी ये इस तर ही की बाते करती है. मैने कहॉ. आपका चिरहरन जैसी कोई बात नही है अगर है भी तो आप अपने दिमागसे निकालीए. आप मेरे सामने रहती है. मेरे रोडपे रहती है. हम लोग आमनेसामने के लोग है. मै कैसे आपका अपमान कर सकता हूँ. ये वर्ड आपने पढा नही के एक वर्ड गलत बोला नही मेहरबानी करके इसतरह की बाते निकाल दि जाय. नही चाहते हमारे किसी नगरसेवक का कोई अपमान मैने कभी आपका अपमान नही किया कृपया बैठीये फॉरन बोला और भी महिलाए और एक भी महिला अगर बोलदे की चौहान साबने किसी के तरफ देखके कोई अपशब्द बोला हो तो मै हाऊस छोडके अरे आपके रहते हुए आप शहर का सौभाग्य है. महिला महापौर है. और मै ऐसे शब्द निकाल सकू लेकिन बोलने लिए विवस्था के लिए, हम सब आपके दिल मे है भी है के हमारा नंबर कब आयेगा अभी उन्होने कितना अच्छा मुद्दा बोला लेकिन आपके अलावा दुसरा कोई बोलता ही नही हाऊस मे. बयालीस बार चाळीस मिनिट में टेप सुनवा दिजिए बयालीस बार अगर नही बोली होगी रिटाजी तो बता दिजिए. एक्कीस बार नाईक साबने जवाब न दिया हो तो बोलिए. आपके यहा जानेके लिए किसनी बार आपकी हाऊस मे आए आयुक्त महोदय. आपने दस बार जवाब दिया उनको महापौर महोदयने पाच बार रुलिंग दिया. किसी तरह संतुष्टी नही. ठिक है. उपमहापौर महोदय मुस्करा देते है लेकिन कहने का मतलब कोई गलत बात नही की. हाऊस मे मैने तभी बोल दिया कि ये बात गलत है तो ये बाते निकाल दि जाय. मैने फिर भी भाई साहब से बोला मराठी ऐसी बात नही चौतीस साल रहते है महाराष्ट्र मे. आप कोई भी बुक लाके बताइए पढके ना बताओ मेरा नाम चौहान नही. साठ लोगोके साथ मराठी लोग है. ऐसे कैसे मै सन्मान करता हूँ आपका आपसे वो बात निकली ये है व्यवस्था कि है. ये नही रीटाजीने कोई बात कही कनेक्शन कटे क्या मै उसका समर्थन नही करता हूँ. मै वहॉ गार्डन बनाया उसका विरोध किया है. वो नगरपालिका का गार्डन है ताबेमे लेना चाहिए लेकिन सवाल उस

बात का नही एकही बात को चालीस बार. चालीस बार मे संतुष्टी नही होती इस तरह से हम लोग क्या करे . मेरा एकभी क्वेंशन इसमे नही आया मेरे गार्डन का एक भी सवाल इसमे नही आया. चौपाटीका मैने लेटर दिया आज तक आया ही नही इसमे मुझे बोलने का हक्क नही है. मुझे चौऱ्याऐशीसे ग्रामपंचायत मे हु यहॉ. लगातार आता हूँ. कोई भी मिटींग छोडता नही लेकिन इसके बाबजूद एक पेपर मे आया मा. नगरसेवक रिटा जीने करीब चालीस लेटर लिखे होंगे सब पेपर वालेने बोला अरे चौहानसाब तुम्हारे नामसे शिकायत आयी है. अभी लिखा है. अब मै. इसपे केस ठोकू क्या. सामनावालेने लिखा है कॉग्रेसी नगरसेविका रा.का.पा. नगरसेवकसे भीडी अब बताईए अब व इसपे मै केस ठोकू वैती साब बताइए क्या करू मै. मै केस ठोकू मुझ से कौन भिडेगा मै तों हात जोड लेता हूँ. अरे क्या भिडोंगी मुझसे लेकिन ये पेपर वालोने दिया आपने लेटर भेजा सारा निचे डिटेल दिया. लिखा है रा.का.पा. नगरसेवक से भीडी. मै भी आपके साथ हूँ. हम दोनो मिलके लडे. हम दोनो इलेक्शन लडकर आयें. प्रचार इनके तरफसे, मै भी करता था. मेरे पास अभी पैसा नही, नही तो मै सामना को बराबर करता था. तो इस तरह की बात आप मनमे मत रखिए ना मैने चिरहरण जैसी बात की है मै क्यु ऐसा काम करूंगा.

**रीटा शहा :-**

मा. महापौर मॅडम महेंद्र सिंग चौहान साहेबाची विवस्था मला समजलेली आहे. कारण रीटा शहा सारखी बोलते म्हणून ते विवश झाले आणि माझा वैयक्तिक मामल्यावर त्यांनी विषयांतर केले तेही मान्य करते मी आणि त्यांना ते चुकीचे म्हणून समजले आहे म्हणून मला त्यावेळी वीस वरती जवब नाही दिला मी शंभर वेळा विचारले तेव्हा तुम्ही मला शंभर वेळा जवाब दिलेले आहेत तेही मी मान्य करते मी शंभर वेळा या सभागृहात उठते आणि बोलते ते ही मी मान्य करते म्हण्जेच महिला नगरसेवक चाळीस मिनिट बोलते किंवा शंभर मिनिट बोलते आणि मग दुसरे नगरसेवक विवश होऊन त्याच्या वैयक्तिक मामल्या मध्ये काहीही बोलणार आणि ते प्रोसेडिंग मध्ये आलेले आहे ते बोलले की मी बोलले नाही तर मग ते प्रोसेडिंग मध्ये कसे आले ते बोललेले आहेत ते . ते दिल गीरी व्यक्त करू द्या आम्ही किती खेळीमेळीने इलेक्शन लढलेले आहे ते त्यांनाही माहित आहे मलाही माहित आहे त्यांनी मला काय मदत केली व मी त्यांना काय मदत केली मलाही माहित आहे पण हे सर्व विषय नाही विषश काय तर प्रोसेडिंगमध्ये आलेल्या शब्दाचा आणि मा. महापौरांनी एका महिला नगरसेवकाबद्दल असे शब्द ते बोललेले आहेत म्हणून ते प्रोसेडिंगमध्ये आलेले आहे. मी काही माझ्या मनाचे सांगत नाही. मी काय बोलले ते ही मी मान्य करते आणि सामनावर त्यांना काय केस करायची असेल तर करू द्या सामन्या वाल्यांना एक प्रोसेडिंगची कॉपी देणार आहे की समोर सांगते ना. केस करायची असेल तर करा तुम्ही. तुम्ही बोललेले आहात आणि ते प्रोसेंडींगमध्ये आलेले आहे. मॅडम आपण याबद्दल रूलिंग द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम आता चौहान साहेबांनी सांगितले की प्रभाग क्र. २१ मधुन रीटा मॅडम पण निवडून आल्या आणि महेंद्र सिंग चौहाण साहेब पण निवडून आले आणि त्याच्या बरोबर मी पण निवडून आलो. दोन्ही जेष्ठ नगरसेवक आहेत आणि यांच्यामध्ये मी ज्युनियर आहे. यांच्या भांडण्यामध्ये मला वाटते की मलाच बोलायला लागत आहे आणि म्हणून बोलतो आहे मी तर रीटाजी आपण पण सभागृहात बोलतात आपल्या बोलण्यामध्ये पण चौहान साहेबांचा थोडाफार अपमान झालेला आहे. असे आमच्या निइर्शनास आलेले आहे आणि चौहान साहेब सुद्धा भावना विवश होऊन काहीतरी बोलले असतील आम्ही पण त्या सगळयाचा अभ्यास केलेला आहे तर माझी रीटाजींना एकच विनंती आहे की कृपया आपण तिघेही एकाच वार्डातील आहोत आणि एका वार्डात आपण एकच काम केलेले आहे प्रचार सुद्धा एकच केलेला आहे आणि पाचवर्ष आपणाला एकच काम कराचे आहे. आणि सुदैवाने पुढचा वार्डसुद्ध एकच मिळणार आहे म्हणून या सगळया विषयाचा आपण अभ्यास करून कारण की चौहान साहेबांनी सांगितले की तुम्ही पण बोलतात आणि मी तुमची हात जोडून विनंती करतो तरी तुम्ही पण एका वयाचा मान ठेवून तुम्ही पण बोलले की असल्या ह्या नगरसेवकाला बसण्याचा अधिकार नाही आहे म्हणून आपण पण बोलता बोलता बरेच काही बोलले तरी चौहाण साहेबांनी कधीही ऑब्जेक्शन उचलले नाही आहे. तरी माझी आपणांस एक विनंती आहे सभागृह नेता या नात्याने आपण ह्या विषयांवर येथेच पडदा टाकावा आणि जे काही झाले गेले ते गंगेळी अर्पण करा आणि मा. सचिव कृपया इतिवृत्तांत मंजूरी बाबत कारवाई करावी.

**रीटा शहा:-**

सभागृह नेत्यांनी जे सांगितले ते मला मान्य आहे. मी एक खेळीमेळीच्या वातावरणात सभा चालवायला बघते. काहीही आदेश द्यायचा असेल तर मा. महापैर मॅडम यांनी दिले तर आम्ही लगेच बसू. मा. महापैर मॅडम यांनी अजून पर्यंत आम्हाला असे नाही सांगितले की माझा आदेश आहे आणि तुम्ही बसा म्हणून बाकी लोक मला बसायला सांगतात आणि विवश होऊन काहीही बोलतात ते कशाला विवश होतात ते मला माहित नाही.

**मा. महापौर :-**

जे काही शब्द असतील ते प्रोसेंडिग मधुन काढुन टाकावेत. त्यांनी जे काही शब्द बोलले असतील ते काढावे.

**रीटा शहा :-**

नाही मी मान्य करणार नाही ,जे शब्द प्रोसेडिंगमध्ये आलेले आहेत ते काढायचे नाहीत. मला त्याच्या मध्ये काही कमीपणा वाटत नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही आता सर्व एकाच प्रभागातील असून एकत्र काम करणार आहात पुढच्या वेळीसुद्धा मी एकत्र येणार आहात ना.

**रीटा शहा :-**

पुढच्या वेळेचे भविष्याचे काय आहे ते बघू परंतू आता माझा अपमान झालेला आहे. त्याचे काय ? तुमचा अपमान जर मी केला असता तर तुम्ही मला असेच केले असते.

**मा. महापौर :-**

नाही, असे काहीही नाही आपला अपमान नको म्हणून मी सुद्धा तुम्हाला काहीही बोलत नाही. मी जर कुणाला काही वाईट बोलले तर माझा सुद्धा अपमान करणारच ना.

**रीटा शहा :-**

अपमान करण्याचा प्रश्नच येत नाही आपण विषयावर बोलले आणि विषयाबाबत मला बसविले तर मला चालेल पण आपण विषयावर चर्चा करतो आणि विषयावर मला बसविता ते मी मान्य करते.

**मा. महापौर :-**

तुम्ही पण तुमच्या रागाने काही तरी बोलले आणि त्यांचा सुद्धा असा काही एखादा शब्द आला असेल.

**रीटा शहा :-**

प्रश्न तो नाही आहे रागाने मी बोलली नाही प्युन बोलले होते कारण ते मला चहा कॉफी बोलले मला मी प्रोसेडिंग कॉफी बाबत बोलले होते ते चहा कॉफी बोलले म्हणून मी काही प्युन नाही आणि दुसरे काय मा. महापौर मॅडम नेहमी नेहमी मला ते बसावायला बघता मी जास्त बोलते हे बालायचा अधिकार त्यांचा नाही. मा. महापौरांचा अधिकार आहे. कारण मी जास्त बोलते की कमी बोलते हे डायसवरून ते रुलींग नाही आणि दुसरे लोक रुलींग देतात.

**परशुराम पाटीलः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की हा जो विषय चाललेला आहे. तो आपल्या एका वार्डामधुन मघाशी सन्मा सदस्य श्री. चौहाण साहेबांनी आणि ध्रुवकिशोर पाटील आणि रीटा मॅडम ह्या एका वार्डामधुन निवडून आले. पण असे एखादया मोठया नेत्यावर सुद्धा आरोप होतात ते काही आपण पकडून ठेवायचे नसतात आणि आपण लोकसेवा करण्यासाठी बोलायचे असते पण त्याला वेळेचे बंधन असते आणि ज्या पद्धतीने आपण आजचा जो नगरसेविका रीटा मॅडम यांनी जो मुद्दा की त्यांनी माफी मागावी हा जो पकडून ठेवलेला आहे. त्याचा इशारा किंवा माघार मागावी तर तसा तो प्रश्न नाही आपणपण समजून घेतले पाहिज मघाशी चौहाण साहेबांनी सांगितले की आम्ही खेळी मेळी ने त्यांना मदत केली व ज्याच्या घरातुन त्यांना मते मिळणार नव्हती ती सुद्धा मिळवून दिली हे सर्व ठोक आहे आता पर्यतचे जे काही खेळीमेळीने चाललेले आहे आणि ह्या एका विषयाला धरून जर चालले तर मला वाटते आपले हे प्रश्नोत्तर जे चाललेले आहे तर हे प्रश्नोत्तर आपण संपविली पाहिजे आणि पुढच्या विषयास सॉरी प्रोसेडिंग मंजूरीचा विषय चाललेला आहे. तर तो प्रोसेडिंगचा विषय येथे संपवून दुसरा विषय घेतला पाहिजे असे माझे एक मी विरोधी पक्ष नेता म्हणून विनंती करण्यात येते आहे. तरी आपण हा विषय येथेच संपवून पुढील विषय घ्यावा.

**मा. महापौर :-**

पुढच्या विषयास सुरूवात करण्यात यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम पान क्र. ३३ मध्ये वरील ठरावात एकुण उपस्थित ७३ सदस्यापैकी भारतीय जनता पार्टीचे ११ सदस्यांनी विरोध केला आहे. त्यामुळे सदर ठराव हा बहुमताने मंजूर करण्यात आलेला आहे. आपल्या महानगरपालिकेच्या अधिनियमामध्ये ठराव जेव्हा पास करतो विरोधात आणि स्पोटामध्ये मत होते तेव्हा ११ सदस्यांची नावे ह्या ठिकाणी आली पाहिजे हे महानगरपालिकेच्या अधिनियमामध्ये आहे. म्हणून नविन प्रोसेडिंग आम्हाला दिली पाहिजे आणि ११ जे सदस्य आम्ही उपस्थित होतो. त्यांची नांवे सुद्धा त्या प्रोसेडिंगमध्ये नमुद झाली पाहिजे. एक थोडासा विषय गंभीर आहे. खरोखर मा. आयुक्त साहेबांनी तशी माहिती सभागृहाला दिली पाहिजे असे माझे मत आहे. एखादा कायद्याच्या पट्टीत बसते किंवा नाही ते मला माहित नाही वर्तमान पत्रामध्ये मिरा भाईंर महानगरपालिकेचे दोन अधिकारी यांना ॲण्टी करप्शनने पकडलेले आहे ही बातमी वर्तमान पत्रामध्ये आलेली आहे. त्याबाबत सभागृहाला त्याची माहिती मिळाली कारण वर्तमानपत्रामध्ये ती गोष्ट सत्य आहे. की असत्य आहे. ते सांगता येत नाही मा. आयुक्त साहेबांना यांची माहिती आहे का ? तरी मा. आयुक्त साहेबांनी या सभागृहाला जर सविस्तर माहिती दिली तर पुढच्या कधी तरी कोर्टाचा विषय आला तर या सभगृहाकडून तुम्ही मान्यता जर मागितली तेव्हा आम्हाला ही माहिती माहित असणे गरजेचे आहे. म्हणून सभागृहाला त्याबाबत माहिती द्यावी अशी माझी विनंती आहे.

**मा. आयुक्त :-**

शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी आणि त्यांचे क्लर्क यांच्या वरती लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली त्यांना रंगे हात पकडल्याची जी बातमी आलेली आहे ती खरी आहे. आणि त्या संदर्भात पोलिसचा रिपोर्ट आमच्याकडे प्राप्त झालेला नाही तो प्राप्त झाल्यानंतर आम्ही त्याबाबत सभागृहाला माहित देऊ शिक्षण अधिकाऱ्याच्या बाबतीमध्ये प्रशासन अधिकाऱ्यांच्या बाबतमीमध्ये डेप्युटी डायरेक्टर एज्युकेशन नाशिक यांच्याशी मी संपर्क साधलेला आहे आणि ते रिक्त पद एक दोन दिवसाच्या आत कदाचित आज आर्डर निघाली सुद्धा असेल नवीन शिक्षण अधिकारी हे रुजू होतील. धन्यवाद.!

**प्रकरण क्रं. १ :-**

**दि.११/०२/२००३ चे इतिवृत्तांत वाचून कायम करणे.**

**सुचक :- श्री.चंद्रकांत वैती** **अनुमोदन :- श्री.ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर मॅडम ह्या सभेचे पुढील विषय घेण्यापुर्वी या सभागृहात काही नवीन अधिकारी उपस्थित आहेत आणि ह्या नविन अधिकाऱ्यांची ओळख या सभागृहात करून देण्यात यावी अधी मी विनंती करतो.

**श्री. एस. एस. पानपट्टे :-**

मा. महापौर महोदया, मा. उपमहापौर सो., मा. आयुक्त सो आणि मा. सर्व सदस्य मी एस.एस. पानपट्टे, उपआयुक्त दि. २६ मार्च, रोजी रुजू झालेले आहे सध्या माझ्याकडे महिला बालकल्याण, दलित वस्ती सुधारणा, अग्निशमन वाहन, व सुवर्ण जयंती तसेच लोकशाही दिन हे माझ्याकडे विषय आहेत. यापुर्वी मी उल्हासनगर महानगरपालिकेत उपआयुक्त म्हणून होतो.

**श्री. बी. एम. माळी :-**

मा. महापौर महोदया, मा. आयुक्त सो., मा. सचिव सो., व सन्मा सदस्य मी श्री. बी.एम.माळी, ठाणे महानगरपालिकेत उपसचिव म्हणून होतो आता १ एप्रिल पासून आपल्या महापालिकेत विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून सचिव विभागात नेमणूक केलेली आहे.

**श्री. शरदचंद्र वैरागडे :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त सो., आणि सभागृहातल सर्व उपस्थित सदस्य आणि अधिकारी मी शरद चंद्र वैरागडे सिटी इंजिनियर म्हणून रुजू झालेलो आहे. यापुर्वी पुर्व एमआयडिपी अधिक्षक अभियंता म्हणून होतो तेथून मी डिप्युटेशन वरती येथे आलेले आहे. धन्यवाद !

**प्रभात पाटील :-**

बऱ्याच अधिकाऱ्यांनी आता आपल्याला माहिती सांगितली आहे. आणि कोणकोणत्या पदावर रूजू झालेले आहेत ते सुद्धा त्यांनी सांगितले मला थोडीशी माहिती हवी की नविन ही पदे आपल्या

अधिकारात भरली जातात पालिकेत की पालिका सदस्य किंवा स्थायी समितीच्या सदस्यांना विश्वासात घेऊन भरली जातात याबात पद्धत काय आहे नविन ही पदे भरण्याबाबतची या बाबत माहिती व्हावी.

**आयुक्त :-**

प्रतिनियुक्तीवरचे जे अधिकारी आहेत त्यांना शासन प्रतिनियुक्तीवर पाठविते महापालिकेमध्ये.

**प्रभात पाटील :-**

आणि घेणे गरजेच असतं.

**आयुक्त :-**

अर्थातच

**प्रभात पाटील :-**

आणि आवश्यकता आहे.

**आयुक्त :-**

हो, पदनिर्मिती ही शासनानेच केलेली आहे व शासनानेच हे अधिकारी प्रतिनियुक्तीवर पाठविलेले आहेत.

**प्रभात पाटील :-**

आणि आपण त्यांना नाही घेणार म्हणून प्रतिकार करु शकत नाही का ?

**आयुक्त :-**

प्रतिकार कशासाठी करायचा जर त्यांच काम समाधानकारक वाटलं नाही तर त्यांना आपण ठराव करुन परत पाठवू शकता.

**प्रभात पाटील :-**

नाही मी असे म्हणते नगरपालिकेची महानगरपालिका होऊन वर्षभराचा काळ लोटलेला आहे. मी त्या दिवशी एका अधिकाऱ्यांकडे विचारणा केली की, विकास कामे अजून का निघत नाहीत. त्यांनी असे उत्तर दिले की साहेबांनी सांगितले आहे की, सद्या छोटी मोठी कामे करायची नाहीत आपल्याला मोठी कामे हातात घ्यायची आहेत.पैसा कमी आहे. जर छोटी मोठी कामे आपल्याला करायची नसतील तर एवढया मोठया पगाराचे अधिकारी सुध्दा घेणे गरजेचे आहे का ?

**आयुक्त :-**

विकासाची कामे करायची आहेत म्हणूनच ती पदे मागविलेली आहेत.

**प्रभात पाटील :-**

मग थोडया दिवसांसाठी ती आपण रोखू शकत नाही का ?

**आयुक्त :-**

आपल्या बोलण्याचा उद्येश मला कळालेला नाही.

**प्रभात पाटील :-**

मला हे म्हणायचे आहे की आजच सर्व पदे भरणे गरजेचे होते का ?

**आयुक्त :-**

निश्चितच.

**प्रभात पाटील :-**

आपण त्यांना थोडया दिवसांसाठी पायबंद करु शकत नव्हतो का ? आपल्या पालिकेचा पैसा

**आयुक्त :-**

जेष्ठ आणि अनुभवी अधिकारी आपल्या महापालिकेत आले तर

**प्रभात पाटील :-**

पण ही पदे या अगोदर आपले अधिकारी सांभाळत होते ना. आपल्याकडे असलेला स्टाफ हे काम करतच होता की.

**आयुक्त :-**

महानगरपालिका झाल्यानंतर आपल्या अपेक्षा आता वाढलेल्या आहेत ते काम अधिक चांगल्या पध्दतीने व्हावे असे आपल्या अपेक्षा आहेत.

**प्रभात पाटील :-**

नाही पण आपल्या अधिका-यांना सुध्दा आपल्या अपेक्षांची पूर्तता करण्याची संधी दिली असती ना.

**आयुक्त :-**

पुर्वी सरपंच होते आता आयुक्त आले, पूर्वी नगराध्यक्ष होते आता महापौर आले

**प्रभात पाटील :-**

आम्ही नाही म्हणत नाही परंतू ही नगरपालिका सगळयांसाठी कुराणच होऊन बसली का की येथे येणेच आवश्यक होऊन बसले आहे. केवळ आपले अधिकार आहेत का शासनाचे अधिकार ?

**आयुक्त :-**

कशाबद्यल.

**प्रभात पाटील :-**

इथे अधिका-यांना घेण्याचे अधिकार आपले आहेत का शासनाचे ?

**आयुक्त :-**

शासनाचे.

**प्रभात पाटील :-**

शासनाचे अधिकार.

**मिलन पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतोय आयुक्त साहेब हे जे अधिकारी आपल्याकडे डेप्युटेशनवरती येतात त्यांना आपल्या महानगरपालिकेचा पैसा सुध्दा काही पगार म्हणून देतात. अधिकारी गावाच्या विकासाकरिता येत असतात जे अधिकारी गावाच्या हिताच्या दृष्टीने , विकासाच्या दृष्टीने दुर्लक्ष करत असतील, तर त्यांची काही सदस्यांनी कंप्लेंट केली, तर तुम्ही त्यांना पुन्हा त्यांच्या जागेवर किंवा ते जेथून आले असतील त्यांची तेथे पून्ही रवानगी करु शकता का ?

**प्रभात पाटील :-**

मला हेच म्हणायचे होते की आजही आपल्या हयाविषयीचा कारभार आपल्या अधिका-यांमध्ये चालू होता. आता आपण मोठया मोठया पगाराचे अधिकारी येथे बोलाविता आहात, तितकाच पैसा नगरपालिकेच्या खाती जमा राहिला असता. आज आपण इतके नविन अधिकारी भरत आहात काम तेच आहे, कामाचे स्वरुप तेच आहे, आमचा जो जूना कर्मचारी होता तो यशस्वीरित्या कारभार सांभाळत होता. अजुनही कामाला सुरुवात झालेली नाही आहे मिरा भाईंदर मध्ये आणखीन वर्षभर थांबलो असतो तर तो पैसा नगरपालिकेच्या तिजारीमध्ये शिल्लक राहिला असता. आणि म्हणून माझा तो प्रश्न होता.

**महापौर :-**

सचिवांनी पूढील प्रकरण घ्यावे.

**(प्रभारी सचिवांनी प्रकरण क्र. २ चे वाचन केले)**

**रिटा शाह :-**

जकात वसुली बाबत अभिकर्ता नेमणेबाबत असा विषय आलेला आहे. त्याबद्यल मी आपणाला पत्र दिलेल आहे.पत्राच उत्तरही श्री. हरीश पाटील यांनी मला काल संध्याकाळी पाठविलेले आहे की आपण जो मांडलेला ठराव आहे तो मा. महापौरांनी मान्य केलेला नाही. आणि इथे ठराव तुमचा फेटाळलेला गेला आहे. आणि प्रोसिंडींगच्या शेवटी सुध्दा अस दिलेल आहे की श्री. रोहीदास पाटील यांनी विचारल होत की या ठरावाचा काय झालं. आणि शेवटी फक्त अस सांगितल की बहुमताने पास झाला. मतदान झालेलच नव्हतं मी मतदानाची मागणी सुध्दा केलेली होती. अस मला वाटत नाही की एका नगरसेवकाने उठून परत परत मतदानाची मागणी करावी. आणि परत ते तिकडून सांगतात की सारखी उठते, पण मला माझ्या प्रश्नाचे उत्तरच मिळत नाही तर मला परत परत उठावच लागते ना. मी मतदानाची मागणी तेव्हा केलेली होती. तसे प्रोसिंडिंगमध्ये आलेल सुध्दा आहे. आणि परत परत उठून मतदानाची मागणी करायची असा काही नियम आहे काय नाही नाही मी उभीच आहे तुम्ही नंतर इशारा करा की तुम्ही उठा तुम्ही उठा हे चांगल नाही साहेब. मी उभी आहे मी बोलते आणि आपण साहेब कमिशनर आहात चांगल्या हुद्यावर येऊन बसलेले आहात आणि इशारा करुन आपण सांगताय की तुम्ही उठा म्हणून हे बरं नाही साहेब.

**आयुक्त :-**

नाही त्यांना उठायच होत म्हणून त्यांना इशारा केला की तुम्ही उठा म्हणून

**रिटा शाह :-**

नाही मी उभी आहे साहेब आणि मी उभी आहे म्हणून आपणाला वाईट वाटत असेल साहेब आणि आपण कुठेतरी विवश असाल तर सांगा मी बसते.

**आयुक्त :-**

चर्चेच्या दरम्यान तो ठराव आपण मांडलेला होता चर्चा झाल्यानंतर त्यावेळी पून्हा फायनली तो विषय चर्चेला आला आणि सभागृहात त्यावेळेला विचारल गेलं दुस-या सभेमध्ये त्यावेळी आपण आग्रह धरला नाही की माझ्या ठरावाच काय झालं. सन्मा. सदस्य श्री. रोहीदासजी पाटील यांनी सुध्दा आपणाला उठवण्याचा व विचारण्याचा प्रयत्न केला की आपल्या ठरावाच काय झालं. तुम्हाला विचारत होते आपण त्याच उत्तर दिल नाही याचा अर्थ आपण त्याचा आग्रह धरला नाही. अस समजून तो ठराव पास झाल्याच रेकॉर्ड करण्यांत आले.

**रिटा शाह :-**

साहेब आपण प्रोसिडींगची कॉपी हे करत असेल आणि महेंद्रसिंग चौव्हान साहेबांशी माझ मन दुःख झाले कारण त्या विषयावर मी चार तास बोलली म्हणून, आणि आपण म्हणताय हे पकडून बसले नाही तर किती वेळ मी चार तास तर मी पकडून बसली कि मतदान करा म्हणून, मी चार तास मिटींग चालवली आणि शेवटी मला उत्तर भेटलच नाही त्यामुळे मी गप्प बसली. मग रोहीदास पाटील साहेबांनी विचारल तेव्हा अस डिक्लर झालं की बहुमताने ठराव पास मग गप्पच बसाव लागत ना.

**आयुक्त :-**

ठराव मंजुर होत असताना आपण त्याला विरोध केलेला नाही आणि ठराव पास झालेला आहे.

**रिटा शाह :-**

पण मी मतदान केल तेव्हा तर रुलिंग दिल नाही मतदानाची जेव्हा मागणी केली मी प्रोसींडींगमध्ये नमुद आहे की मतदान होणार नाही आणि मतदान घेणार नाही. आणि साहेब मी सारख दोनदा विचारल होत मध्ये की मतदान घ्या म्हणून त्यानंतर चर्चा चालू होती. आणि चर्चेच्या नंतर एकदमच डिक्लर झालं की बहुमताने पास रोहिदास पाटील साहेबानी उठून पण विचारल तर बहुमताने पास. हरकत मी लेखी पण दिलेली आहे आपल्याला. चार तास उठून पण काय जवाब...

**आयुक्त :-**

ज्यावेळी आपणाला विचारण्यात आल की ठरावाबद्यल आपण काय म्हणणार आहात त्यावेळी आपण गप्प बसलात. याचा अर्थ त्या ठरावाबद्यल पूढे कारवाईची आपणाला अपेक्षा नव्हती.

**रिटा शाह :-**

चार तास मतदानाची मागणी करुन मी गप्प बसले शेवटी, बसावच लागत ना शेवटी रुलिंग झाल की बहुमताने पास, मतदानाशिवाय बहुमताने पास झाल तर ते मान्य करावच लागेल ना, ते डायसवरुन ते डिक्लर झालं. ते आपण कुठल्या अधिकाराचा वापर करुन केलेल असेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झालेनंतर शासनाकडून जकातीपोटी मिळणारे अनुदान बंद झाले आहे. आणि त्याच्यामुळे आपणाला जकात कर लावावा किंवा उपकर लावावा असा निर्णय २४ तारखेच्या सभेमध्ये आला. आणि महासभेने जकातीचा निर्णय घेतला. आणि त्याप्रमाणे निविदा देखील मागविण्यात आली. आणि त्यामध्ये दोन निविदा आलेल्या आहेत. त्यातील गोलानी कंस्ट्र. यांची एक निविदा कोरी होती. व दुसरी सहकार एजन्सी यांनी रु. २९,०७,९९,९९९.९९ पैसे अशी निविदा भरलेली आहे. आपला देकार ३२ करोड रुपयांचा होता. आणि निविदा आलेली आहे ती २९ करोडच्या आसपास. आणि आपणाला मागे अनुदान शासनाकडून २६ करोड ५६ लाखाच भेटल होत. त्यामुळे साधारणतः आपणांस २.५२ करोडचा फायदा झालेला आहे.आणि आज आपण जर स्वतः महानगरपालिकेने जकात वसुली सुरु केली तर त्यासाठी आस्थापनेवर साधारणतः ६८ लाख रुपये खर्च येणार आहे. आणि तो सुध्दा आपला ६८ लाख रुपये वाचतोय. तसेच आपल्या ज्या कर्मचाऱ्यांवरती स्टेशनरी , वाहन, डिझेल, गणवेष आणि इतर खर्च पकडला तर २५ लाख रुपये खर्च येतोय. आपले साधारण ३ करोड ४५ लाख रुपये वाचणार आहेत. आणि त्यामुळे या सगळया गोष्टींचा विचार केला तर आपल्याला जे टेंडर आलेल आहे सुमारे २९ करोड रुपयाचे ते ॲक्रासमेटली १३ टक्के जास्त आहे. म्हणून आणि आपण जर महानगरपालिकतर्फे

वसुली केली तर तेवढी वसुली सुध्दा होणार नाही. आणि आपल्याकडे तितका कर्मचारी सुध्दा नाही आहे. आणि तसेच आपण जर वसुली केली तर आपले कार्यालयीन कामकाज ठप्प होईल. आणि याचा इफेक्ट आपल्या नागरी सुविधांवरती होईल. आणि आपण जे टेंडर काढले आहे या टेंडरमध्ये फक्त एकच निविदा आली आणि ही एक निविदा जी ओपन झाली ती कोरी झाली. आणि दुसऱ्या निविदेचा आपण जर या परिस्थितीमध्ये विचार केला तर ही निविदा आपण या सभेत पास करुन आणि अंतिम मंजुरीसाठी शासनाकडे पाठवावी अशी शिफारस मी करीत आहे. त्याचप्रमाणे या ठेकेदाराला आपण स्ट्रीक वॉर्निग दया की कारण मागे आपण एकदा ऑक्ट्रॉय प्रायव्हेट मध्ये दिले होते तेव्हा स्थानिक नागरीकांच्या तक्रारी आल्या होत्या आणि या तक्रारी येणार नाहीत याची आपण काळजी घ्या. तसेच रेल्वेवरुन जे आपले नागरीक उतरतात त्यांच्या सुध्दा बॅगा उघडतात आणि चेक करतात . जे रहिवाशी असतात जे स्थानिक असतात त्यांना जाणून बूजून सतावतात. तर अशा अनेक तक्रारी त्या ठेकेदारामुळे आल्या होत्या तर तशा तक्रारी हा ठेकेदार करणार नाही याची आपण काळजी घ्यावी. आणि म्हणून सदर निविदा मंजूर करुन शासनाकडे अंतिम मंजुरी साठी पाठवावी असा मी ठराव मांडित आहे.

**रिटा शाह :-**

ठरावाचे अनुमोदन होण्या अगोदर मी सांगते की दोन निविदा आपणांकडे आलेल्या आहेत त्याच्यामध्ये एक कोरी आहे. फक्त एकच निविदा आहे आणि मी आरोप करत नाही कारण मी ही दोन तीन लोकांना पाठविले होते त्यांना टेंडर फॉर्म दिला गेलेला नाही. फक्त दोन निविदा तुमच्याकडे आलेली आहे त्याच्यामध्ये एकाने कोरीच पाठविलेली आहे. मग अशा प्रकारचा आपण हा मंजूर करणार आहात का ?

**आयुक्त :-**

आपण या विषयावर माझ्याशी कधी बोललेला नाही आहात.

**रिटा शाह :-**

बोलायचा प्रश्न येतच नाही ना साहेब तीथे.

**मा.आयुक्त :-**

प्रश्न कसा येत नाही आता कसे बोलता तुम्ही.

**रिटा शाह :-**

आता बोलते ना मला महासभेत बोलायचे होते.

**मा.आयुक्त :-**

मला आपण एखादा फोन केला असतात तरी मी संबंधितांना बोलावून विचारले असते.

**रिटा शाह :-**

दोनच निविदा आलेली आहे आणि त्यात एक कोरी आहे आणि आपण...

**आयुक्त :-**

पाच लोकांनी फॉर्म घेतले त्यापैकी दोन लोकांनी भरले व एक व्यक्तिने ती कोरी टाकली आणि दुसऱ्याने त्याच्यामध्ये देकार रक्कम टाकली.

**रिटा शाह :-**

ठिक आहे एकाने कोरी टाकली आहे एकाने लिहून पाठविली आहे. पण अशा फक्त एकाच निविदेवर आपण निर्णय घेणे योग्य होणार काय ? आपण परत निविदा कॉल का नाही करत ?

**आयुक्त :-**

प्राप्त परिस्थीतीमध्ये असा निर्णय घेणे आवश्यक आहे. खर तर आपल्या भावनेशी मी ही एरवी सहमत झालो असतो. परंतू आता परिस्थिती तशी नाही आहे. आपण जरी रीटेंडरींग करायच म्हटलं तरी रीटेंडरींगमध्ये सुध्दा आपल्याला प्रतिसाद मिळेल याची गॅरंटी नाही. मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की देशपातळीवरच्या आणि राज्य पातळीवरच्या मोठ मोठया पेपरला आपण हया जाहिराती दिल्या होत्या.

**रिटा शाह :-**

साहेब मला आपले सर्व प्रोसीजर मान्य आहे. आपण सर्व प्रोसिजरने केलेल आहे.

**आयुक्त :-**

एवढयासाठी मी सांगतोय आपल्याला की या संबंध व्यवहारामध्ये पारदर्शकता आहे. चांगल्या पेपरला इंडियन एक्सप्रेस, लोकमत, अशा पेपर्सना या जाहीराती दिल्या गेल्या होत्या. जे लोक आले, मला मालेगांवरुन सुध्दा लोक भेटायला आले म्हणाले साहेब फॉर्म आम्ही घेतलेला आहे आम्ही स्टडी

करतोय, काही लोकांनी फॉर्म घेतल्यानंतर मार्केटचा सर्वे केला. त्यानंतर त्यापैकी काही लोक येवून भेटले, काहींनी आम्हाला अशी विनंती केली की साहेब आम्ही २२ , २४ पर्यंत आम्ही भरु शकतो, मी म्हणालो माझ्याशी काही चर्चा करु नका तुम्हाला जे काही भरायच असेल ते तुम्ही भरा, ओपन कॉम्पीटेशनमध्ये जे काय व्हायचं असेल ते होईल. परंतु फॉर्म घेतलेले लोक पुन्हा परतच आले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पाच लोकांनी फॉर्म घेतलेले आहेत त्यांचे आम्ही तुम्हाला पत्ते देतो, फोन नंबर देतो त्यांच्यावर काय कुणाचा दबाव आला असेल तर आपण विचारा त्यांना, की आम्ही त्यांना टेंडर टाकू दिले नाही का ? आणि जे आपण म्हणता जी दोन लोक तुमच्या कडे आली आणि आम्हाला फॉर्म दिले नाही अशी तुमच्याकडे तक्रार केली त्या व्यक्ती मला येवून भेटू शकल्या असत्या , आपल्यालाच कशासाठी येवून भेटल्या, आम्ही काही जाहिरातीत असे म्हटलेल नव्हतं की नगरसेवकांना भेटा फॉर्म नाही दिला तर.

**रिटा शाह :-**

साहेब नगरसेवकांना तर सर्व प्रश्नांसाठी लोक भेटतात.

**आयुक्त :-**

मग आपण आम्हाला सांगता ना एरवी, मग हा प्रश्न का नाही सांगितलात. आपण या स्टेजला हा प्रश्न काढलेला आहे

**रिटा शाह :-**

ते जाऊ दया, तो प्रश्न नाही माझा. माझा प्रश्न असा आहे फक्त दोन निविदा आलेली आहेत आणि त्याच्यामध्ये एक कोरी आहे आणि आपण निविदा मंजुर करतो आहोत तर ते योग्य आहे का ?

**आयुक्त :-**

आता जो प्रश्न आहे की एकच निविदा आहे ती आपण मंजुर करायची की नाही, तर मी आपणाला सांगितले की ही अपवादात्मक बाब आहें आणि आपल्या इस्टीमेंट प्रमाणे आपण साधारणतः ३० कोटीपर्यंत उत्पन्न येईल असे गृहीत धरलेल होत. मग ते एजेंट कडून मिळेल किंवा आपण वसुली करुन मिळेल याचा काही आपण त्याच्यामध्ये बजेटमध्ये अंदाज करताना उल्लेख केलेला नव्हता. २९ कोटी ७ लाख या ठेकेदाराने आपणांला ऑफर दिलेली आहे. आणि आपला जो आस्थापनेचा खर्च व इतर खर्च आहे त्याबाबत सन्मा. सभागृह नेत्यांनी ;या ठिकाणी खुलासा केला . हा जर विचारात घेतला तर आपण ३० कोटीच्या आसपास नक्की येतोय. म्हणजे आपल्या बजेटप्रमाणे आपल्याला रक्कम मिळते. दुसरी गोष्ट अशी की मोठमोठया कंपन्या आता बंद आहेत, नॅशनल प्लॅस्टिक सारख्या, गोल्डन केमिकल सारख्या आता बंद झालेल्या कंपन्या आणखी काही युनिटस् बाहेर स्थळांतरीत करताहेत अशा प्रकारच्या बातम्या येतात. अशा परिस्थितीमध्ये आणि आपल्या कर्मचाऱ्यांची जी एकूण संख्या आहे याचा जर विचार केला ता आपण फिजीकली वसुली करु शकत नाही. ही बाब अतिशय महत्वाची आहे. आपण जर महानगरपालिकेने वसुली करायची म्हटलं तर पूर्ण कर्मचारी त्या कामासाठी नेमावा लागेल. आणि महानगरपालिकेत कुणीही कामकाजासाठी शिल्लक राहणार नाही. आणि नविन माणसाला जरी या ठिकाणी नियुक्त करायच म्हटलं तर त्यांना कार्यालयीन कामकाजाची माहिती असणं शक्य नाही. तर या परिस्थितीमध्ये आपल्याला हे करण्या पलिकडे दुसरा पर्याय आहे अस मला वाटत नाही. आणि हे योग्य आहे की अयोग्य आहे कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे हे शासनाकडे आपण पाठविणारच आहोत, शासनाकडेसुध्दा लिगल डिपार्टमेंट आहे. आपण प्रस्ताव पाठविल्यानंतर शासन त्याला डोळे बंद करुन मान्यता देणार आहे अशातली काही गोष्ट नाही. त्यांचेही लॉ डिपार्टमेंट त्यांना सजेश करणार आहे. आपली अपवादात्मक परिस्थिती शासनाच्या निदर्शनात आणून शिफारस करणार आहोत की हे स्विकारण हया परिस्थितीमध्ये आम्हांला योग्य वाटतं. शासनाला वाटलं की फेर टेंडर काढून आणखी एकदा प्रयत्न करा तर तसं करु आपण, परंतू आपणच तसा निर्णय घेवून काळ अपव्यय करणं हें योग्य होणार नाही असे माझे मत आहे.

**रिटा शाह :-**

साहेब दुसर जे कॉन्ट्रक्टरने आपली निविदा भरली आहे त्यांनी इसारा रक्कम भरलेली आहेत का ?

**आयुक्त :-**

काय झालं ?

**रिटा शाह :-**

ज्यांनी कोरी निविदा भरलेली आहे त्यांनी इसारा रक्कम भरलेली आहे का ?

**आयुक्त :-**

नाही भरलेली.

**रिटा शाह :-**

नाही भरलेल तर ते आपण कस प्रोसिडींगमध्ये आणलं. त्याचा अर्थ त्यांनी ते भरलेलच नाही त्याचा अर्थ असा होतो.

**आयुक्त :-**

जे घडलेल आहे तेच आम्ही प्रोसिडींगमध्ये नमूद केलेल आहे.

**रिटा शाह :-**

नाही पण ते प्रोसिडींगमध्ये नमूद नाही केलेल की त्यांनी इसारा रक्कम नाही म्हणून.

**आयुक्त :-**

आम्हाला त्याला दयायच असत तर तो प्रश्न आला असता. त्यांनी कोरी निविदा टाकलेली आहे हे आम्ही..

**रिटा शाह :-**

भरल नाही भरल तस मी बोलत नाही. कुणावर आपण दबाव करु शकत नाही. त्यानीं इसारा रक्कम नाही भरली ते प्रोसिडींगमध्ये नमूद करायला पाहीजे. त्यांनी इसारा रक्कम भरलेली नाही आहे. आणि आपण जो शासनाला रिपोर्ट पाठविणार आहोत त्याच्यामध्ये सुध्दा आपण पाठवा तसं कि दोन निविदा आल्या एकाने इसारा रक्कम भरली आणि एकाने नाही भरली. मग शासन बघणार ते योग्य आहे का अयोग्य आहे.

**आयुक्त :-**

मॅडम मुळ मुद्या असा आहे की आपण त्याचा विचार करतोय का ?या ठिकाणी देण्यासाठी नाही करत. आपण त्याच्यात फक्त कोरा फॉर्म टाकलेला आहे हे नमूद केलेल आहे.

**रिटा शाह :-**

आपण देणार आहोत की नाही देणार आहोत तो सभागृहाचा प्रश्न आहे.तुम्ही आणि मी मिळून काय देवू शकत नाही कोणालाही. प्रश्न असा आहे की त्यांनी इसारा रक्कम भरलेली नाही. ते प्रोसिडींगमध्ये नमूद करायला पाहिजे. ठिक आहे तुम्ही नाही केलं, शासनाला हे पाठविणार आहात त्या रिपोर्टमध्ये तुम्ही कळविणार आहात की नाही की त्यांनी इसारा रक्कम भरलेली नाही. आणि तुम्ही तो पाठविणार त्याची एक कॉपी मला भेटायला पाहिजे.

**आयुक्त :-**

शासनाला आम्ही सर्व वस्तूस्थिती कळवू, तुम्हाला त्याची एक कॉपी पाहिजे तर ती सुध्दा देवू.

**रिटा शाह :-**

त्याची मला एक कॉपी दया, आणि हे योग्य असेल तर आपण पाठवा माझा काही विरोध नाही आहे याला . दोन निविदा आल्या त्यात एक निविदा कोरी आहे व त्यांनी इसारा रक्कम भरलेली नाही. आपल्याला तातडीने, घाईगर्दीने असा निर्णय घ्यावा लागत असेल, आपणाला वाटत असेल तर महापौर मॅडमचा अधिकार आहे तो त्यांच्या अधिकाराचा वापर करुन त्यांनी ते करुन घ्यावं पण शासनाला आपण काही रिपोर्ट पाठविणार आहोत त्या सर्वांच्या कॉपी फक्त मलाच नाही तर सर्व नगरसेवकांना दयावी अशी माझी विनंती आहे.

**जयंत पाटील :-**

हा विषय आपण थोडा चुकीच्या पध्दतीने आणलेला आहे. मला वाटतं ज्याची निविदा भरलेली आहे त्याच नाव गोलानी आहे. म्हणजे थोडासा गोलमाल तो करतोय. ज्या माणसाने निविदा सोबत इसारा रक्कमच भरलेली नाही ते कसं आपण यामध्ये आणलं. आपण आपल्या वर्तमानपत्रामध्ये, साहेब मी बोलतोय. आपण ज्यावेळी जाहिरात दिलीत ...

**आयुक्त :-**

त्यांनी कोरी निविदा त्या बॉक्समध्ये टाकली. कोरी निविदा टाकताना..

**जयंत पाटील :-**

त्यांनी कोरी निविदा टाकली तर ती तुम्ही कचऱ्याच्या टोपलीत टाका ना. ज्या माणसान निविदा भरतांना...

**आयुक्त :-**

आपण कचऱ्याच्या पेटीत टाकू शकत नाही, तर ती आपण रद्द करु शकतो.

**जयंत पाटील :-**

तो माणूस आपल्या महानगरपालिकेला काय समजतोय.

**आयुक्त :-**

कचऱ्याच्या पेटीत टाकले तर आणखीन कायदेशीर प्रश्न निर्माण होतील. तुम्ही सुध्दा विचाराल की असल्या निविदा कचऱ्यांच्या पेटीत टाकतात का ?

**जयंत पाटील :-**

त्यांची लायकीच ती आहे. एक रुपयासुध्दा न भरता तो निविदा टाकतोय आपल्याकडे. आणि आपण आपल्या विषयावर तो आणतोय, आपण ज्यावेळेस निविदा मागवतो म्हणजे ती पध्दतच आहे. त्यावेळेस निविदा सोबत इसारा रक्कम, १५००० हजार रु. फॉर्मचे हे त्यांनी भरले पाहिजेत तरच ती निविदा तुम्ही विचारात आणू शकता. आणि तसं काही नसताना तो विषय आपण विषयपत्रिकेवर घेतोय आणि आपण सांगतोय की दोन निविदा आलेल्या आहेत आणि एक कोरी आहे. कोरी आहे याचा अर्थच मला कळत नाही. एक निविदा नुसतीच कोरी येते आणि ती आपण इकडे आणतोय, म्हणजे इकडे आपला उद्येश काय मला समजत नाही.

**आयुक्त :-**

पाटील साहेब मी पून्हा पून्हा खुलासा करतोय आपण लक्षात घ्या ही निविदा त्यांनी पेटीत टाकलेली आहे आणि ती कोरी आहे हे आम्ही सभागृहाच्या निदर्शनास आणलेल आहे. त्याच्यात काही गैर असेल असे मला वाटत नाही. त्यांनी जर देकार रक्कम त्याच्यामध्ये भरली असती तर हा इश्यू निघाला असता की त्यानी बाकीची रक्कम भरलेली आहे की नाही आणि मग जर ती भरलेली नसेल तर त्याला आम्हाला डिसकॉलिफाय करण्याची तरतूद झाली असती. परंतू कोरी टाकल्यामुळे आणि आम्ही त्याचा विचारच करत नसल्यामूळे बाकीचे सर्व प्रश्न गैरलागू आहेत त्याच्याबद्यलचे.

**जयंत पाटील :-**

साहेब आपण विचार करण्यासाठीच तर येथे विषय आणलेला आहे.

**आयुक्त :-**

त्याच्या संबंधिताचा विचार करण्यासाठी नाही आहे. गोलानीचा विचार करण्यासाठी हा सभागृहापूढे विषय नाही आहे हा.

**जयंत पाटील :-**

साहेब प्रोसिडींगवर नोंद करा माझी, ज्या माणसाने इसारा रक्कम एक रुपया सुध्दा भरलेली नाही तो विषय आपण येथे विषय पत्रिकेवर आणलेला आहे. सहकार एजन्सी जी आहे ती आपल्याकडे २९ करोड ०७ लाखाचा त्यांनी भरलेल आहे. आपल्या अर्थसंकल्पामध्ये ३० कोटी जकातीचे उत्पन्न दाखविले आहे. आपल्या अर्थसंकल्पामध्ये आहे. आपल्या अर्थसंकल्पामध्ये जेव्हा आपण ही निविदा मान्य कराल तेव्हा निश्चितच आपल्या अर्थसंकल्पामध्ये ९२ लाख रुपये कमी जमा होणार. त्यामुळे आपल्या अर्थसंकल्यामध्ये त्याच्यासंबंधी कमजोरपणा येईल किंवा काटछाट करावी लागेल. आपण जी दुसरी निविदा मान्य करण्यासाठी आणलेली आहे येथे सहकार एजन्सी . आणखी कुठल्या महानगरपालिकेमध्ये त्यांची एजन्सी आहे का ? अशी माहिती आपल्यासमोर यावी.

**आयुक्त :-**

आमच्याकडे लेखी तशी माहिती नाही. परंतू अनऑफीशली माहितीनुसार विरारला त्यांच काम चालू आहे असं समजतय. आपल्याला डिटेल आम्ही देवू शकतो.

**जयंत पाटील :-**

बस तेवढेच मला पाहीजे होते.

**रिटा शाह :-**

साहेब हे पण नमूद करुन घ्या. इसारा रक्कम त्यांनी भरलेली नाही फक्त कोरी निविदा त्यांनी टाकून दिलेली आहे. दाखविण्यासाठी की मी निविदा भरलेली आहे. आणि आपल्याला ही डायसवरुन आणि प्रोसिडींगमध्ये नमूद करायला सोप पडेल म्हणून त्यासाठी निविदा टाकली गेली आहे याचा अर्थ असा आपल्याकडे फक्त एकच निविदा आलेली आहे आणि एकाच निविदेवर आपण निर्णय घेतो असा त्याचा अर्थ होतोय. आणि असा स्पष्ट रिपोर्ट आपण शासनाला पाठवा हि माझी विनंती आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय साहेब ज्यावेळी आपण ऑक्ट्रॉयची वसुली कराल त्यावेळी रिसीट फाडणार ती महापालिकेची फाडणार का ? त्याच्यामध्ये साहेब ते काय करतात, बऱ्याच लोकांकडून डिपॉझिट रक्क्म घेतात . म्हणजे उदाहणार्थ माझे मोटारसायकलचे शोरुम आहे. आम्ही गाडया बाहेरुन आणतो लाखो रुपयांच्या गाडया आणतो. त्यातल्या काही गाडया आम्ही परत मुंबईत विकतो. तर ते लोक आमच्याकडून डिपॉझीट रक्कम घेतात. ५० हजार, २५ लाख रुपये त्यावेळी डिपॉझीटची जी पावती देतात ती महानगरपालिकेची असते. आता गेल्यावेळी आम्ही डिपॉझीट भरले होते ती रिसीट आजही माझ्याकडे आहे परंतू त्याची रीफंड आम्हाला भेटलेले नाही. हया अशा गोष्टी परत होतील. समजा एखादयाने करोड रुपये डिपॉझीट घेतले आहे तर याला जबाबदार कोण राहील. तर त्याच्यात अट टाकावी की जी डिपॉझीट रक्कम असेल ...

**आयुक्त :-**

पहिली गोष्ट म्हणजे डिपॉझीट ही बंधनकारक नाही. डिपॉझिटची व्यवस्था तुम्हाला जर हवी असेल तर ती तुम्ही घ्यायची. तुम्हाला नाक्यावरती दरवेळेला ऑक्ट्रॉय भरण्याचा त्रास जर वाचवायचा असेल तर तुम्ही त्याचे रेटपजेट भरायचं. वेळोवेळी मोटारी आयात होत असतील, इतर आयटम आयात होत असतील त्याचं जर ऑन द स्पॉट तुम्हाला पेमेंट करायच असेल तर तुम्हाला डिपॉझीट दयायची गरज नाही.

**नरेंद्र मेहता :-**

नाही साहेब मला असं म्हणायचं आहे की जेव्हा त्यांचा कालावधी पूर्ण होतो, तर त्यावेळी रीफंड करायचा वेळ असतो तो निघून जातो. अशा वेळी ज्यांनी डिपॉझीट भरलेली आहे त्यांनी कूठे क्लेम करायचा.

**आयुक्त :-**

तुम्ही मागणी करा ना तशी.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब मी मागणी केलेली आहे तशी हरीश पाटील साहेबांकडे ते ॲप्लीकेशन सुध्दा असेल. ते म्हणाले की त्यांनी ती रक्कम वसुल केलेली आहे पण ऑफीशली पावती मिरा भाईंदर महानगरपालिकेची आहे.

**आयुक्त :-**

बरोबर आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने ते करतात. आपण त्यांना एजेंट म्हणून नेमलेले आहे. आपण दिलेल्या डिपॉझीट इतका माल आपण आयात केलेला आहे की नाही याचा हिशोब हा त्यांच्याकडेच असणार आहे. आपण तो हिशोब क्लेयर करुन घेतला पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

मान्य आहे पण ते जे काही डिपॉझीट घेतात ती माहिती त्यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेला दयावी. म्हणजे शेवटी तो हिशोब आपण करु शकतो.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेबा, या ठिकाणी सभागृहाच्या समोर प्रकरण क्र. २ जकात वसुलीकामी अभिकर्ता नेमणेबाबत हा जो विषय आलेला आहे. मी आपणाला एक सुचना करु शकतो, आयुक्त साहेब या अगोदर देखील अशाच प्रकारच कॉन्ट्रक्ट, ठेका वसुली पध्दतीने आपण चेकनाका दिलेला होता. परंतु छोटेछोटे कारखाने या शहरामध्ये आहेत आणि काही मोठमोठे कारखाने बंद होत चालले आहेत. या अगोदर फार तक्रारी होत्या याच ठेकेदाबाबत. मी आपल्या निदर्शनात आणू इच्छितो की, हया ज्या छोटयाछोटया कंपन्या आहेत, नागरीक या ठिकाणी राहतात, ट्रेनमधून येतात, प्रवासामधून येतात त्यांना त्रास होवू नये. हया गोष्टीकडे आपण थोडीशी दक्षता घ्यायला पाहिजे. आणी छोटेछोटे कारखाने आहेत त्यांच्याकडे बिले नसतात त्यांना फार त्रास होतो. तिथे आपण थोडसं लक्ष दिलं तर फार चांगली गोष्ट होईल. आणि ही जी सुचना आता जो ठराव मांडलेला आहे ध्रुवकिशोर पाटील साहेब यांनी त्या ठरावास मी अनुमोदन देतो आणि हा ठराव मंजूरीस पास झाला असे मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त महोदय ठराव झालेला आहे सभागृह नेत्यांनी जी वस्तूस्थिती मांडली की शहराच्या विकासासाठी शेवटी उपकर किंवा जकात, लोकशाही पध्दतीने जकात लावावा असे सभागृहामध्ये भाजपा सोडून निर्णय झालेला आहे. आपली आज जी टिपणी आलेली आहे त्या टिपणीमध्ये माझे असे मत आहे की आयुक्त साहेब आपण ज्या पध्दतीने या टिपणीवर खुलासा दिला पाहिजे आपली

बाजू दिली पाहिजे ती आपण दिलेली नाही आहे. पहिली गोष्ट आपण हा जो ठेका आहे आपले फायनान्सीयल ईयर ३१ मार्च ला संपतेय. १ मे ला जी आपली पूर्ण जकात सुरु होणार आहे. माझ्या माहितीप्रमाणे १० दिवसानंतर, तर हा १ मे ते ३१ एप्रिल हा कालावधी होणार आहे त्याची या प्रोसिडींगमध्ये नोंद व्हायला पाहिजे होती. ती तशी केली गेलेली नाही. दुसरी गोष्ट मागच्यावेळी जे जकात शासनाकडून किंवा आपणाकडून वसूली त्याच्यापेक्षा १० टक्के किंवा १५ टक्के जास्त दराने आली पाहिजे असा काही तरी नियम आहे. तुम्ही लिहीताना सांगितले आहे की १२.९९ टक्क्यांनी जास्त अपेक्षित आलेली आहे. बहूतेक करुन ही बसत असेल. आपण प्रेस कॉन्फरंस मध्ये एक वक्तव्य दिलेले आहे. किती सत्य आहे किती खोटं आहे याच्यामध्ये ते मला माहित नाही आहे. पण जेव्हा आयुक्तांबद्यल एका वर्तमानपत्रामध्ये असे काही छापते त्यावेळी त्या वर्तमानपत्राची दखल आयुक्त साहेबांनी, या सभागृहाने किंवा संबंधित व्यक्तिने घेतली पाहीजे. मी अख्खी प्रेस नोट वाचून दाखवित नाही आहे फक्त शेवटची लाईन दाखवतोय, म्हणजे त्याच्यात तुमचा उद्येश खरोखरच सभागृहाला दिशाभूळ करण्याचा आहे किंवा वर्तमानपत्राने तुमची बाजू तोळूनमोळून छापलेली आहे. कारण छापतात. फक्त एकच निविदा असल्याने ती मंजूर करताना शासन सट्टा कायदयाप्रमाणे कारवाई करणार असेही त्यांनी सांगितले. म्हणजे तुम्ही सांगितलं, अस हे माझ्या हातात समाचार पत्र आहे त्यांनी आपल वक्तव्य छापलेले आहे. जर खरोखर सट्टाबाजार या सभागृहात होत आहे आणि ...

**मोहन पाटील :-**

वर्तमान पत्राच काय घेवून चालणार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मोहन पाटील साहेब ही लोकशाही आहे. सभागृहामध्ये ती बाब घेवो अगर न घेवो पण आयुक्त साहेब आपल स्टेटमेंट आहे तुमच्या नावाने स्टेटमेंट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महेंद्रसिंग चौव्हानांनी सामना दाखविला ते चालले का ठराव मंजूर झाल्याबरोबर हास्याची लहर आली या बाजूला , उतरलेले चेहरे हसरे झाले एकदम,जरा ऐकून घ्या पूर्ण.

**आयुक्त :-**

परत वाचा जरा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभापती साहेब आपण सर्व सभागृहाचे सभापती आहात. फक्त एका पक्षाचे नाही आहात.

**मोहन पाटील :-**

आम्ही एका पक्षाचे नाही आहोत हे मान्य करतो आम्ही. आम्ही तुमचे सुध्दा सभापती आहोत परंतू जे तुम्हाला बोललो मी वर्तमानपत्र सभागृहामध्ये गृहीत धरल जात नाही. त्या विषयी आपणाला बोललो मी. आपणाला दुखवायचा आमचा प्रयत्न नाही आहे. आपणाला दुखवण्याविषयी मी आपणांस बोललो नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे आयुक्त साहेबांना बोलू दया ना. अजून याच्यापूढे सांगतोय आपण एक आचारसंहिता काय बोलतात त्याला .. ते पाठविली शासनाकडे मंजूरीसाठी , उपविधी पाठविलेली आहे त्यामध्येही याचा उल्लेख आहे वर्तमानपत्राचा. त्याच्यामध्ये चर्चाही झाली होती. ती उपविधी अजून आलेली नाही. म्हणजे आज हे शब्द वापरतात वर्तमानपत्राबाबत, लोकशाहीमध्ये वर्तमानपत्राची आलेली बातमीचे त्याचे उत्तर लोकसभेमध्ये, विधानसभेमध्ये प्रत्येक ठिकाणी दिले जाते. मी कुठे म्हणतो खरी आहे मी पहिलाच सांगितले की ही बातमी खोटीही होवू शकते. पण आयुक्त साहेबांच्या नावाने शासन सट्टाबाजारच्या नियमाखाली कारवाई करु शकते अशी बातमी जर या वर्तमानपत्राने दिली तर ही गंभीर बाब आहे. आणि आजही आम्ही सांगतोय शेवटी आपणाला उत्पन्नाच साधन आपल्याला करावे लागेल. लोकशाहीने जो निर्णय होईल त्याप्रमाणे आपणाला करावे लागणार आहे. परंतू काही गोष्टी अशा अडचणीच्या येतात ते आपण या सभागृहात जाणून घेतले पाहिजे.

**आयुक्त :-**

फक्त एकच निविदा असल्याने ती मंजूर करताना शासन सट्टा कायदयाप्रमाणे कारवाई करायला सट्टा नावाचा कुठलाही कायदा अस्तित्वात नाही. म्हणजे याबाबतीत तरी मला वाटते प्रिटींग मिस्टेक असावी. संबंधित पत्रकार बसलेले आहेत तेही मान्य करतात की प्रिटींग मिस्टेक आहे. सद्या प्रचलित जे कायदे असतील अस कदाचित मी म्हटलो असेन आणि त्यांनी चुकीन

काहीतरी ऐकलेल दिसतय. हा एक मुद्या, आता याचा विषय संपला. आपण जो दुसरा मुद्या मांडला...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही याचा विषय संपलेला आहे. याचा अर्थ जी टिपणी दिली आपण त्या टिपणीमध्ये जे पत्रकारांना आपण सांगतात ते सभागृहाला आपण सांगत नाही असा याचा अर्थ नक्की झालेला आहे.

**आयुक्त :-**

सभागृहाला सांगतोच आहे मी. की शासनाकडे आम्ही पाठविणार आहोत. शासन याच्यावरती अंतिम निर्णय घेणार आहे . दुसरा जो मुद्या तुम्ही विचारला की एप्रिल ते किंवा पुढचा एप्रिल ते पुढचा मे असा आपण कालावधी मेंशन करायला पाहिजे होता, ॲक्चुली शासनाने याला मान्यता दिल्यानंतर ज्या तारखेला आपण ठेका त्यांना देवू तीथून एक वर्ष असा कालावधी मोजावा लागेल. म्हणून आम्हाला इथे तो निश्चित कालावधी लिहिता आला नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. नगरसेवक जयंत पाटील यांनी आता सांगितल अर्थसंकल्पामध्ये मोठी तूट पडणार आहे एक महिना आधीच लेट झालेल आहे.

**आयुक्त :-**

शासनाला मान्यता तरी दयावी लागेल किंवा अनुदान तरी दयावे लागेल. त्यामूळे आपल्या अर्थसंकल्पामध्ये कुठेकाही प्रॉब्लेम येणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दहा दिवसांत मान्यता मिळेल.

**आयुक्त :-**

निश्चितच.

**रतन पाटील :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतोय महापालिकेच्या उत्पन्नात भर करण्यासाठी जकात लागू करावी असा मागील सभेत ठराव सुध्दा मंजुर झालेला आहे. आणि आता त्याची निविदा मंजूरीसाठी या सभेत त्या निविदेचा ठराव सुध्दा आलेला आहे. जकातीच्या निविदा दोन आलेल्या आहेत त्यावर चर्चा झालेली आहे. आमच्या गटनेत्यांची मिटींग झाली त्यावेळी सुध्दा यावर चर्चा झालेली आहे. २९ कोटी ८ लाखापर्यंतची निविदा आलेली आहे आणि एक निविदा कोरी आहे. महापालिकेच्या उत्पन्नात थोडीशी अशी तूट पडलेली आहे. आणि ही तूट कशा पध्दतीने भरुन काढायची याकडे लक्ष वेधावे अशी मी आपणाला सुचना करतोय. बऱ्याच वेळेपासून जकात आणि उत्पन्न याच्यावर चर्चा होत आहे. पण मी सभागृहाला विनंती करेन आज आपली जकातीची ३० कोटीची वसुली आहे . माझ सभागृहाला व सन्मा.महापौरांना व मा. आयुक्तांना नम्र निवेदन आहे की ३० कोटीची जकात वसुली आपण ठरविलेली आहे ती पूढच्या वर्षी ६० कोटी कशी होईल याच्यावर लक्ष वेधल पाहिजे. कारण महानगरपालिकेचे उत्पन्न स्त्रोत्र हे पहिला वाढायला पाहिजे. आणि उत्पन्नाचे स्त्रोत हे मिरा भाईंदर महापालिकेतील या छोटयामोठया इंडस्ट्रीयल आहेत छोटयामोठया इंडस्ट्रीयलना, कारखाने वाढवून , काही खाडीलगत जे जी झोन आहेत अशा जी झोनमध्ये बदल करुन, आणि त्याच्यावर इंडस्ट्रीयल झोन वाढवावे. आपल्या शहरामध्ये व्यापारधंदे वाढवावे. कारखाने उभे झाले तरच आपल्याला उत्पन्नाच स्त्रोत्र वाढेल. माझी सभागृहाला व मा. महापौरांना अशी विनंती आहे की आपण या माझ्या सुचनेवर जरुर विचार करावा व महापालिकेचे उत्पन्न कसे वाढेल यावर लक्ष वेधावं.

**महापौर :-**

पूढचा विषय घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

या विषयावरती जो ठराव दिलेला आहे त्या संदर्भात मी स्वतः दिनांक १७/४/२००३ रोजी आपणा दोघांनाही पत्र दिलेल आहे. यामध्ये महाराष्ट्र शासन उदयोग , ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाकस- ०८८/२५१२ , उदयोग मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ , दिनांक २ फेब्रुवारी १९९२ यामध्ये अगदी सुस्पष्टपणे दिलेल आहे की स्वायत्ता संस्था यांना जी निविदा स्विकारायचे अधिकार आहेत त्यामध्ये किमान पक्षी कोणतीही निविदा जर एकच देकार आला तर तीच कमीत कमी दोन वेळा ती रिकॉल केली पाहिजे. टेंडर रि कॉल झालं पाहिजे. या विषया संदर्भात आर्थिक बाजूचा जो विचार आहे तो मी माझ्या पत्रात सुस्पष्ट उल्लेख केलेला आहे. एखादा टेंडर जर री कॉल केल तर काय फार मोठं आभाळ कोसळेल अस मला वाटत नाही. परंतू आयुक्तांनी आमच्या

गटनेत्यांच्या बैठकीमध्ये काही सुतोवाच केल  त्यामध्ये त्यांनी अस ही सांगितल की सदर प्रस्ताव आपण महाराष्ट्र शासनाकडे पाठवायचा आहे. महाराष्ट्र शासन सदर प्रस्ताव लिगल डिपार्टमेंटकडे पाठविणार म्हणजे शासन स्तरावरती आपण जो मंजुर करणारा ठराव किंवा जो प्रस्ताव आहे याची शहानीशा महाराष्ट्र शासनाकडून कायदेशीर बाबी पडताळून होणार आहे. मला या अगोदरच अस वाटतय की आपण महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र शासनाच आदेश आणि जे पत्रक आहे, २ फेब्रुवारी १९९२ त्याच उल्लंघन करतोय अस मला वाटतय. माझी सभागृहाला अशी विनंती आहे की सदर ठराव हा मतदानाला टाकावा. आणि या ठरावाला माझा विरोध आहे.

**सुरेद्रप्रसाद तिवारी :-**  मै इस ठराव का अनुमोदन करता हुॅं.

**नयना म्हात्रे :-** माझे या ठरावाला अनुमोदन आहे.

**प्रियांका करंबेळे :-** मा. महापौर मॅडम नगरसेवक मिलन म्हात्रे यांना मी अनुमोदन देत आहे.

**प्रभारी सचिव :-** जो विरोध आहे त्याची नोंद घेतली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही मताच आपल्याला सांगितले आहे ठराव मताला ध्यावा. महापौरांनी रुलिंग दयाव की किती मत ठरावाच्या विरोधात आहेत व किती बाजूने आहेत. हे सुस्पष्ट कराव. ठराव करण्याची घाई केलेली आहे.

**महापौर :-**

बहुमताने पास.

**मिलन म्हात्रे :-**

मी असही म्हणेन की जे नलावडे साहेबांनी अनुमोदन दिलं, नलावडे साहेब  स्टॅडींग कमिटीला दोन लाख, पाच लाख, दहा लाख आपल्याकडे जी काम येतात आणि जर एकच टेंडर असेल तर ते आपण री कॉल करतो. त्याच्यामध्ये आपली नोंद झालेली आहे टेंडर री कॉल करा म्हणून, तिकडे आपली भुमिका निराळी असते आणि इकडे निराळी का ? कॉग्रेस पक्षाचीसुध्दा काल सकाळी आम्ही जेव्हा बसलो तेव्हा भुमिका निराळी होती आणि आता अचानक मत परिवर्तन झालेल आहे. आम्ही आमच्या निर्णयाशी ठाम आहोत सदर ठराव हा मताला टाकावा. मताची मोजणी करावी..

**आयुक्त :-**

सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे यांनी या ठिकाणी मुद्दे उपस्थित केलेत. त्याच्यामध्ये त्यांनी शासकीय परिपत्रकाचा जो उल्लेख केलेला आहे ऊदयोग विभागाच्या ते माझ्या समोर आहे या सभागृहाला मी खुलासा करु इच्छितो की वस्तु खरेदी करण्याबाबतची जी प्रक्रिया आहे या सदर्भात हे नियम शासनाने केलेले आहेत या राज पत्रान्वये , याच्यामध्ये एखादया निविदेतून कमी प्रतिसाद मिळाल्यास म्हणजे निविदा चौकशीला दोन वेळा मुदतवाढ दयावी असे आदेश आहेत तथापी असे न करता उपलब्ध निविदेतून पूरवठा दाराची निवड करण्यात येते अस म्हटलेलं आहे. आपल्या ऑक्ट्रॉयच्या ठेक्यासाठी हा तंतोतंत लागू होतो अस नाही. पूरवठा दाराच्या संदर्भात हा नियम शासनाने केलेला आहे. दुसरी गोष्ट मी आपणाला सांगितली की ही एक परिस्थिती अपवादात्मक आहे मी आपणाला खुलासा केला की मोठमोठया देश पातळीवरच्या आणि राज्य पातळीवरच्या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देवून देखील आपल्याला प्रतिसाद फार कमी मिळालेला आहे ही वस्तूस्थिती आहे. री टेंडरींगमध्ये पुन्हा प्रतिसाद मिळेल का ?  याची देखील आपल्याला हमी नाही. रि टेंडरींगमध्ये कदाचित याच्यापेक्षा कमी दर सुध्दा भरले जातील आणि त्यावेळेला जर नुकसान झाल तर ती कुणाची जबाबदारी राहील हा एक प्रश्न आहे. तेव्हा ही ऑफर आपल्याला मिळालेली आहे ती रिजनेबल आहे. आणि म्हणून आपण शासनाला ही कळवतोय. आपण शासनाला अस नाही कळवत की कायदेशीर आहे , हे बरोबर आहे, हे असंच झाल पाहिजे असा आपला आग्रह नाही आहे. आपण सर्व वस्तूस्थिती शासनाच्या मान्यतेसाठी पाठवित आहोत शासनाच्या निदर्शनात आणत आहोत. की अशी परिस्थीती घडलेली आहे आणि या परिस्थितीमध्ये आम्हाला अस वाटत की हा ठेका खाजगी ठेकेदाराला देण इष्ट आहे. मग शासन आपणाला सांगेल की हे योग्य नाही आपण आणखी एकदा प्रयत्न करा.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जे याच्यामध्ये आता जे आम्हाला या सभागृहाला खुलासा केलेला आहे यामध्ये एखादया निविदेतून कमी प्रतिसाद मिळाल्यास निविदा चौकशीला दोन वेळा मुदतवाढ दयावी. असे आदेश आहेत, परंतू ते आदेश पालन केले जात नाहीत म्हणून त्याच्यामध्ये अस दिलेल आहे तथापी

असे न करता उक्त निविदेतूनच पुरवठादाराची  निवड करण्यांत येते. ते ॲडॉप करत नाहीत म्हणून हे आदेश दिलेले आहेत असा त्याचा अर्थ.

**आयुक्तः-** :-

आपण करत नाही आपण शासनाकडे पाठवित आहोत. हा फरक आहे त्याच्यामध्ये.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणूनच आपण हे ॲडॉप कराव मग शासनाकडे पाठवाव अस आमच प्रामाणिक मत आहे. आता अगोदर जयंत पाटील साहेब बोलले की याच्यामध्ये ती निविदा कोरी भरली गेलेली आहे म्हणजे एकच निविदा आलेली आहे. तो डमी असू शकतो आणि आम्ही  म्हणतोय मतदानाची मागणी केलेली आहे , मतदान होऊन जाऊदया. सुस्पष्ट आम्ही निवेदन दिलेल आहे. आणि महापौर मॅडम यांनी रुलिंग दयाव जे काही असेल ते.

**महापौर :-**

ठराव बहुमताने पास.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतोय आयुक्त साहेब अत्यंत अनुभवी आहेत. अस सगळयांच मत आहे आमचही मत आहे. जकाती सारखा एवढा मोठा विषय एका ठेकेदाराला देण्याचा, सभागृहाने एका ठेकेदाराला निवडले नाही, सभागृहात विषय येतेवेळीच एक ठेकेदार आलेला आहे. ज्या पध्दतीने ठेकेदार आलेला आहे त्यावर सभागृहात बरीच चर्चा झालेली आहे. एक कोरी निविदा इसाऱ्याची रक्कम न घेता स्विकारली ती एकाच्या ऐवजी अनेक अस दाखवतंय पण त्याची व्हॅल्यू शुन्य आहे. आपल्या तिजोरीत एक रुपया नाही आला व या सभागृहाच्या कामकाजात ही त्याची किंमत काही नाही आहे. मुळात हा जकात एका ठेकेदाराला देतेवेळी जकात वसुलीचे काम महानगरपालिकेने करावे की ठेकेदाराने करावे , नगरपालिकेचे अनुभव, या सभागृहात तासनतास चर्चा झालेली आहे. या सभागृहाच्या भावनेच कुठेही नोंद घेतल्याच आयुक्तांच्या निवेदनात आलेल नाही. आमच्या सभागृह नेत्यांना फार मोठी घाई झाली. सभागृह नेते तरुण आहेत कदाचित भूक वगैरे लागली असेल अस ही समजू या. ठराव मंजूर करुन घ्यायची घाई असेल. आम्हाला त्यातली घाई वगैरे काही नाही, जेवण सावकाश होईल. एक नक्की आहे की ,.. नाही मॅडम ज्याला जायच असेल त्याला महापौर परवानगी देतील मी कुणाला सांगू शकत नाही की ज्यांना जायचं आहे त्यांनी जाव अस तो विषय वेगळा आहे. पण एक नक्की आहे की ज्या पध्दतीन हा विषय आणला , तर पहिल्यांदा सभागृह नेत्यांनी निवेदन करण्याऐवजी आयुक्तांनी या सभागृहाच्या आधीच्या भावनांची दखल घेवून या अटीशर्ती आम्ही ठेकेदारासाठी ठेवलेल्या आहेत आणि त्यातून हा ठेका आम्ही सिलेक्ट करतोय अस कुठही निवेदन केलेल नाही. आम्ही सांगू ते तुम्ही ऐकून हो म्हणणार तुम्ही कुणासाठी हो म्हटलं त्याचा उलगडा आम्हाला तर होणार नाही. तर तो नंतर जेव्हा वाद होईल तेव्हा. आधिच स्पष्ट सांगितल असत की तो या या पध्दतीने ठेका वसूल करील अस तुम्ही कुठे निवेदन केलेल नाही. आणि भारतीय जनता पार्टीच्या आता मघाशी जस म्हटल महापौर आणि तुम्ही ही त्याला हो म्हटल त्यामूळे अत्यंत आश्चर्य वाटल आम्हाला. या महापालिका अधिनियमामध्ये स्पष्ट लिहीलेल आहे की या सभागृहाचे चार नगरसेवक जेव्हा मागणी करतील तेथे मतदान होणं आवश्यक आहे. हा तर कायदा नक्की आहे. स्पष्ट चार लोकांनी म्हटलेल आहे एका पक्षाच्या. मी कधीतरी बोलतो ते पक्षाच्या वतीने बोलतोय इथे स्पष्ट चार लोकांनी बोललेल आहे  की याला मतदान करा तेव्हा मतदान प्रक्रिया होण जरुरीचे आहे. आणि स्पष्ट आहे एक ठेकेदार मांडतोय भुमिका. एका बाजून देकाराची रक्कम आपल्याला कमी येते. आपल्या बजेटवर त्याचा परिणाम होणार आहे. आपण असा खुलासाही त्याच्यात केलेला नाही की आपण जर हा देकार रि कॉल करतो तर सरकारची या तारखेपर्यंतच आपल्याला मुदत आहे नंतर त्या मुदतीत नाही झाल तर महानगरपालिकेच इतक नुकसान होईल याचाही उलगडा आपण केलेला नाही. म्हणजे सरकार किती तारखेर्यंत तुम्हाला मुदत देवू शकते. रि कॉल केल तर नक्की मुदत मिळेल की नाही मिळेल जर नसेल मिळत असेल तर हया तारखेपर्यंतच ही मुदत आहे आणि या मुदतीतच आपणाला ठेकेदार फायनल करणं आवश्यक आहे. आपण एकदम प्रामाणिक सांगितल की हयाच्यासाठी आपण कुणाला फॉर करतो अस तुमच्या वक्तव्यात आलच नाही. आणि येवू ही शकणार नाही. पण जे आपण देवू ते शासनाला देतोय शासन मंजूरी देईल, शासन मंजूरी देतेवेळी आपण नवा पायंडाच का पाडायचा. की या सभागृहाने मंजूरी दिली नंतर शासनाकडे आपण पाठविल आणि शासनाने आपणाला परत पाठविल अस करतेवेळी त्याच्यात तांत्रिक बाजू सांभाळून घेवून समजावून घेवून की आपल्या महापालिकेत

त्याच नाव राहील की आपल्या महानगरपालिकेने हा विरोधी किंवा एक मताचा विषय न करता, मघाशी सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रेंनी सांगितल की कॉग्रेस वाल्यांनी दुटप्पी भुमिका घेतली आम्हाला त्याचा नेहमीचाच अनुभव आहे तेव्हा आम्हाला त्याबद्यल काही बोलायच नाही आहे. या सभागृहाच्या कामकाजाचा वेळ जातोय त्याच्यात कुठे तरी आपल्या पक्षाने एक भुमिका स्पष्ट ठेवावी. पक्षाच्या भुमिकेवर आम्हाला बोलायच नाही. पण ज्यावेळी शहराच्या विकासाचा प्रश्न येतोय या वेळी सभागृहाच्या कामकाजाचा विषय येतोय, सभागृहाच्या वेळेचा विषय येतोय तर ही सभा अकरा वाजताची सभा साडे अकरा वाजता सुरु होत नाही. मग एक गट कधीतरी प्रवेश करणार तेही सभागृहामध्ये सन्माननीयच आहेत. त्यांचा निर्णय काय होतोय , गटनेत्यांचा निर्णय काय होतोय हया संबंध पध्दती सभागृहाच्या कामकाजाच्या, या महापालिकेच्या अखंड पाच वर्षाच्या कारकिर्दीला गालबोट लावणाऱ्या आहेत. किंवा चिंतेचा विषय करणाऱ्या आहेत. आमच्या वाटेला फक्त चिंता करण्याचच काम आहे. त्याच्यामुळे त्याच्या पलिकडच आम्ही तुम्हाला काही सांगत नाही. आता जो ठराव होणार आहे त्याच्यावर काय निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे ते सांगा. मग आम्ही आमच मत मांडू.

**रोहित सुवर्णा :-**

महापौर मॅडम या सगळया ऑक्ट्रॉयच्या विषयावर मुंबईच्या उच्च न्यायालयाचे माजी जज्ज होते लेंकीन त्यांचा एक आयोग नेमला होता शासनाने त्या आयोगाचा जो काही रिपोर्ट आहे त्यावरही अभ्यास करण्यात यावा. अशी माझी सूचना लेखी स्वरुपामध्ये सभागृहापूढे दखल करुन घ्यावी. हि विनंती.

**मिलन म्हात्रे :-**

खाजगी ठेकेदाराला दयायच की नाही हा विषय मागच्या वेळेला झाला. त्याच्यावर मतदान झाल. क्लेयरकट दिलेल आहे की ७७ मत झाली डिटेल दिलेल आहे. हा आता कुणाला दयायचा आहे हे ठरवायच आहे आपल्याला आणि आपल्याला आमच नम्र निवेदन आहे की जी काही प्रतीस्पर्धा होणार आहे त्याच्यामध्ये होऊन जाऊदया. सिंगल याच्यामध्ये सभागृहामध्ये एकदा का हा मेसेज गेला तर परत परत आम्ही पण स्टँडीगला असच करु साहेब. जे जकातीच्या बाबतीत घडल ते इकडेही करा.

**आयुक्त :-**

स्टँडीगचा विषय खर्चाचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तस नाही साहेब हे जेष्ठ सभागृह आहे ना याच्यात तुमचा एकदा निकाल लागला मग आम्ही तो खाली पण पकडू.

**आयुक्त :-**

या तुलनात्मक गोष्टी नाही आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

एकीकडे आपण लॉ जूडीशरीच्या गोष्टी करता, मंत्रालयामध्ये त्याची छाननी होणार आहे. आम्ही कस त्याच्यात फसयाचे? करुन टाका ना मतदान आम्ही स्पष्ट मागणी केलेली आहे चार नगरसेवकांनी. घ्या मतदान ज्यांना ठरावाच्या बाजूने मतदान करायचे आहे त्यांना कराव आमचा विरोध आहे हे आम्ही नोदवलेल आहे संपल.

**शशीकांत शहा :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतोय या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे. कॉग्रेस पक्षाला शिकवणारे सुध्दा येथे आहेत. कॉग्रेस पक्ष कोणाच्या सांगण्यावरुन चालणारा नाही आहे. आम्ही सुध्दा भरपूर विचार केलेला आहे या विषयावर आणि विचार केल्यानंतरच या ठरावास अनुमोदन दिलेल आहे. आणि अनुमोदन हे आमचे निश्चितच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मतदान करा ना.

**महापौर :-**

बहूमताने झालेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम चार सदस्यांनी मागणी करुनही तुम्ही मतदान घेत नाही.

**महापौर :-**

बहुमताने पास असे मी तुम्हाला सांगितले. कीती वेळा सांगू मी.

**रोहिदास पाटील :-**

आमची मत तुम्हाला देतो ना. नको आहेत.

**महापौर :-**

पुढचा विषय घ्या. आम्हाला चर्चमध्ये जायच आहे.

**रोहिदास पाटील :-**

याच मतदान तुम्ही घेतलेल नाही. भारतीय जनता पार्टी शासन जो निर्णय देईल त्याचा स्विकार करील. आजच्या सभागृहामध्ये भारतीय जनता पार्टीची तटस्थ भुमिका आहे.

**प्रकरण क्र. ०२ :-** **<u>जकात वसुली कामी अभिकर्ता नेमणेबाबत.</u>**

**ठराव क्र.०२ :-**

महानगरपालिकेने जकात वसुलीकामी अभिकर्ता नेमणेबाबत दि.२४/२/२००३ च्या ठराव क्र. ५६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेने दि.२६/३/२००३ च्या वर्तमानपत्रात अभिकर्ता नेमणेबाबत जाहिर सुचना प्रसिध्द केली होती. सदर जाहिर सुचनेनुसार महानगरपालिकेकडे एकुण २ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| महानगरपालिका देकार रक्कम | -- | रु.३२,६८,५८,६६०.०० |
| शासनाकडून जकात वसुलीची नुकसान पोटी मिळणारी रक्कम | -- | रु.२६,५६,००,०००.०० |

जकात अभिकर्ता नेमणेसाठी जाहिर निविदा मागविल्या असता २ निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी

| | | |
|---|---|---|
| मे.गोलानी कंस्ट्रक्शन कं. यांची निविदा कोरी आहे.-- | | -- |
| मे. सहकार एजन्सी यांची निविदेतील रक्कम | -- | २९,०७,९९,९९९.९९ पैसे |

सदरची निविदा महानगरपालिकेच्या देकार रक्कमेपेक्षा रु.३,६०,५८,६६०.०१ पैसेने कमी आहे.

| | | |
|---|---|---|
| प्राप्त झालेल्या निविदेची रक्कम | -- | रु.२९,०७,९९,९९९.९९ पैसे |
| मागील वर्षी शासनाकडून मिळालेले अनुदान | -- | रु.२६,५६,००,०००.०० |
| एकुण | -- | रु. २,५१,९९,९९९.९९ पैसे |
| म्हणजेच मागील वर्षी शासनाकडून मिळालेल्या अनुदानापेक्षा निविदा मंजुर केल्यास जादा मिळणारी रक्कम | -- | रु. २,५१,९९,९९९.९९ पैसे |
| या शिवाय महानगरपालिकेने जकात वसुली केल्यास होणारा संभाव्य आस्थापनेचा खर्च | -- | रु. ६८,१०,२००.०० |
| एकुण | -- | रु. ३,२०,१०,१९९.९९ पैसे |
| स्टेशनरी , वाहन डिझेल, गणवेश, सुरक्षारक्षक इत्यादी वरील खर्च | -- | रु. २५,००,०००,.०० |
| एकुण | -- | रु. ३,४५,१०,१९९.९९ पैसे |

म्हणजेच सारासार विचार करता शासनाकडून मागील वर्षी मिळालेल्या अनुदानापेक्षा १२.९९ जादा रक्कमेची अपेक्षित वाढ होत आहे. ही वस्तुस्थिती आहे.

महानगरपालिकेने स्वतः वसूली केल्यास इतकी मोठी रक्कम वसुल होणार नाही. कारण महानगरपालिकेकडे जकात वसुलीसाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही.सद्यस्थितीत कर्मचा-यांकडून वसुली केल्यास सर्व कर्मचा-यांना कार्यालया बाहेर पाठवावे लागेल त्यामुळे कार्यालयीन कामकाज ठप्प होईल. वरील परिस्थितीत एकच निविदा आली असली तरी त्यावर निर्णय घेऊन शासनाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवणे बंधनकारक असलेने ही सभा सदरचा प्रस्ताव मंजूरी करिता शासनाकडे पाठविणेस शिफारस करीत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे**

**ठराव बहुमताने मंजुर**

**(प्रभारी सचिवांनी विषय क्र.३ चे वाचन केले)**

**रिटा शाह :-**

विषय क्र. ३ कॉन्ट्रक्ट पध्दतीने मजूर घेणेबाबतचा विषय आहे. त्याच्यामध्ये पान क्र. ४ वर आपण प्रभाग दिलेले आहेत. आणि त्याचा अंदाजित खर्चही आपण दिलेला आहे. आणि दुःखाची गोष्ट अशी आहे प्रभाग क्र. २१ चे नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील आमचे सभागृह नेते पण आहेत. आणि आमच्या प्रभागाचाच त्यात उल्लेख नाही. आमच्या प्रभागासाठी आपण खर्च करणार आहात की नाही.

**रक्षा शहा :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतेय २१ आणि २६ क्रमांकाच्या प्रभागाचा पण यात उल्लेख नाही. त्यात पण खर्च करणार आहात की नाही.

**रिटा शाह :-**

सभागृह नेते आपल्या प्रभागाचा यात उल्लेख नाही आपल्याला मजूर मिळणार नाही. आणि साफसफाई पण होणार नाही आपल्याकडे.

**डॉ. बावसकर :-**

प्रिटींग मिस्टेक आहे.

**रिटा शाह :-**

प्रिटींग मिस्टेक नाही साहेब याला आपण बोलू शकत. नजरचूक झाली असेल.

**रक्षा शहा :-**

याच्यामध्ये २६ चा पण उल्लेख केलेला नाही आहे. खर्चाचा पण उल्लेख केलेला नाही आहे. म्हणजे आमचा प्रभागात काम करणार आहेत की नाही ?

**रिटा शाह :-**

आमच्या प्रभागासाठी किती खर्च होणार आहे. साहेब अंदाज काढला आहे का प्रभाग क्र. २१ ला किती खर्च देणार आहात ? किती मजूर देणार आहात?

**मिलन पाटील :-**

आमच्या २६ क्रमांकामध्ये सुध्दा काही झालेल नाही. आम्ही चार नगरसेवक आहोत व सर्वात मोठा आमचा प्रभाग आहे.

**रिटा शाह :-**

म्हणजे सात नगरसेवकांना याच्यात वगळल गेल आहे.

**रक्षा शहा :-**

सर्वात मोठा आमचा वॉर्ड आहे.

**रिटा शाह :-**

साहेब आमच्या प्रभागाला किती खर्च मिळणार आहे काही अंदाज आहे का ?

**डॉ. बावसकर :-**

मा. महापौर महोदया महापालिका हद्दीचे एकूण आपण जे सहा झोन आहेत त्यामध्ये एकुण दहा झोन केलेले आहेत आणि कामकाजाच्या दृष्टीने केलेले आहेत. आणि भाईंदर पश्चिमच्या झोनमध्ये प्रभाग क्रमांक ५, १६, १७, २१, आणि २६ याचा समावेश केलेला आहे. प्रिटींग मिस्टेकमुळे टाईप झालेल नाही. परंतू या ...

**रिटा शाह :-**

नाही साहेब अस बोलू नका प्रिटींग मिस्टेक आहे. मग त्या टायपिस्टला बोलवा तुम्ही लिहून दिल होत की नाही दिल होत, तुमच कच्च दाखवा आम्हाला.

**डॉ. बावसकर :-**

लिहून दिलेल आहे.

**रिटा शाह :-**

लिहून दिलेल आहे मग त्या टायपिस्टने मुद्यामहून टाईप नाही केल का ते ?

**डॉ. बावसकर :-**

आणि या सर्व खर्चाचा समावेश आपण केलेला आहे. महापालिकेच्या सर्व प्रभागांचा यात विचार केलेला आहे. प्रत्येक प्रभागातील रस्ते , गटारे यांची लांबी रुंदी याचा विचार केलेला आहे. आणि संपूर्ण साफसफाईच्या दृष्टीने हा प्रस्ताव ..

**रिटा शाह :-**

म्हणजे भाईंदर पश्चिमेचे जे आपण ५४ लाख काही आकडा दिलेला आहे

**रक्षा शहा :-**

साहेब याच्यात आकडयाची पण चुकी झालेली आहे. २६ मध्ये आकडयाचा उल्लेख नाही आहे.

**रिटा शाह :-**

भाईंदर वेस्टचा खर्च दाखवलेला आहे तो २१ आणि २६ साठी आहे का ?

**मिलन पाटील :-**

ही जी प्रिटींग मिस्टेक होते आणि हया जेव्हा तुम्ही प्रती पाठविता तेव्हा हया चेक का करत नाही ? म्हणजेच हा तुम्ही अजेंठा आमच्याकडे पाठविता तो तुम्ही चेक करुन पाठवित नाही आमच्याकडे. २६ क्रमांकामध्ये काय कीती होणार आहे हे आम्ही आमच्या मतदारांना काय सांगणार ? अगोदर २६ नंबरमध्ये तुम्ही किती खर्च करणार आहात याचा खुलासा करा.

**रिटा शाह :-**

माझे दोन प्रश्न अगोदर ऐकून घ्या बावसकर साहेब, की २१ आणि २६ हे दोन प्रिटींग मिस्टेक सांगता , नजरचूक म्हणा की काही म्हणा त्याला. पण आपण जो खर्च भाईंदर पश्चिम असा दाखविला आहे त्या खर्चामध्ये सर्व वार्ड इन्क्लुड झाले आहेत का ? की प्रभाग क्रमांक २१ व २६ साठी वेगळा खर्च असेल.

**डॉ. बावसकर :-**

मा. महापौर महोदया यामध्ये विभाग भाईदर पश्चिम अ या विभागामध्ये प्रभाग क्रमांक ५,१६,१७,२१,२६ व भाईंदर पश्चिम ब विभाग या विभागामध्ये प्रभाग क्रमांक २०,३,आणि ४ आणि दुसरा गट आहे मुर्धा ते उत्तन.

**रिटा शाह :-**

पहिल्या गटामध्ये अंदाजित खर्च आपण किती दाखविलेला आहे.

**डॉ. बावसकर :-**

यामध्ये अंदाजित खर्च सर्व प्रभागांचा भाईंदर पश्चिम अ विभागामध्ये ५४ लाख ४८ हजार ६९८ रुपये.

**रिटा शाह :-**

याचा अर्थ भाईंदर पश्चिममध्ये हे इन्क्लूड आहे. आणि ही सर्व राशी भाईंदर पश्चिमची आहे.

**डॉ. बावसकर :-**

हो सर्व इन्क्लूड आहे. भाईंदर पश्चिमचे दोन विभाग आपण केलेले आहेत.

**रिटा शाह :-**

दुस-या विभागाच तुम्ही वेगळ दिलेल आहे. म्हणजे ५४ लाख तुम्ही बोललात तेवढयाच वार्डासाठी आहे.

**डॉ बासवसकर :-**

हो प्रभाग क्रमांक ५,१६,१७,२१ व २६ साठी.

**रिटा शाह :-**

तेवढे पुरणार आहेत का ? वार्ड क्रमांक २६ मोठा आहे. आणि इतका खर्च पूरणार आहे का? लेबर किती देणार आपण ?

**डॉ. बावसकर :-**

मा. महापौर महोदया मी संपूर्ण दहा झोन जे केलेले आहेत त्याबद्यल मा. सभागृहाला पूर्ण माहिती देतो. भाईंदर पश्चिम अ विभागात ५,१६,१७,२१ व २६ यामध्ये रस्त्याची अंदाजित लांबी आहे २५,२७७ मिटर गटारांची लांबी आहे ४२,९७१ मिटर सद्या या विभागामध्ये आपण दिलेले कामगार आहेत ६६ आणि या विभागात या प्रस्तावात प्रस्तावित केलेले कामगार आहेत ११७ आणि डंपर्स प्रस्तावित केलेले आहेत ३. त्यानंतर भाईंदर पश्चिम ब विभागात यामध्ये प्रभाग क्रमांक २०,३,४ यामध्ये रस्त्यांचे अंदाजित लांबी आहे १७,०४६ मिटर गटारांची लांबी २८,९७८मिटर.

**रिटा शाह :-**

साहेब प्रश्न फक्त आमच्या वार्डाचाच उचललेला होता संपूर्ण सांगायची गरज नाही आहे. प्रभाग क्रमांक २१ साठी आपण जे मजूर देणार त्यांची हजेरी तुम्ही कूठे लावणार आहात.

**डॉ.बावसकर :-**

प्रत्येक प्रभागातील आपले जे स्वच्छता निरिक्षक आहेत ते यावर नियंत्रण ठेवणार आहेत. त्या त्या ठिकाणी याचा संपूर्ण रेकॉर्ड उपलब्ध राहणार आहे. आणि यामध्ये आपण ज्या अटीशर्ती टाकणार आहोत त्या अटीशर्तीमध्ये ..

**रिटा शाह :-**

नेमके कुठल्या कार्यलयामध्ये हे उपलब्ध होणार . किती कामगार आले किती गेले . आपल्याकडे कार्यालय भरपूर आहेत तर तो रेकॉर्ड कूठे ठेवणार.

**डॉ. बावसकर :-**

भाईंदर पश्चिम .

**रिटा शाह :-**

शेवटी साहेब अस होणार आहे मजूर नाही भेटले साफसफाई नाही झाली असा जवाब आम्हाला भेटणार आहे.

**डॉ. बावसकर :-**

सन्मा. महोदया हे जे कामगार दिलेले आहेत दाखविलेले आहेत. सदरचे प्रस्तावामध्ये अंदाजित इतके कामगार या विभागामध्ये साफसफाईसाठी लागणार आहेत सद्याचे कामगार विचारात घेवून. परंतू ठेकेदाराची जबाबदारी सपूर्ण विभाग साफ ठेवण्याची आहे. संपूर्ण रस्त्यावरचा कचरा त्यांनी उचलायचा आहे गटारे साफ ठेवायची आहेत. त्या विभागातील प्रत्येक इमारत, घर किंवा चाळ याठिकाणी जो कचरा निर्माण होतो ...

**रिटा शाह :-**

ते सर्व मला मान्य आहे आपण कॉन्ट्रक्ट पध्दतीने देणार आहोत. कॉन्ट्रक्टर आपल्याला लेबर देणार आहे आणि संपूर्ण लक्ष दयायच आहे की सर्व घरोघरी औषध फवारणी झाली की नाही , गटारे साफ झाली की नाही, रस्ते सफाई झाली की नाही, कचरा उचलला की नाही हे सर्व आपण कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने आपण देणार आहोत व त्यांना त्यावर पूर्ण लक्ष दयायचे आहे. उदया त्याच्यामध्ये कमी जास्त काही झाले तर त्याला जबाबदार कोण कॉन्ट्रॅक्टर राहणार की आपण राहणार. याचा जवाब कोणाला विचारायचा. उदया आम्हाला असा जवाब नाही भेटायला पाहिजे की कॉन्ट्रॅक्टरने माणसे नाही पाठविली, तर त्याला जबाबदार कोण राहणार.

**डॉ. बावसकर :-**

जबाबदार महापालिकाच राहणार आहे. कॉन्ट्रॅक्टरने जर काम नाही केल संबंधित विभागामध्ये तर त्याच्यावर आपण जबरदस्त दंडात्मक कारवाई करणार आहोत.

**रिटा शाह :-**

साहेब मुद्यामहून मी आपल्या तोंडून हे काढून घेत होती. आता आपल्याकडे घरोघरी औषध फवारणीचे काम चालू आहे आणि त्याबाबत मी पत्र सुध्दा टाकलेल आहे. तेव्हा बावसकर साहेबांशी माझ फोनवर बोलण सुध्दा झाल होत. एक डॉक्टर म्हणून त्यांची नेमणूक झालेली आहे इथे. पण मला नाही वाटत की प्रभाग क्रमांक २१ मध्ये कींवा दुसऱ्या वार्डामध्ये त्यांनी स्वतः विझीट दिली असेल. कारण लोकांची कंप्लेंट आहे , लोकांना याबद्यल अजूनही काही जाणीव नाही. औषध टाकतात की फक्त पाणी टाकून घरी जातात अशी कंप्लेंट आहे. मागच्या मिटींगमध्येसुध्दा एका नगरसेविकेने हा प्रश्न उपस्थित केला होता. आणि अजूनही घरोघरी औषध फवारणी झालेली नाही.

कुठे आपण कंप्लेंट केली की लगेच दुसऱ्या दिवशी माणस येतात आणि फवारणी करुन जातात. आणि मागे मला सांगितले की औषध उपलब्ध नाही. मग औषध उपलब्ध नाही तर ते औषध किती लागणार ...

**मिलन पाटील :-**

मॅडम आता दुसऱ्यांनाही बोलू दया. आमचे सुध्दा प्रभागाचे प्रश्न आम्हाला मांडायचे आहेत.

**रिटा शाह :-**

आता परत तेच झालेय विवश झालेत ते लोकं. माझ्या प्रश्नाच जबाब भेटल्यावर मी बसेन साहेब. जस कॅबीनेटमध्ये होते तस टाईमिंग फिक्स करा की एका नगरसेवकाने इतकच मिनीट बोलायचं.

**मिलन पाटील :-**

त्याची आवश्यकता नाही.

**रिटा शाह :-**

माझा प्रश्न असा आहे जेव्हा मी बावसकर साहेबांना विचारल तिथल्या एस.आय. ला विचारल तर ते औषध आमच्याकडे उपलब्ध नाही , स्टॉकमध्ये नाही. मग आपण त्याला स्टॉकमध्ये औषधे दिली नाहीत तर कॉन्ट्रॅक्टर टाकणार कशी. माझा प्रश्न हा आहे महत्वाचा आहे. मी काही सभागृहाचा वेळ वाया घालवत नाही. दुसऱ्यांना काही बोलायच असेल तर बोला ना.

**मिलन पाटील :-**

डॉक्टर साहेब आता जी तुम्ही प्रत्येक रोडची माहिती दिली . गल्ली सुध्दा असतात रोड म्हणजे. परंतु प्रायव्हेटीवर जे मुख्य रस्ते आहेत हया रस्त्यांकरीता तुम्ही काय योजना आखली आहे. आणि आता जे मुख्य रस्ते आहेत ६० फुटी आहे माझ्या प्रभागात बाजार भरतो. संबंध बाजार भरतो त्यामुळे त्या गटाराचा निचरा व्यवस्थित होत नाही. माझा प्रभाग सर्वात मोठा आहे. तर त्या प्रभागामध्ये तुम्ही योजने अंतर्गत किती खर्चाची तुम्ही आम्हाला प्रायव्हेटी दिलेली आहे. आणि तेथे कामगार किती पाठविणार आहात. माझ्या प्रभागातून जे मुख्य गटर जाते ते स्टेशन पासून मिरारोड पर्यंत सलग जाते. आणि त्या रस्त्याला सर्व गटार जोडलेली आहेत. तर मला तुम्ही माझ्या प्रभागाची माहिती दया. २६ क्रमांक प्रभागामध्ये तुम्ही किती कामगार देणार आहात आणि किती खर्च देणार आहात. आणि तुम्ही तो सर्वे केलेला असेल तर सांगा तुम्ही जेव्हा सर्वे केला डॉक्टर तुम्ही आम्हाला नगरसेवकांना विश्वासात घेवून फिरलेले नाहीत. आणि तो विश्वासात न घेतल्याने तुम्हाला भाईंदरची जाणीव नाही की कोणत्या ठिकाणी पाणी साचतो. कोणत्या ठिकाणी जास्त मच्छर होतात. हे तुम्ही आम्हाला घेवून जर फिरले असते तर आम्ही तुम्हाला व्यवस्थित दाखविल असतं. आणि त्याच्यावर तुम्ही व्यवस्थित प्लानिंग केल असत तर आज हे सोप झाल असत.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम आज या ठिकाणी पान क्रमांक २ वरती प्रत्येक निवडणूक प्रभागाकरिता ४० सफाई कामगारांचा आकडा दिलेला आहे. प्रत्येक प्रभागाकरिता ४० सफाई कामगार पुरविलेले आहेत. आता सन्मा. मिलन पाटील साहेब बोलले की त्यांचा प्रभाग मोठा आहे. त्यांचा प्रभाग किती मोठा आहे ते मलाही माहिती नाही. परंतू माझा ८ क्रमांकाचा प्रभाग नक्कीच मोठा आहे. तर मलादेखील, आज २० हजार लोकसंख्या असलेला ८ क्रमांकाचा हा प्रभाग आहे. आणि तीन नाले मोठे त्या प्रभागातून जातात. आणि आज देखील आमच्याकडे इतरांपेक्षा जर प्रत्येक प्रभागामध्ये जर चाळीस कामगार ठेवले तर आज इथे ६ हजारांचा मतदार संघ आहे , १० हजारांचा, ७ हजारांचा आहे त्याचप्रमाणे जर २० हजाराच्या मतदार संघाला ४० कामगार दिले तर आम्हाला निश्चितपणे तिथे प्रॉब्लेम येईल. प्रभागाप्रमाणे कामगार ठेवलेले आहेत तसे न ठेवता आपण एरियाप्रमाणे जर कामगार ठेवावेत. अगोदरच्या तीन वार्डांचा हा एकच प्रभाग झालेला आहे. आणि हा मोठा प्रभाग आहे त्याठिकाणी आणि तीन नाले या प्रभागातून जातात. ४० कामगार पुरणार नाहीत तरी आयुक्त साहेबांनी कृपया यावर निवेदन करावं.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय..

**दिनेश नलावडे :-**

कृपया आयुक्त साहेबांनी आमच्या प्रश्नाला उत्तर दयाव.

**आयुक्त :-**

हा जो प्रस्ताव तयार केलेला आहे हा तसा शास्त्रशुध्द पध्दतीने तयार केलेला प्रस्ताव आहे. बर्मन कमिटीच्या ज्या शिफारशी आहेत त्यानुसार रस्त्यांच्या किती लांबी रुंदीला किती कामगार लागतील त्याची डिटेल्स आपणाला दिलेल्या आहेत. आणि कमी लोकसंख्या , जास्त लोकसंख्या, मध्यम लोकसंख्या असे वेगवेगळे त्याचे भाग केलेले आहेत. आणि हयानुसार प्रत्येक वार्डाला साधारणतः तो ॲवरेज दिलेला आहे ४० कामगारांचा. याचा अर्थ असा नाही की प्रत्येक वार्डात ४० सच असतील. ज्या वार्डामध्ये विरळ लोकवस्ती असेल जिथे काम कमी असेल , ग्रामीण भाग असेल या ठिकाणी कामगार कमी लागतील. हे कामगार आपल्याला जिथे जास्त लोकसंख्या आहे तेथे फिरवता येतील. ही एक सरासरी आपल्याला अंदाजासाठी व खर्चासाठी दिलेली फिगर आहे. बाकीच्या ज्या डिटेल्स आहेत त्या ॲक्च्युली त्यांच्याकडे खुप डिटेल्स आहेत त्या त्यांनी दिल्या असत्या फार सोप झाल असत ते. हयाच्यामध्ये प्रभाग क्रमांक ५,१६,१७,२१ व २६ अ मध्ये आणि २०,३,व ४ याच्यामध्ये रस्त्याची लांबी सर्वे करुन मोजलेली आहे. मघाशी मिलन पाटील साहेबांनी सांगितले की आम्हाला विश्वासात घेतल नाही तर मोजमाप घ्यायला विश्वासात घ्यायची काही तशी आवश्यकता नाही. फक्त लांबी रुंदी मोजायची होती. ती मोजलेली आहे आणि त्याचा अंदाज हया ठिकाणी दिलेला आहे. त्यानंतर गटारांची लांबी रुंदी मोजलेली आहे. रस्ता आणि गटार हेच आपल्याला साफ करायच असत. वार्ड साफ करायचा म्हणजे लोकसंख्येला साफ करायच नसत. त्यामुळे तिथली लोकसंख्या किती आहे या ऐवजी आपण रस्त्यावरती कचरा किती आहे आणि तो साफ करण्यासाठी आपणाला किती मजूर लावायचे आहेत हे तिथल्या लोकसंख्येच्या गृहतेवरती व तिथल्या रस्त्याच्या व गटाराच्या लांबी रुंदी वरती हे कॅलक्यूलेशन्स केलेले आहेत. तर त्याच्यामध्ये मी एक उदाहरण सांगतो या अ झोनमध्ये ६६ कामगार हे कार्यरत आहेत. या कमिटीच्या शिफारशीनुसार १८० आवश्यक आहेत. परंतु तिथल्या लोकसंख्येची घनता आणि आपल बजेट लक्षात घेवून आपण ११७ कामगार या ठिकाणी निश्चित केले आहेत. आणि कचरा उचलण्यासाठी आवश्यक वाहने ३ डंपर्स अशा प्रकारे हे सर्व स्टेटमेंट केलेल आहे. आणि याची सर्व जी डिटेल्स आहे ती एकूण चार कोटी स्याहत्तर लाख छत्तीस हजार आपल्या बजेटला जी एकूण पाच कोटीची तरतूद आहे या सफाईच्या कामासाठी तर ती तरतूद आपल्याला लक्षात घ्यावी लागणार आहे. अनेकांनी या ठिकाणी मागण्या केल्या की माझ्याकडे खुप मोठा वार्ड आहे, माझ्याकडे लांबी रुंदी खुप आहे, लोकसंख्या जास्त आहे, मला जास्त कामगारांची गरज आहे, जास्त वाहनांची गरज आहे परंतू आपल्याला ही आर्थिक मर्यादा आहेत त्या आर्थिक मर्यादेच भान ठेवून हा प्लान करावा लागलेल्या आहे. आपल्याला अगदी अवाढव्य प्लान करायचा असता तर १० कोटीचा सुध्दा बनवता आला असता १५ कोटीचा ही बनविला असता. पण आवश्यकता ही एक बाब आहे आणि आपल्याकडे उपलब्ध साधन सामग्री हा दुसरा भाग आहे. याचा मेळ घालून याचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रत्येकांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे इतकेच मजूर, इतकीच वाहन मिळतीलच अस नाही परंतु आपला प्रयत्न त्या प्रभागामध्ये कुठल्याही प्रकारे कचरा राहणार नाही किंवा गटारामध्ये कुठे चोकप राहणार नाही. हे पाहण्याचा असेल ही हया प्रस्तावा पाठीमागची भावना आपण सदस्यांनी कृपया लक्षात घ्यावी.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय आमचे आरोगय अधिकारी मा. बावसकर साहेब यांनी उत्तर दयायच आहे. प्रभाग क्रमांक २२ व २३ साठी आपण किती कर्मचारी नियुक्ती केलेली आहे. कारण एकत्रित आहे म्हणून मी बोलतोय. साहेब एक मिनिट जरा मी माझा प्रश्न त्यांना समजावून सांगतोय.

**आयुक्त :-**

नोंद करुन घ्या आपल्याकडे किती वाहन..

**रतन पाटील :-**

फक्त किती आहेत ती संख्या सांगा मला. तर आपण प्रत्यक्षात हा जो आराखडा केलेला आहे तो आपण प्रत्येक वार्डामध्ये फिरुन केलेला आहे का की आपल्या कार्यालयमामध्ये बसून केलेला आहे.

**डॉ. बावसकर :-**

मा. महापौर महोदया हा प्रस्ताव तयार करताना एक मुख्य उद्येश डोळयांसमोर आहे किंवा या प्रस्तावाचा उद्येश असा आहे की या ठिकाणी आपण या प्रस्तावामध्ये महानगरपालिकेचे जे जे प्रभाग समाविष्ट केलेले आहेत आणि जे झोन तयार केलेले आहेत या झोनमधीन संपूर्ण रस्ते, मुख्य

रस्ते, आंतील रस्ते, गल्लीमधील रस्ते, गटारे या सर्वाचा पूर्णपणे साफसफाई आपण विचारात घेतलेली आहे. आणि कामगार विचारात फक्त एवढयासाठीच घेतलेले आहेत की अंदाजित रक्कम काढण्यासाठी कामगारांचा विचार आपण केलेला आहे. परंतू ठेकेदाराने ही संपूर्ण साफसफाई त्यांनी करायची आहे. किमान कामगार आपण विचारात घेतलेले आहेत. त्या विभागामध्ये साफसफाईसाठी लागणारे आणि कामगार किंवा हा खर्च विचारात घेतान सुप्रिम कोर्टाने जी कमिटी या घनकचरा व्यवस्थापनासाठी किंवा जे नियम बनविण्यासाठी तयार केलेली होती. हया कमिटीचे अध्यक्ष होते कलकत्ता म्युनिसिपल कार्पोरेशनचे कमिशनर बर्मन, या बर्मन कमिटीने शिफारशी दिलेल्या आहेत आणि त्या अमलात आणण्यास सांगितलेल्या आहेत केंद्रशासनाने त्याचे निकष या ठिकाणी लावून हा प्रस्ताव आपण तयार केलेला आहे. या ठिकाणी कामगार कमी किंवा जास्त हा निकष नसुन प्रभागातील संपूर्ण साफसफाई आणि ठेकेदाराने ज्या दिवशी साफसफाई केली नसेल तर त्यासाठी दंडाची रक्कम याच्यात समाविष्ट केलेली आहे. दंड आपण त्या ठिकाणी आकारणार आहोत. कुठल्याही परिस्थितीमध्ये प्रत्येक प्रभागामध्ये साफसफाई व्यवस्थित करणे ठेकेदाराचे काम राहील. एका झोनसाठी फक्त एकच ठेकेदार नेमला जाईल एका ठेकेदाराला दोन प्रभाग दिले जाणार नाहीत कारण त्या ठिकाणी त्याचे कॉन्सनट्रेशन होणार नाही. आणि याच संपूर्ण सुपरविझन सुध्दा त्यांनी ठेवायच आहे. गाडयासुध्दा त्यांनीच पुरवायच्या आहेत. आपली सद्या १० वाहन आहेत डंपर्स आहेत त्यांना काम मिळाव किंवा त्यांचा उपयोग सद्याच्या यांच्यामध्ये यायला पाहीजे म्हणून त्याची सुध्दा किंमत आपण याच्यामध्ये समाविष्ट केलेली आहे. निविदा सद्या आपण गाडया पुरविण्यासाठी मागविलेली आहे निविदेची जी किंमत गाडीसाठी आलेली आहे त्या निविदेच्या किमतीने दररोज आपण त्या गाडया पुरविणार आहोत त्याची किंमत आपण वसुल करणार आहोत. आणि त्याचा खर्च वर्षाला जवळ जवळ या संपूर्ण गाडया चालू राहिल्या तर ५३ लाख रुपये येणार आहेत. परंतु कुठल्याही परिस्थितीमध्ये संपूर्ण रस्ते मग ते आतले असोत, मुख्य असोत , संपूर्ण गटारे याची साफसफाई ठेकेदाराने करायची आहे आणि याच सुपरविझन सुध्दा त्यांनीच करायच आहे. आपल्या स्वच्छता निरिक्षकाना प्रत्येक झोननुसार याची पहाणी करुन दररोज अहवाल दयायचा आहे. आपली त्या दिवशी भेट घ्यायची आहे. त्या कार्यकर्त्याची भेट घ्यायची आहे. जर काम समाधानकारक नसेल तर दंडाची कारवाई आपण प्रभावीपणे यामध्ये आणू. आणि आपल्या सर्वाच्या मार्गदर्शनानुसार हा प्रस्ताव आपण चांगल्या प्रकारे अंमल बजावणी करु या आपल पूर्ण सहकार्य मला हव आहे. आणि यामध्ये आपण नक्कीच यशस्वी होऊ.

**रतन पाटील :-**

आपण जे झोन साफसफाईच्या संदर्भात पाडलेले आहेत. आपण चांगला उपक्रम केलेला आहे. त्याच स्वागत करतो. माझ्या म्हणण्याचा अर्थ तसा नाही आहे. आपण माझ्या प्रभागात आला आहात का ?कारण माझ्या प्रभागामध्ये गटारावर काही असे स्लॅब आहेत आणि त्यावर ज्या जाळया बसविलेल्या आहेत साफ करण्यासाठी तर त्याचे अंतर आहे ३० फूट. तर ३० फूटावरुन ती गटारे साफ केली जातील का ? एवढच मला आपणांला सांगायच आहे.

**डॉ. बावसकर :-**

मा. महापौर महोदया महानगरपालिका क्षेत्रातील बऱ्याचशा प्रभागांची मी पाहणी केलेली आहे आणि प्रत्यक्ष संबंधित सदस्यां बरोबर चर्चा केलेली आहे. आपण सांगितलेल्या अडचणी आहेत.

**रतन पाटील :-**

आमची सुचना लक्षात घ्यावी व त्याच्यावर तशी कारवाई करावी. एक प्रश्न राहीलेला आहे आपल्या आस्थापनेवर असलेले एकूण सफाई कामगार किती? ८१४ की ८१९ आस्थापनेवर किती कर्मवचारी आहेत.

**रोहित सुवर्णा :-**

आमच्या माहितीप्रमाणे ८१९ आहेत. पण या ठिकाणी ८१४ दाखविण्यांत आलेल आहे. पाच कामगार लापता.

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये साफसफाईच्या बाबतीत नेहमी गदारोळ होत असतो. आणि त्याकरिता नालेसफाई असूदे किंवा वार्ड सफाई असूदे दर वेळेला या मोसममध्ये सभागृहामध्ये तक्रारी सूचना येत असतात. याकरिता महापालिका झाल्यानंतर असा एक धोरणात्मक निर्णय घेण्यात आला की टेंडर पध्दतीने लेबर मागवायचे आणि किती कामावर येतात व किती कामावर येत नाही आहेत ,फक्त हजेरी लावली जाते. साफसफाई होते की नाहि होत,औषध फवारणी होते की नाही होत

अशाप्रकारे गदारोळ नेहमी चालतो. आणि या शहरामध्ये मोठे नाले आहेत ते साफ होत नाहीत. अशा करिता डॉ. बावसकर ज्यावेळी येथे आले त्या अगोदर आम्ही या ठिकाणी साफसफाईच एक धोरण निश्चित केल की वेगळया पध्दतीने आपण या शहरामध्ये साफसफाई केली पाहिजे. जेणेकरुन हा ताण संपूर्ण शहरावरती पडता कामा नये. या करिता वेगवेगळे झोन तयार करण्यात आले. आणि प्रत्येक झोनमध्ये बर्मन कमिटीचा आधार घेवून किती लेबर लागेल अशा प्रकारे त्याचा अंदाज घेण्यात आला. आणि त्याठिकाणी असलेले मोठे नाले, त्या ठिकाणी असलेली छोटी गटारे , त्या ठिकाणी निघणारा कचरा आणि त्या ठिकाणी असलेले रस्ते हे साफसफाई करण्याकरीता लागणारी मॅन पॉवर याचा एक अंदाज घेण्यात आला. आणि त्यासाठी लागणार संपूर्ण साहित्य आणि गाडीतून तो कचरा वाहून डंपिंग ग्राऊंडपर्यंत पोहचविण्यापर्यंत अशा पध्दतीचा संपूर्णपणे आपल्या अधिकाऱ्यांनी तो सर्वे केला आणि त्या सर्वेअंती किती रस्ते आहेत, किती गटारे आहेत, किती घनकचरा उचलावा लागेल अशा पध्दतीचा अभ्यास केला. आणि तो अभ्यास केल्यानंतर आपण ही वेगळी पध्दत हया शहरामध्ये आणलेली आहे यावेळेला. कारण प्रत्येक वेळेला लेबर आपण लावतो, ठेक्याने माणसं आपण लावतो परंतु ती माणसे कामावर येतात की येत नाही, हजेरी घेतली जाते की नाही घेतली जात कारण सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी मगाशी प्रश्न उपस्थित केला त्याचे कारण एक नक्की आहे की माणसं कामावर येतात परंतु हजेरी भरली जाते पण काम केल जात नाही. अशा पध्दतीच कित्येक वर्ष अस येथे होत आहे. या करीता संपूर्ण शहराचा सर्वे केला गेला आणि या ठिकाणी आपण वेगवेगळे झोन निर्माण केले. आणि या झोन नुसार ठेकेदार नेमण्यात आला व त्या ठेकेदाराकडून योग्य साफसफाई झाली नाही आणि साफ करण्यात आल नाही व्यवस्थित आणि तसच समाधान नागरीकांना तसेच त्यांच्यावतीने त्यांचे प्रतिनिधी आहेत नगरसेवक यांना जर नाही मिळाले तर त्याचा ठेका रद्य का करु नये ? आणि संपूर्णपणे ठेकेदारावर त्या ठिकाणी त्या नगरसेवकाचा कंट्रोल त्यावर राहील. अशा पध्दत आपण अवलंबिली आहे. या करीता या पध्दतीमध्ये संपूर्णपणे या ठिकाणचे नगरसेवक आहेत त्यांचे सहकार्य त्यांचा सहभाग या योजनेला लागणार आहे. आणि त्यांनी व्यवस्थितपणे या ठिकाणी लक्ष दिल तर मला वाटतेय की आपण जे धोरण अवलंबिले आहे यामध्ये नक्कीच आपले शहराची साफसफाई होवून जाईल. आणि त्या ठेकेदारावर आपले संपूर्ण कंट्रोल राहील. एकाच ठेकेदाराला संपूर्ण लेबर दयायचे ते लेबर किती पुरविले ते बघितले जात नाही, त्यांनी साहित्य आणल की नाही आणल हे बघितले जात नाही. आणि या ठिकाणी आपण संपूर्णपणे ठेकेदार साहित्य आणेल, ठेकेदार गाडया पुरवतील , माणसं पुरवतील आणि जी औषध फवारणी आपणाला मच्छरांसाठी करायची आहे ती औषध फवारणी आस्थापनेवर असलेले कर्मचारी ती फवारणी करतील अशा पध्दतीने हे काम दोन गटामध्ये होणार आहे. या करिता या योजनेसाठी संपूर्णपणे नगरसेवकांचे सहकार्य लागणार आहे आणि नगरसेवक सहकार्य करतील अशी मी अपेक्षा या ठिकाणी करीत आहे. आणि धोरण जे आपण अवलंबिलेले आहे यामध्ये डॉ. बावसकर यांनी खरोखरच चांगले प्रयत्न केलेले आहेत. एवढच सांगेन सभागृहाला की नव्याने जे धोरण आपण अवलंबिलेले आहे त्यामध्ये चांगल्या पध्दतीने लक्ष दयाव व ही पध्दत आपण चांगल्या पध्दतीने अवलंबीली तर या शहरामध्ये साफसफाई चांगल्या पध्दतीने होईल असे मला या सभागृहाला सांगायच आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय दोन शब्द मला बोलायचे आहेत. फवारणी होत नाही असे मी बोलणार नाही फवारणी होते आणि मी स्वतः त्या फवारणी करणाऱ्या सोबत फिरत असतो. पण फवारणी करताना त्यामध्ये जे औषध टाकलेले असते त्याचे प्रमाण बरोबर नसते असं माझ ठाम मत आहे. फवारणी होत असून मच्छर मरत नाही, मच्छरांवर त्याचा परिणाम होत नाही. तरी सुध्दा ते औषध जे टाकतात त्याच्यावर आपली पाहणी पाहिजे. आणि त्यांना त्याचे ट्रेनिंग दिले पाहिजे. त्या पध्दतीने ती फवारणी झाली तर मच्छर मरतील. फवारणी होते फवारणी होत नाही याच्याशी मी सहमत नाही. माझ्या वार्डापुरते जर बोललो तर, मी जे फवारणी करत असतात त्यांच्या जोडीने फिरत असतो. दुसरी एक गोष्ट अशी आहे की आता आपण प्रत्येक गटारावर, नाल्यावर जाळी टाकायला सांगितले आहे. एकतर अगोदरच गटाराची साफसफाई करायला मिळत नाही. पर्यायी झालेले मच्छर संध्याकाळच्या वेळेला त्यांचा परिणाम जास्त दिसून येतोय. आपली गटाराच्याखाली फवारणी झालेली आहे तर ती उघडयावर फवारणी झाली पाहिजे. मच्छर दिवसा त्या गटाराच्या झाकणाखाली जाऊन लपलेले असते आणि संध्याकाळी ते बाहेर निघते आपली फवारणी सकाळच्या वेळेला होते संध्याकाळच्या वेळेला होत नाही त्यामुळे मच्छरांवर त्याचा परिणाम होत नाही आणि ते

मच्छर मारण्यासाठी आपल्याला गटाराच्या खाली फवारणी झाली पाहीजे. आणि ती दिवसा गटाराच्या खाली झाली पाहीजे. आणि तशी जर रात्री करायची असेल तर उघडयावर रात्री झाली पाहिजे तरच मच्छर मरेल व मच्छरांचा त्रास कमी होईल अशी मी सुचना करीत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम परवानगीने बोलतोय हे जे आपण झोन पाडलेले आहेत बावस्कर साहेबांनी ५,१६,१७,२१,२६ भाईंदर वेस्ट पण माझ्या मताने रोडच्या एका बाजुचे एका झोनमध्ये आले असते आणि रोडच्या दुसऱ्या बाजुचे दुसऱ्या झोनमध्ये झाले असते तर बरे झाले असते. १७ वार्ड जो आहे तो रोडच्या दुसऱ्या बाजुला आहे ते एका झोनमधून काढुन दुसऱ्या झोनमध्ये टाकले पाहिजे असे माझे मत आहे. दुसरी गोष्ट ठेकेदार सर्व सामान पुरवणार आहे. म्हणजे सर्व सामान म्हणजे काय ते आपण लिहिलेले नाही याच्यात मी सर्व विचारतो नंतर तुम्ही मला सांगा कोणकोणते सामान ते देणार आहेत आता आपण जे ठेक्याचे मजूर घेतो ते पण सामान पुरवतात असे सांगतात पण ते सामान देत नाहीत आणि साफसफाई बरोबर होत नाही. हे तुम्ही सुद्धा कबुल केलेले आहे स्थायी समिती मध्ये आपण लिहिलेले आहे वाहनाची भाडयापोटी रक्कम रू. ५२,३८,००० आपल्याला परत मिळणार आहे. आपल्या वाहनांच्या भाडयापोटी म्हणजे आपण त्याचे डिझेल त्याचे ड्रायव्हर ते कोण देणार आहेत. तो खर्च आपल्याला होणार आहे का कि सर्व खर्च त्यांचा आपण फक्त वाहन देणार आहोत त्याचा यामध्ये खुलासा नाही तो खुलासा झाला पाहिजे याचे मला उत्तर द्यावे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते प्रभाग क्र. २५ यामध्ये झोन ९ आणि २५ दिलेला आहे. २५ मध्ये एवढी गटारे गल्लोगल्ली आहेत. इंडस्ट्रीयल एरिया सुद्धा आहे. त्या ठिकाणी वेळेवर साफसफाई होत नाही. एवढा मोठा प्रभाग बी.पी. रोड पासून ते बेवरली पार्क पर्यंत प्रभाग आपला आहे. आणि त्या प्रभागामध्ये आपले काही कर्मचारी जाऊ शकत नाहीत कारण हा प्रभागच मोठा आहे. शक्यतो करून या प्रभागामध्ये कर्मचारी वेळेवर पोहचायला पाहिजे, साफसफाई वेळेवर व्हायला पाहिजे अशी मी आशा बाळगतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम आता जो अहवाल दिलेला आहे. बावीसकर साहेबांनी ही एक नक्की बाब आहे. जे अधिकारी वर्ग आहेत त्या खुर्चीवर बसून फक्त हा रिपोर्ट तो रिपोर्ट त्या रिपोर्टच्या आधारावर तयार करून दिलेला आहे. त्यांनी स्वतःही प्रत्यक्ष वार्डामध्ये फिरले असते तर आज एवढे प्रश्न उपस्थित झाले नसते. प्रभाग क्र. ४ मध्ये एवढी मोठी झोपडपट्टी आहे. आणि बाजूच्या ५ नंबर वार्डामध्ये झोपडपट्टी नाही दोघांचा जर अंदाज घेतला असता तर जे साफसफाईचे प्रमाण कुठे जास्त आहे. गटार कुठे आहे. झोपडपट्टी कुठे आहे. हे कुठे काय बघितले गेले नाही हे नक्की आहे. फक्त पुस्तके उघडली हा रिपोर्ट तो रिपोर्ट आणि सभागृहाला सादर म्हणजे ह्या पद्धतीमुळे महापालिकेच्या पैशाचा अपव्यय होतोय. महापौर मॅडम साहेब मी नगरपालिकेच्या वेळी निर्दशनास आणून दिलेले होते. ठेकेदारांनी झाडू पुरवली नाही. महापालिकेच्या भाडांरामध्ये एकही झाडू नव्हती कामगार बसुन होते ही बातमी मी वर्तमानपत्रामध्ये छापुन आणली होती कि मिरा भाईंदर महानगरपालिकेमे भांडारमे झाडू नही ती सत्य गोष्ट निघाली. ठेकेदार सर्व साहित्य देत नाही आज प्रभागामध्ये चला चार चाकाची गाडी आहे. त्यात दोन चाके आहेत दोन चाके नाही कशी ती चालवतात कामगार हे जर आपण प्रायव्हेटला दिले तर सर्वांची मनस्थिती आहे. कि काम चांगले झाले पाहिजे काम शहराचे आरोग्याच्या दृष्टीने चांगले झाले पाहिजे. पण ठेकेदारावर अंकुश नसतो जेवढे कामगार पाहिजे तेवढे कामगार येत नाहीत आमच्या प्रभागाच्या मजूराची हजेरी घेतली जाते भाईंदरच्या टाकीवर. टाकी आणि प्रभाग क्र. ५ मध्ये दीड किलोमिटरचे अंतर आहे. फक्त हजेरी दयायला ठेकेदार त्यांना तिकडे बोलतोय हे काय चालले आहे. म्हणजे दीड तास त्या कामगाराला तिकडे येण्याजोण्यासाठी लागतो म्हणून हे जे तुम्ही प्लान केलेले आहे बावीसकर साहेब माझे असे मत आहे सभागृहाने मंजूरी दिली तरीही तुम्ही प्रत्यक्ष सर्व वार्डामध्ये फिरून आवश्यकतेनुसार तुम्ही त्यापद्धतीने परत अहवाल तयार करा ह्याच्यात काही दुरूस्ती करणे आवश्यक आहे. काही ठिकाणी झोपडपट्टी आहे काही ठिकाणी झोपडपट्टी नाहीत. हे सर्व दुरूस्ती करून आणि व्यवस्थित करा.

**कैलासबेन जानी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने मी बोलते की ठेके पद्धतीने द्यायला सर्व लोक, सर्व नगरसेवक उत्सुक आहेत पण माझी अशी सुचना आहे. हा अनुभव मला आलेला आहे. की मुकादम जो असतो तो आपल्या महानगरपालिकेचा असतो आणि तुम्ही सांगता चाळीस माणसे एकावार्डा मध्ये ठेवलेली

आहेत. तीन प्रभागामध्ये एकत्र होऊन चाळीस माणसे ठेवलेली आहेत त्या जागेवर चार माणसे पण नसतात. म्हणून तुम्ही त्यांच्यावर लक्ष द्यायला पाहिजे कि चार माणसे आहेत, चाळीस माणसे आहेत की बावीस माणसे आहेत आणि असा अनुभव झालेला आहे. पहिला पण आपण ठेकापद्धतीने देत होतो. तरी सुद्धा अशी कंप्लेट केली की मुकादम सांगतात आमच्या साहेबांना सांगा आम्हाला माणसे जास्त दिली तर सफाई घेईल असे व्हायला नाही पाहिजे अशी माझी सुचना आहे. हे लक्षात घ्या.

**उपमहापौर :-**

विषय क्र. ३ वरती सर्व सभासदांनी आपली मते मांडलेली आहेत. टिपण्णी ही आपल्याकडे आहे. या विषयावर भरपूर चर्चा झाली खरोखर आपण सर्व सभागृहानी आयुक्त साहेबांचे आणि डॉ. बावीस्करांचे अभिनंदन करायला पाहिजे. मी आपणाला सर्वांना कल्पना देऊ इच्छितो की पद्धतीची टिपणी आपल्या समोर आलेली आहे त्यामध्ये कंप्यारीटीवली स्टेटमेंट दिलेले आहे की वार्षिक खर्च सफाई कामगारांच्या मागे आणि आस्थापनेवर जो खर्च होते तो किती होतो आणि हे सर्व केल्यानंतर सुद्धा पाहिजे तसा रिझल्ट आपल्याला भेटत नाही आणि म्हणून एक अल्टरनेटीव ॲरेजमेंट वेगळया पद्धतीच्या कामकाजाला सुरूवात करायची या दृष्टीकोनातून ही टिपणी मला असे वाटते डॉ. बावीसकर आपण सादर केलेली आहे सभागृहासमोर. आणि ज्या दिवसा पासून डॉ. बावीस्कर जॉईट झालेले आहेत. त्यांनी वेळोवेळी सन्मा. महापौर, आयुक्त, माझ्याशी, सभागृह नेते आणि बाकीच्या लोकांशी आणि सदस्यांशी सुद्धा चर्चा केलेली आहे. संपुर्ण प्रभागाची आणि मिरा भाईंदर शहराची पाहणी सुद्धा केलेली आहे. आणि ते सर्व केल्यानंतर हा प्रस्ताव सभागृहाच्या समोर आलेला आहे. आतापर्यंत आपल्याला एवढी माहिती होती की सफाई ही ठेकापद्धतीने केली जाते पण मी या सभागृहाला माहिती देवु इच्छितो जी माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. की सफाई ठेकेदारांना फक्त माणसे पुरवण्याचा ठेका होता. आणि त्यांच्याकडुन काम करून घेण्याची जबाबदारी ही नगरपालिकेची होती महानगरपालिकेची होती. पण आता ज्या पद्धतीचा प्रस्ताव सभागृहाच्या समोर आलेला आहे. त्याच्या मध्ये संपुर्णतः त्याला झाडू, लागणारी सामग्री हे सगळे त्या कॉन्ट्रक्टरला द्यावे लागणार आणि हे सगळे त्यांनी दिल्यानंतर पगार सुद्धा त्यांनी द्यायचे आहेत. या सगळयाच्या कंप्यारिझनचे स्टेटमेंट आपण बघितले तर तो इक्वल आहे. म्हणजे आतापर्यंत आपण माणसे घेत होतो आणि तेवढे पैसे खर्च करीत होतो. पण आता त्याची माणसे नाहीत तर त्यांचे सुपरविझन, त्याचे मुकादम, त्यांना लागणारी प्रत्येक सामग्री तो कॉन्ट्राक्टर देणार आहे. आणि माझ्या माहिती प्रमाणे जी माहिती माझ्याकडे आहे. साधारणतः १०५ रू. प्रतीपर लेबर हे आपण देत होतो. माझी कुठे चुक होत असेल तर आपण ती करेक्ट करावे पण आता मला वाटते ऑन ॲण्ड एवरेज ८५ रूपया मध्ये लेबर आणि त्याच्या सोबत त्याचे मुकादम त्याचे सुपरविझन त्याला लागणारी संपुर्ण सामग्री हे त्या कॉन्ट्रक्टरची असणार आहे याचा अर्थ असा कि संपुर्ण काम करून घेण्याची जबाबदारी त्या कॉन्ट्रक्टरची असणार आहे असा प्रकारचा प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे. आणि माझे असे मत आहे की सभागृहाने या संपूर्ण टिपणीवर त्यांनी व्यवस्थित आणखी नजर घातली पाहिजे आणि या व्यतिरीक्त ज्या टिपणी मध्ये उल्लेख आह. आणखीन काही प्रश्न लोकासमोर असतील ते प्रश्न त्यांनी मांडावेत आयक्त साहेबाकडे वेगळया पद्धतीने मांडावेत म्हणजे या सभेच्या नंतर माडावेत हे सद्धा हे आयुक्त साहेब आणि डॉ. बावीसकर मा. महापौर ते विचारात घेतील आणि तुमच्या ज्या सुचना आहेत त्या निश्चितपणे अंमलबजावणी करून त्यांना समाविष्ट करून घेतील मिलन म्हात्रेंचा वेगळा काही प्रश्न असेल तर ते बोलू शकतात.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. महापौर मॅडम, आपल्या महानगरपालिकेमध्ये गेल्या अनेक वर्षापासून ठेका पद्धतीने जे कर्मचारी घेतो त्याचा जो निघणारा पगार आहे, त्याचा निकष म्हणजे, पगार आपण कुठल्या परिस्थितीने देतो माझा अनुभव फार निराळा आहे. मघापासून या महत्वाच्या विषयावर काही बऱ्याच सन्मा. नगरसेवकांनी याच्यावर भाषण केलेले आहे. परंतू आता गेल्या दोन महिन्यापुर्वी आम्हाला तिनशे माणसे मिळाली प्रत्यक्षात आपल्या स्वतःच्या वार्डात आणि माझ्या वार्डात सुद्धा जी माणसे नेमून दिली त्याच्यात सात सात आठ आठ दहादहा पंधरा पंधरा माणसे एका दिवशी गैरहजर असतात. आपल्या नगरपालिकेच्या मस्टर वरती तिनशे माणसे आपण वाढवून दिली सभागृहात सुद्धा सांगण्यात आले की अमुक अमुक एवढी. स्टँडींग कमिटीला आमच्या सभापतींनी सांगितले एवढी माणसे आम्ही वाढवून देताये. परंतु प्रत्येक्षात कामावरती जी माणसे येतात ती पन्नास ते साठ माणसे दररोज गैरहजर असतात. या गैरहजर असलेल्या माणसांच्या पगाराचा आपण हिशोब घेतला का?

कारण हजेरी वरती माझ्या प्रभागामध्ये मी एक सिस्टिम ठेवलेली आहे. रजिस्टरवर हजर म्हणजे रेग्युलर माणसे किती, वाढीव माणसे जी दिली आहेत ती किती आणि वाढीव माणसे गैरहजर किती रेग्युलर गैरहजर किती त्याची नोंद मी माझ्या मस्टरवर मी घेतो. त्या मस्टरवर सुदैवाने म्हणा, दुर्देवाने म्हणा आपल्या नगरपालिकेच्या एकही एसआयची सही नाही आजपर्यंत. ही फार निगलजंन्सी आहे. आणि तो जो पन्नास साठ माणसांचा पगार आहे. महानगरपालिकेला पर डे वीस पंचवीस ते तीस हजारपेक्षा जास्त आपल्याला नुकसान दररोज सहन करावे लागते. प्रश्न पैशाचा पण नाही. रिक्वॉयरमेंटचा पण विचार करा माझ्या वार्डामध्ये भरपुर गटारे, मोठे नाले, सगळे काही आहे परंतू आम्ही मागतो तेवढे कर्मचारी पण आम्हाला मिळत नाहीत आणि दिले असे रेकॉर्डवर दाखवतात आणि गैर हजर असतात त्याची पुर्तता नाही मागे स्टँडींगला जेव्हा विषय आला तेव्हा मी सांगितले ह्याच्या मध्ये स्टॅंडबाय कामगार आपल्याला पन्नास असे ॲडव्हान्स मध्ये ठेवावे. कि जेणे करून तुमच्या वार्डमध्ये आजच्या तारखेला सहा माणसे कमी आली तर किमान पाच माणसे आपण पाठवू शकतो त्याची कमतरता ती माणसे पुरी करू शकतात. आज या ठरावामध्ये आमच्या प्रभाग क्र. २०, ३ आणि ४ यामध्ये जी रक्कम दाखवलेली आहे. ही सुद्धा आमचे सर्व नगरसेवक बहुतेक समर्थन देतील. प्रभाग फार मोठा आहे भाईंदर पश्चिमेपासून ते सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत हे तीन प्रभाग येतात मुर्धा खाडीपर्यंत ही रक्कम सन्म. सभागृहाने वाढवून द्यावी आम्ही सन्मा. नगरसेवकांना जेणे करून आम्हाला साफसफाई करीता काही कमतरता राहणार नाही. आर्थिक तुट आम्हाला पडणार नाही असे मला वाटते आणि आमच्या विभागातील सफाई कामगारांची जी हजेरी आहे ती झोन क्र. २ बलभद्र ऑफीसच्या समोर आम्ही कार्यालय बनविले आहे त्या कार्यालयामध्ये त्यांची हजेरी घ्यावी कारण ही हजेरी तीन वेळा होते. सकाळी एकदा होते. एकदा दुपारी जेवणा नंतर आणि तीन वाजता कामगार सुटल्यानंतर होते आणि सगळयात भयानक गाष्ट अशी आहे भाईंदर स्मशानभुमीमध्ये जे आपले अग्नि देण्याचे काम करणारे जे डोम लोक आहेत त्यांना तिकडे हजेरी करीता बोलावले जाते. आणि त्यांची हजेरी जो पर्यंत होत नाही तो पर्यंत मृताला अग्नी देण्याचे काम होत नाही ही परीस्थिती जरा गांभीर्याने लक्षात घ्या. स्मशान भुमीतील जे कर्मचारी आहेत. त्यांना या मध्ये सुट द्यावी एकतर त्यांची सकाळी हजेरी घ्यावी किंवा ३ वाजता घ्यावी मध्ये अनेक वेळेला डेड बॉडी ठेवून ते हजेरीला गेलेले आहेत. ह्या बाबतीत आपण गांर्भीर्याने विचार करावा अशी नम्र विनंती.

**उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी जी सुचना मांडलेली आहे. आयुक्त साहेब ती अतिशय महत्वाची आहे. कारण महानगरपालिकेच्या निवडणूकी नंतर ज्या दिवसा पासून सभागृह अस्तिवात आलेला आहे. तेव्हा पासून प्रत्येक सभासदाने या विषयावरती आपआपली भूमीका मांडली आपले ऑब्जर्वेशन मांडले आणि ते सत्यता आहे. की अर्ध्यापेक्षा जास्त लोक सुट्टीवर असतात किंवा गैरहजर असतात आणि म्हणून आम्ही त्यावेळेच्या आयुक्तांना ही सुचना केली होती की, त्यासर्व कर्मचाऱ्यांना आपण आय कार्डस कम्पलसरी करावे कदाचित आपल्या आयकार्डचे जे काम आहे ते पुर्ण व्हायला आलेले आहे. आता ज्यावेळी आपण हे संपूर्ण साफसफाई आणि आरोग्याचे काम ठेका पद्धतीने देणार आहोत तर त्यांना ज्या ठिकाणी आपण लावणार त्यावेळी मिलन म्हात्रे आणि अन्य सदस्यांनी मांडलेली सुचना ही अंमलात आणली पाहिजे आणि त्या मुकादम आणि एस.आय.ची सिगनेचर झाली पाहिजे कारण धिस इज ए फॅक्ट. शंभर टक्के ही गोष्ट खरी आहे. कारण खोट मस्टर तयार केला जातो. बोगस मस्टर तयार केला जातो. धिस इज ए फॅक्ट इट हॅज बीन फॉंड, माणसे गैरहजर असतात त्याची चुकीची हजेरी भरली जाते हे फॅक्ट. आम्ही नाईक साहेबांच्या निदर्शनास पुराव्यासहित आणलेले आहे. ही गोष्ट थांबली पाहिजे. काय आपले कर्मचारी आहेत त्यांना आय कार्डस लवकरात लवकर देण्याचा प्रबंध केला पाहिजे आणि सॅनिटरी इंन्स्पेक्टर नी देखील यांची दखल घेतली पाहिजे. त्या मस्टरवर त्यांनी सही करायला पाहिजे. कारण त्याठिकाणी मस्टर वेगळा असतो आणि पगारासाठी जो मस्टर येतो तो. एकदम तयार नविन मस्टर असतो. आपण जर तो मस्टर बघितला आयुक्त साहेब तर वार्डचे जे कार्यालय आहे. त्याठिकाणी तीस दिवस एखाद्या पानाला जर तुम्ही पुढे मागे केले तर त्याची परिस्थिती काय होईल आणि तुमच्या कडे जे पगारासाठी मस्टर येतात ते एकदम बॅन्ड न्यू फ्रेश असते. ह्याच्यावरूनच दिसून येते की मस्टर खोटं आहे. हा फार मोठा रॅकेट आहे. असंही सांगायला माझी हरकत नाही. याला तुम्ही कुठेतरी आळा घातला पाहिजे. आणि त्याच्यावरती कारवाई झाली पाहिजे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. उपमहापौर यांनी मांडलेल्या विषयावर माझे अनुमोदन आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

उपमहापौर महोदयने कहा वो सही बात है. आप के निर्देशन में एक बात लाता हूँ. ये जो मिनीट्स बनाते है. हमारे अधिकारी लोगो की चुक है. नंबर दोन अभी दी कगी बात है. मयत झालेले कर्मचारी २८ एकुण संख्या ३५९ टोटल संख्या कामगार काम कितने कर रहे है. ८१४ कितनी चुक कितनी कितनी मिस्टेक करते है. ठिक है एक डॉक्टर के आने से कुछ सुधरेगा, कुछ नया ये टाईप बना है. लेकीन अभी आपने जो बात कही है उसमें कही ना कही असलीयत है. कही ना कही आपको चेक करना अधिकारीयों का जो तरीका है. काम करनेका वह बहुत गलत हौ. जो रजिस्टर आप चेक करते और जो हमलोग देखते है. कुछ और है. यहा पर कुछ और चल रहा है. हमलोग बताया गया ८१४ कर्मचारी जबकी कर्मचारी बताना चाहिए थे ७८६ मयत झालेले कामगार २८ है. उन्हकी भी संख्या आजकी पोजीशन बताती है की किस तरह से मिनीट्स बनता है. हमलोग आधा समय तो इसी की चुक में लेगा देते है. अभी डॉक्टर के यहा मैने बताया पाच नंबर वार्ड घडी घडी एक्कीस नंबर वार्ड कहा चला जाता है. ऐसी गलतीयाँ है यह नही बताते है की आप नही गए थे वार्ड में या वार्ड छोड दिया. लेकिन ऐसी कितनी त्रुटीया है. क्या करते है, अधिकारी बैठकर वहा पर ? यह चीज हमको एक महिने में लाते है तो आपको पंधरा दिन मिलते है. तो आप इसको चेक नही कर सकते है क्या ? ऐसी कितनी है आपके निर्देशन में है की बहूत गलत लोगो को पगार मिलता है और वो जो की कामपे भी नही है.

**आसिफ शेख :-**

सन्मा महापौर साहेब आताच या ठिकाणी आरोग्याच्या विषया संदर्भात सर्वच सदस्यांना सत्ताधारी असो किंवा विरोध पक्षधारी असो सर्वांनीच तीव्र नाराजगी आपआपल्या संभाषणातून व्यक्त केलेली आहे. ह्या ठिकाणी उपमहापौर साहेबांनी देखील अत्यंत तीव्र शब्दात नाराजगी व्यक्त केली आणि त्यांच्याकडे काही पुरावे आहेत असे त्यांनी नमुद केलेले आहे. तर मला वाटतं आयुक्त साहेबांनी अत्यंत कडक कारवाई केली पाहिजे. आता काय ग्रामपंचायत होती तिथे पर्यंत ठिक होते. नगरपालिका झाली तिथे पर्यंत पण ठिक होते. आता नगरपालिकेची महानगरपालिका झालेली आहे. तर आयुक्तांचे आपले अधिकार काय आहे. कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना दाखवून द्या खरच ज्यांना काम करायचं नसेल त्यांना तुम्ही घरी बसवा. असे मागच्या वेळेला पण सांगितले होते. एक दोन लोकांना कारवाई केली आपण तर मला वाटतं संपुर्ण स्टाफ तरी सुधारेल आपण ह्या ठिकाणी आयुक्त महोदय कडक कारवाई करावी संबंधित कर्मचाऱ्यांवर आणि ह्या ठिकाणी जो निधी उपलब्ध करून दिलेला आहे. आमच्या प्रभाग क्र. २०,३ आणि ४ या तिन्ही प्रभागात मोठया प्रमाणावर झोपडपट्टया आहेत आणि आमचा परिसर जो आहे तो संपुर्ण मुर्धा खाडीपर्यंत लागतो तर ह्या ठिकाणी जो निधी आहे. तो निधी कृपया वाढवून देण्यात यावा आणि डॉक्टर साहेबांनी व आयुक्त साहेबांनी मिळून चांगला रिपोर्ट ह्या ठिकाणी सादर केलेला आहे. मी त्यांना अभिनंदन देतो. अभिनंदन ह्यासाठी देतो की येथून पुढे निश्चितपणे आरोग्य विभागात एक आमुलाग्र बदल होईल आणि चांगल्यात चांगली सुविधा मिरा भाईंदरच्या शहरवासीयांना उपलब्ध होईल अशी मी आपणाकडून अपेक्षा व्यक्त करतो. आणि आमच्या प्रभागासाठी जास्तीत जास्त ह्या ठिकाणी निधी उपलब्ध करून द्यावा आणि आपले जे कर्मचारी आता ठेका पद्धतीने वार्ड सफाई करणार आहेत. सर्वच ठेकेदारांना आपण सांगणार आहोत झाडू द्या, सर्व सामग्री दया. व संपूर्ण सफाई करा. तर आपले जे कर्मचारी राहणार आहेत ते कुठं काय काम करणार आहेत त्याची माहिती सभागृहाला देण्यात यावी त्याचा वापर योग्य तऱ्हेने प्रशासनाने करून घ्यावा. धन्यवाद !

**रोहिदास शं. पाटील :-**

मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त मी सभागृहाचे या गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की अत्यंत महत्वाचा विषय सगळे आपआपल्या परीने आपआपले अनुभव आणि आकडयांची मोड जोडमोड सगळं करून दाखवल. तात्पर्य साधारण ह्यातून निघतय की डा. बावसकरांनी जो बनविलेला रिपोर्ट, सभागृहात आणते वेळी चुकभुल द्यावी घ्यावी ह्याच पद्धतीने आणलेला आहे. सभागृह ही त्याच मनस्थितीत आहे की, ती रिझल्ट बघतेय. आता दोन वार्ड मिसींग झाले त्यातले आकडे जुळत नाही. साधारण संभवतः ज्याचा खर्च दाखवलेला आहे. की ग्रामीण भागातला उत्तन सारखा भाग आहे फार मोठी रक्कम दिसतेय इंडस्ट्रीयल भाग आहे. त्याच्यामध्ये फार कमी आणि ज्यठिकाणी खरोखर खर्चाची गरज आहे. त्याठिकाणीची रक्कम खरोखरच कमी दिसतयं असे कुठेतरी ताळमेळ चुकलेला दिसतंय आपण जर अपेक्षा करूया की हे नीटनेटके होईल. मला असं वाटतय की आता सभागृहात बोलतोय आम्ही सन्मानीत नेहमीच व्यासपिठाला सन्मानीत म्हणून समजतो. आणि त्याचे अधिकारही

वेगळे समजतो. आता उपमहापौर मुझफ्फरजी  हसेुन ह्यांनी जे निवेदन केले ते अत्यंत मार्मीक, हुशार  ते हशारच आहेत. त्यामुळे काय त्यांच्या बद्दल बोलायचा प्रश्न येत नाही. त्योच अनुभव अत्यंत मोठे आहेत. त्यामुळे आपल्याला सगळयांना त्यांच्याबद्दल आदर आहे. मला हा प्रश्न ह्या सभगृहाच्या  समोर आणायचं जेव्हा आपण उपमहापौर, जस आता मघाशी सांगितल सन्मानीत नगरसेवकांनी ग्रामपंचायतीची नगरपालिका झाली. नगरपालिकेची निवडणूक झाल्यानंतर जनप्रतिनिधींची नगरपालिका झाली. नगरपालिकेची परत महापालिका झाली. प्रशासकीय महापालिका नंतर जनप्रतिनिधींची  महापालिका आणि आपण उपमहापौर झालात. आता जे निवेदन केले. त्यानंतर मला शंका कुशंका यायला लागली की आपण उपमहापौर ह्या भुमिकेतुन बोलता की नगरसेवक ह्या भूमिकेतून बोलता कारण ज्या व्यासपीठावरून बोलता आमच असे ठाम मत आहे की त्या व्यासपीठाला अधिकार आहेत. आपल्याकडे जर लुपोल चालणारे एवढे रॅकेट काम करतेय तर आपण कुणाला घाबरता. कोण तुम्हाला न्याय देत नाही. जेव्हा तुम्हाला अस वाटतय की न्याय देत नाही तर आम्ही तुमचा पाठीमागे उभे आहोत ना. पण तुम्हाला तुमचेच जर असे मत झाले आहे की आम्हाला न्याय मिळत नाही. सभापती साहेब शांत बसलेले आहेत. कुठेतरी मध्ये उठतील ते. आपल्याला आदर आहे त्यांचा. सभापती आहेत ते. ते पण घाईघाईत कधीतरी एकदम स्तुतीही करतात आणि एकदम नाराजही होतात. आज अजून तरी नाराज झालेले नाहीत. डॉ. बावसकरांवर कधी नाराज होतील. काय सांगता येत नाही. पण प्रश्न असा आहे. की प्रशासनाचा प्रश्न आहे. या सभागृहात तुम्ही जे बोललात ते व्हॅल्युबल आहे. आणि तुम्ही उपमहापौर म्हणून बोललात ज्या गोष्टीची तुम्ही हुकमी बोललेले आहेत की ह्या ह्या ठिकाणी हे हे होतेय त्याठिकाणी आयुक्त साहेब तुमची डूटी आहे ती ह्या सभागृहात तुम्हाला निवेदन करावे लागले की ह्या गोष्टी उपमहापौरांनी लक्षात आणून दिल्यानंतर विदिनवीक आम्ही त्याच्यावर कारवाई करू तर या सभागृहाची इज्जत वाढली असे होईल नाहीतर आमचे पाटील साहेब आहेत हो ला हो म्हणायला.

**उपमहापौर :-**

सन्मा सदस्य रोहिदास पाटील साहेब सात दिवस फार जास्त आहेत. विदीन ट्वेंटीफोर हॉवर्स म्हणा.

**रोहिदास पाटील :-**

होय, आम्ही त्याचे स्वागत करू त्याच्यातुन प्रशासनामध्ये कुठेतरी चाल येईल, रीत येईल, काहीतरी काम होते असे दिसेल, नाहीतर उपमहापौरांनी सांगायचे काहीतरी रॅकेट काम करते. आणि सभागृहाने नुसत्या टाळया  वाजायच्या हे कुठपर्यंत चालवायचे आपण, त्याच्यावर कारवाई होणे आवश्यक आहे. आता ह्या ज्या गोष्टीमध्ये जिथे प्रभागाचे सगळयांचे जे केले सगळयांनी सांगितल्यानंतर आयुक्त साहेबांच्या हा प्रशासकीय ठराव आहे. मा. महापौर आणि उपमहापौरांना आम्ही दोष देत नाही. कारण त्यांनी ते कष्ट घेतलेच नसतील आकडे काय काय मोजायचे आहे ते स्टँडीगचे.

**उपमहापौर :-**

कोणी कष्ट घेतले नसतील.

**रोहिदास पाटील :-**

स्टॅडींगच्या सभापतींनी.

**उपमहापौर :-**

कदाचित आपण व्यवस्थीत वाचले नसतील. कारण ते आकडे आम्हीच लोकांनी तयार केलेले आहेत. आपण असे बोलू शकत नाही.

**रोहिदास पाटील :-**

कोणी केले ?

**उपमहापौर :-**

आम्ही लोकांनीच अंदाज घेऊन तयार केलेले आहे. कष्ट घेतले नसतील हे बोलणे तुमचे अयोग्य आहे.

**रोहिदास पाटील :-**

वाचायचे जाऊ दे वादविवाद नको आपला, आपले सभापती महोदयांनी फार त्याची स्तुती केली त्यांनीही आकडेमोड ती केली असेल पण जुळली नाही. जुळली नाही तर सोडून द्या. ते कधीतरी जुळवून घेतील, पण हे नक्की आहे की ज्या पद्धतीने त्या त्या प्रभागातील कामे व्हायला पाहिजे ह्याच्यात एक खुलासा झाला नाही की ज्यांना आपण ठेके देणार आहोत. महापौरांनी आणि

उपमहापौरांनी निवेदन केले १०५ रू. च्या ठिकाणी ८५ रूपयात हे कामकाज होणार आहे. त्याच्यात तो ठेकेदार काय देणार आहे. काय काय ठेकेदार देणार आहे त्याचा उल्लेख कुठे झाला नाही. साधन सामुग्री काय देणार आहे, त्याच्या ज्या कर्मचाऱ्यांचे पगाराचे त्याच्यावर कंपलसेशन आहे का? आपण ८५ रू. देणार मग तो ३० रू. पगार देणार आहे की ४० रूपये पगार देणार आहे. आधी ही या सभागृहा मध्ये चर्चा आणली होती की १०५ रू. तो एका मजूरा मागे घेतोय तो कर्मचाऱ्यांना फक्त ६० रू. देतोय तेव्हा ती चिंता व्यक्त केली आता तो कीती देणार आहे. आणि त्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची त्या ठेकेदारावर काही कंपलसेशन आहे का? माझ्या प्रभागामध्ये जेसलपार्कमध्ये ठेकेदाराने जेव्हा कामकाज करते वेळी दोन माणसे मेलेलीच बाहेर काढली त्याला कोणीही न्याय देऊ शकले नाही कारण ठेकेदारांची माणसे होती. ठेकेदारावर काय काय पण जेव्हा बातमी येते ती नगर पालिकेचे कर्मचारी गुदमरून मेले अशी बातमी आली होती ते कात्रण माझ्याकडे आहे. त्यामुळे आपण ज्या ज्या ठिकाणी ठेका देतो त्याच्या कोणत्याही ठेक्याच्या अटी आपण सभागृहाला माहिती करून देत नाही ही एक चिंतेची बाब होते. आणि नाही दिले तर फार मोठा फरक नाही. पण जे तुम्ही ॲग्रीमेंट करणार आहात त्यात क्लिअरकट किती अटी तुम्ही घेतलेल्या आहेत. त्याची कोणती वाहने देणार आहेत ते त्याचा कुठे उल्लेख मिळत नाही. जसे आता कोणी मघाशी सांगितले की त्यांच्याकडे साहित्यच नसते, हातमोजा नसतो, पायमोजा नसतो. फावडे, घमेली काही नसते साफसफाई होत नसते. पैसा उगाच जाऊ नये एवढाच बोलण्याचा उद्देश.

**तुळसीदास म्हात्रे :-**

आयुक्त महोदय, आतापर्यंत बऱ्याचश्या सदस्यांनी साफसफाई या विषयावर बरचशी चर्चा केलेली आहे. तरी सुद्धा खर म्हणजे बाबीसकरांनी जी प्रतिमा या ठिकाणी सर्व आकडेवारी आणलेली आहे. आता सभापती सुद्धा बोलले की माझा २३ नं वार्ड आहे कोण बोलते २६ नंबर नंबर वार्ड आहे. पण मी सांगतो मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये सगळेच वार्ड एकत्र आहेत, आता लक्ष्मीबाग सारख्या ठिकाणी कोणी सांगितले नाही म्हणजे तुम्ही साफसफाई करणार नाही का? तिथले नाले साफ करणार नाही का? तिकडे डोंगराचा पाणी उतरतो घरात मध्ये पाणी शिरून त्यांचे नुकसान होते.

**उपमहापौर :-**

म्हात्रे साहेब हा नालेसफाईचा विषय नंतर आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्या विषयाला धरूनच बोलतोय अशा तऱ्हेने आता पर्यंत ग्रामपंचायतीची नगरपालिका झाली, नगरपालिकेची महानगरपालिका झाली तरी सुद्धा जे इतिवृत्त येते आणि जो पत्रव्यवहार येतो. हयाच्यात नेहमीच चुका महानगरपालिका झाली तरी या चुका येत असतील त्याठिकाणी आयुक्त महोदय आले तरी सुद्धा चुका होतात ह्याच्यावर गांभीर्याने लक्ष द्यायला पाहिजे. आकडेवारी सुद्धा चुकीची होते. हे जे कर्मचारी आहेत हे तेच आहेत ज्या गावाच्या बोरी त्या गावाच्या बाभळी आहेत आणि म्हणून या चुका होतात. का? त्याच्यावर गांभिर्याने लक्ष दिले पाहिजे ह्या चुका नेहमी होता कामा नये ह्यापुढे अशा चुका होत असतील खरं म्हणजे सभा त्याग करून सभागृहाच्या बाहेर पडायला पाहिजे. तर हे सुधारेल नाहीतर सुधारू शकत नाही.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब परवानगीने बोलतो मला एक प्रश्न विचारायचा आहे की, आता आपण ही जी पद्धती आणणार आहोत, त्याच्या मध्ये घरचा जो कचरा आहे. जे सोसायटीचे साफ करणारे लोक आणून ठेवतात ड्रम भरून रस्त्यावर, तो सुद्धा उचलण्याची प्रोव्हीजन आहे. सगळे काही चांगले होईल यापुढे अपेक्षा करायला हरकत नाही. आपण की या पद्धतीनुसार शहरामध्ये स्वच्छता आणि आरोग्य चांगले राहील परंतु आज घडीला आज पर्यंत आताच्या क्षणापर्यंत घरातील कचरा, सोसायटीचे कर्मचारी म्हणजे सफाई कामगार आणुन रस्त्यावर ठेवतात आणि नगरपालिकेचे ट्रक येऊन तो कचरा उचलून जातात परंतू ट्रक येईपर्यंत नवघर रोड आणि बी.पी. रोडची काय हालत असते याच्याकडे आपण कधी लक्ष घातले आहे का? आणि रविवारी संपुर्ण हे दोन्ही रस्ते हे कचऱ्याचे साम्राज्य असते कुत्र्यांनी सगळया रस्त्यावर कचरा आणलेला असतो. गल्ली बोळ पुर्ण भरलेली असतात. रविवारसाठी आपण आतापर्यत काय प्रोव्हीजन केलेली आहे आणि याच्यापुढे काय करणार आहात ही पद्धत अंमलात येई पर्यंत त्याच्यावर काय नियोजन असणार आहे काय तुम्ही करणार आहात.

**डॉ. बावसकर :-**

सदरच्या प्रस्तावामध्ये वर्षाचे तिनशे पासष्ठ दिवस आणि आठवडयाचा प्रत्येक दिवस कंन्सिडर केलेला आहे. रविवारी वगैरे सुट्टी नाही यामध्ये रविवारी सुद्धा ठेकेदारांना काम करायचे आहे. दररोज कचरा उचलायचा आहे, दररोज आहे ती साफसफाई करायची आहे. त्याच्या मुळे कुठल्याही सुट्टीचा दिवस यामध्ये राहणार नाही.

**प्रभात पाटील :-**

पण साहेब मी म्हणते की ही पद्धत अंमलात येईपर्यंत मी आजपासूनची सुरूवात म्हणते तुम्हाला येणारा प्रत्येक दिवस आणि येणारा प्रत्येक रविवार हे होईल तेव्हा होईल. पण याच्यापुढे उदयापासून तुमचे याच्यावर काही नियंत्रण, नियोजन राहणार आहे. की नाही. करणे गरजेचे आहे. ही सुद्धा आपलीच डयुटी आहे. हा प्रकार येईल तेव्हा येईल.

**डॉ. बावसकर :-**

रविवारी काम चालू ठेवण्याबाबत संबधीत स्वच्छता निरीक्षकांना मी सुचना देतो.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर परवानगीने बोलु इच्छिते की लोकांचे जे खाजगी प्लॉट आहेत त्याच्यावरती महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी कचरा टाकलेला आहे. तो कचरा उचलण्यासाठी अजुनपर्यंत प्रोवीजन केलेले नाही. त्याचे काय? आणि दुसरी एक सुचना मी करू इच्छितो की आता आपण जी नवीन पद्धती सुरू करणार आहोत. झोनवाईज आपण कॉट्रॅक्टर नेमणार आहोत साफसफाई साठी तर त्या सफाई कॉन्ट्रॅक्टरची आपल्याला प्रत्येक नगरसेवकाला त्या त्या एरियामध्ये वेगवेगळे कॉन्ट्रकर जर नेमणार असाल आणि त्याच्यापाठी जे कर्मचारी त्याच्याकडे असतील तर त्या त्या कर्मचाऱ्यांची आणि कॉन्ट्रक्टरची त्यांची यादी जर प्रत्येक नगरसेवकाकडे दिली तर त्यांचा तालमेल आपसामध्ये व्यवस्थित बसु शकेल आणि आपण जास्तच अपेक्षित साफसफाई करून घेवू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, कॉन्ट्रक्टर पद्धतीने प्रस्तावित गट निहाय प्रभाग साफसफाई करण्याबाबचा एक अभिनव उपक्रम आपल्या आरोग्य विभागामध्ये घेण्यात येणार आहे. आणि त्यासाठी एक डिटेल टिपणी सुद्धा दिलेली आहे तसेच आयुक्त साहेब, डॉक्टर साहेब आणि उपमहापौरांनी चांगले मार्गदर्शन केलेले आहे आणि सर्व सदस्यांनी पण आपल्या समस्या सांगितलेल्या आहेत. या सगळयांचा विचार करून ही महासभा या गटनिहाय कंत्राट पद्धतीचा जो येणारा खर्च आहे या खर्चास प्रशासकीय आणि वित्तीय मंजूरी देत आहे. असा ठराव मी मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र.०३ :- कंत्राट पध्दतीने प्रस्तावित गट निहाय प्रभाग साफसफाई करणेबाबत.**

**ठराव क्र. ०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ ७९ चौ.कि.मी. असून शहराची लोकसंख्या सन २००१ च्या जनगणनेनुसार ५२०००० एवढी आहे. महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या मागील काही वर्षापासून झपाटयाने वाढत आहे. मागील दशकातील लोकसंख्या वाढीचा दर १९६टक्के एवढा असून प्रत्येक वर्षी महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या जवळजवळ २० टक्के ने वाढत आहे. सद्याची लोकसंख्या जवळजवळ ७००००० एवढी आहे. याचा भार नागरी सुविधांवर मोठयाप्रमाणत पडतो. शहरात ११७.४० किमी लांबीचे रस्ते (डांबरी), कॉंक्रीट रस्ते १४८.०० किमी लांबीचे असून पक्की गटारे २२७.०० किमी लांबीचे व कच्चे गटारे १४.५० किमी लांबीचे आहेत. महानगरपालिका हद्दीत रोज अंदाजे २६० टन कचरा तयार होतो. महानगरपालिका आस्थापनेवर ८१४ सफाई कामगार पदे मंजूर असून सदरचे सफाई कामगार कर विभाग, मुख्य कार्यालय, पाणी पुरवठा विभाग, वन विभाग, शिक्षण विभाग, भांडार विभाग, अतिक्रमण विभाग, अग्निशमन विभाग, नगरभवन विभाग आदी ठिकाणी गरजेनुसार वर्ग करण्यात आले आहेत. त्यामुळे स्थायी आस्थापनेवर सफाई कामगारांची संख्या जास्त दिसत असली तरी दैनंदिन सार्वजनिक साफसफाईसाठी आवश्यक असलेल्या कामगारांची पदे व इतर विभागात काम करित असलेल्या कामगारांची संख्या व प्रत्यक्ष साफसफाई करीत असलेल्या कामगारांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| | | | |
|---|---|---|---|
| | महानगरपालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या एकूण मजूर सफाई कामगार | - | ८१४ |
| अ | सार्वजनिक साफसफाई व्यतिरिक्त इतर विभागात काम करणारे सफाई कामगार | - | ४५५ |
| ब | आरोग्य विभागात साफसफाई व डास निर्मूलन करिता कार्यरत असलेले कामगार | - | ३३१ |
| क | अ आणि ब मधील एकूण कामगार | - | ७८६ |
| ड | रिक्त पदे | - | २८ |

वरील तक्त्याचे अवलोकन करता एकूण ७८६ कामगारांपैकी २३० सफाई कामगार दैनंदिन साफसफाईचे कामाकरिता उपलब्ध होतात. घनकचरा व्यवस्थापन नियम २००० व हाताळणी या नियमांची अंमलबजावणी करणे कामी केंद्र शासनाने नेमलेल्या बर्मन कमिटीच्या शिफारशीनुसार (बर्मन समिती, मार्च १९९९ नुसार )

१. कमी लोकसंख्या - ६५० ते ७५० रनिंग मीटर लांबीचा रस्ता प्रती कामगार
२ मध्यम लोकसंख्या - ४०० ते ६०० रनिंग मीटर लांबीचा रस्ता प्रती कामगार
३ दाट लोकसंख्या - २५० ते ३५० रनिंग मीटर लांबीचा रस्ता प्रती कामगार

महानगरपालिकेस १७४४ कामगारांची आवश्यकता आहे. महानगरपालिका आस्थापनेवरील सफाई कामगारांपैकी सार्वजनिक साफसफाईसाठी उपलब्ध कामगारांची अपुरी संख्या विचारात घेऊन महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक साफसफाई कामाकरिता ६७० सफाई कामगार खाजगी ठेकेदाराकडून जिल्हा दर सूचीतील प्रती कामगार प्रतिदिन रु.१०५/- या दराने सन २००० पासून घेण्यात आलेले आहेत. तसेच संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान करिता जादा ३०० कामगार मंजूर दरात दि.२९.१.२००३ पासून पुरवठा करण्याचे आदेश संबंधित ठेकेदारास देऊन त्यांचेकडून कामगार घेण्यात आलेले आहेत. वरील दरामध्ये ठेकेदाराने कामगार व सफाई कामासाठी आवश्यक असणारे साहित्य पुरवठा करणेचा समावेश आहे. ठेकेदाराचे कामगार व महानगरपालिकेचे कामगार संबंधित विभागामध्ये एकत्रित कामासाठी पाठविले जातात. ठेकेदार कामगार पुरवितात, परंतु कामगारांवर देखरेख, नियंत्रण व काम करुन घेण्याची पूर्ण जबाबदारी स्वच्छता निरिक्षकावर असते. कामगार पुरवठा करणारे ठेकेदार पाहिजे त्या प्रमाणात देखरेख व नियंत्रण ठेवू शकत नाहीत. महानगरपालिका व ठेकेदाराचे कामगार एकत्र काम करित असल्यामुळे कामगारांवर नियंत्रण, देखरेख ठेवणे अवघड जाते. महानगरपालिका हद्दीत भुयारी गटाराची व्यवस्था नाही. प्रत्येक इमारतीसाठी सेप्टीक टँकची व्यवस्था आहे. उघडया गटारांची संख्या मोठी असून ब-याच ठिकाणी गटारांना व्यवस्थित पातळी नाही. गटारांचे आकार वेगवेगळे आहेत. सर्व गटारे नाल्यास जोडलेली नाहीत. त्यामुळे वेगवेगळया विभागात कमी जास्त पाणी साचत असते. महानगरपालिका हद्दीतील गटारे व नाले कायम तुंबलेली असतात. यामुळे डासांची उत्पत्ती वाढते.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील सफाई कामगार आवश्यकतेप्रमाणे इतर विभागात वेळोवेळी दिलेले आहेत, व त्याठिकाणी नियमित काम करतात. त्यामुळे प्रत्यक्ष साफसफाईसाठी फक्त २३० कामगार उपलब्ध आहेत. महानगरपालिकेच्या अग्निशमन विभाग, सुरक्षा व अतिक्रमण विभागासाठी सफाई कामगार वर्ग करण्यासाठी विचारणा झालेली आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सध्याची गटारांची अवस्था, भुयारी गटारे योजने अभावी ठिकठिकाणी मोकळया जागेत साचलेले पाणी त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रात मोठयाप्रमाणात डास उत्पत्ती स्थळे वाढलेली आहेत. हि बाब विचारात घेऊन डास नियंत्रणासाठी किमान १५० कामगारांची आवश्यकता आहे. वरील वस्तुस्थिती विचारात घेता सार्वजनिक साफसफाईसाठी कामगार शिल्लक राहणार नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेची प्रभाग रचना भौगोलिक स्थिती, विभागातील लोकसंख्या, रस्ते व गटारांची संख्या व अवस्था विचारात घेऊन महानगरपालिकेचे सार्वजनिक साफसफाईचे दृष्टीने एकुण १० गट पाडणेत आलेले आहेत.

ठेकेदाराकडून फक्त कामगार न घेता संबंधित गटारातील सार्वजनिक साफसफाई म्हणजे रस्ते सफाई, गटाराची सफाई, कचरा व गाळ करुन उचलणे व तो महानगरपालिका सांगेल त्या ठिकाणी वाहून नेणे याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर टाकल्यास ते जबाबदारीने काम करु शकतील. दैनंदिन साफसफाईचे कामास पूर्णपणे ठेकेदारास जबाबदार धरण्यांत येईल. ठेकेदारास त्यांनी पुरवठा केलेल्या कामगारांवर व तसेच त्यांच्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवून संपूर्ण कामे करावयाची आहेत. आरोग्य विभागाकडील मुकादम व स्वच्छता निरिक्षक हे ठेकेदाराचे संपूर्ण

कामावर देखरेख व नियंत्रण ठेवून त्यांचेंकडून आवश्यक ती कामे करुन घेतील. ठेकेदाराचे काम समाधानकारक झाले नाही, तर त्यांचे वर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. सोबत जोडलेल्या परिशिष्ठाप्रमाणे ठेकेकदाराने प्रत्येक गटात वाहने पुरवायची आहेत, व ज्या ठिकाणी सध्या महानगरपालिकेची वाहने कार्यरत आहेत. त्या ठिकाणी महानगरपालिकेकडून नियमितपणे सध्या ज्या प्रकारे काम चालते त्या तत्वावर वाहने पुरविण्यांत येतील. याकरिता संबंधित ठेकेदाराकडून प्रतिदिन प्रती डंपर रु.१,४५५/- निविदा मंजुर दरानुसार रोज १२ तास याप्रमाणे कंत्राटदाराच्या देयकातून वसुल करण्यात येणार आहेत.

सन २००३/०४ या आर्थिक वर्षात महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य विभागातर्फे करण्यात येणारी दैनंदिन साफसफाईची कामे उदा. दैनंदिन रस्ता सफाई, गटार सफाई करतेवेळी जमा झालेला कचरा / गाळ उचलणे, प्रभागात घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा वेगवेगळा उचलणे. आदी सर्व कामे करुन घेण्याबाबत प्रस्तावित केले आहे. या अंतर्गत ठेकेदाराने मजुरांचा पगार, साफसफाई विषयक आवश्यक असणारे साहित्य, हातगाडया, कामगारांना साफसफाई करतेवेळी आावश्यक ते सुरक्षा साहित्य, प्रभागातील कचरा उचलणे इ. याचा तपशिल सोबत जोडलेल्या तक्त्यात दिलेला आहे. कामगारांचा पगार प्रचलित किमान वेतन कायद्यानुसार धरलेला असून तो शासकिय धोरणानुसार बदलणारा आहे.

सदर प्रकरणी मा. महापालिका सर्वसाधारण सभेत चर्चा करतांना प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावात काही विभागात कामगारांची संख्या व त्याप्रमाणे लागणारे साहित्य यात वाढ करण्यात यावी. अशा सुचना सन्मा. सदस्यांनी केलेल्या आहेत. त्यानुसार वरील प्रस्तावित खर्चात अंदाजे रु.१०,००,०००/- (दहा लाख रुपये) वाढ होण्याची शक्यता आहे. त्यास ही महासभा मंजुरी देत आहे. प्रशासनाने त्यानुसार निविदेत बदल करावेत.

सन २००३/०४ मधील अर्थ संकल्पिय अंदाजपत्रकात वॉर्ड साफसफाई करणे या शिर्षकाखाली रु.५,००,००,०००/- ची तरतूद केलेली आहे. तरी महानगरपालिका हद्यीतील सर्व रस्ते, गटारे, साफसफाई, कचरा गोळा करणे व तो वाहून नेणे, घरोघरी जाऊन ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा जमा करणे व तो वाहून नेणे, साफसफाईसाठी लागणारे सर्व साहित्य, सुरक्षा विषयक साहित्य पुरविणे, कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे इ. कामे खाजगीकरणातून करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.४,८५,४१,८७३/- यास हि महासभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. आसिफ शेख

ठराव सर्वानुमते मंजुर

**(प्रभारी सचिवांनी विषय क्र.४ चे वाचन केले.)**

**ध्रुवकिशोर पाटील:-**

मा. महापौर मॅडम पावसाळयापुर्वी नालेसफाई करणेबाबतचा जो गोषवारा दिलेला आहे. या गोषवाऱ्यामध्ये एक डिटेल अशी टिपणी दिलेली आहे. आणि धोरणात्मक बाब म्हणून या महासभेने प्रशासकीय आणि वित्तीय मंजूरी द्यावी अशी मी शिफारस करीत आहे. तसा ठराव मांडत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम यामध्ये ब्याऐंशी पक्के कच्चे नाले दाखविलेले आहेत. त्याची यादी मला द्या कमीत कमी आम्ही जाऊ कुठले नाले आहेत. ब्याऐंशी कोणी विचारले तर आम्हाला पण माहित असु द्या हे ब्याऐंशी नाले भाईंदरमध्ये आहेत. दुसरी गोष्ट महापौर मॅडम साहेब जे नाले साफ करायला देतो आपण त्यावेळी त्याचे मापमोज कशा करतात याची सभागृहाला कोणाला माहिती नाही. माझ्या माहिती प्रमाणे नाले साफसफाई करताना त्याच्यातून जेवढा गाळ काढला जातो त्या ब्रासने जेवढा गाळ काढणार त्या ब्रासने त्याचे मापमोज झाले पाहिजे. तशी मापमोज आतापर्यंत झालेली नाही. म्हणून जेव्हा हा प्रस्ताव येणार आहे. नाले साफसफाईचा जेवढा गाळ काढणार आहे. त्या गाळाची स्क्वेअर फीट किती ब्रास आहे. त्याब्रासप्रमाणे ठेकेदारांना पैसे दिले पाहिजे अशाप्रकारची निविदा येथे आली पाहिजे.

**जोजफ गोन्सालवीसः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय येथे मुर्धे ते उत्तन नाले सफाई दोन लाख पाच हजार आठशे एकोंणऐंशी अशी रक्कम दिली आहे. मला असे सांगायचे की उत्तनमध्ये असा एक आडवा बांध बिल्डर चौधरीने टाकला आहे. तेथून संपूर्ण उत्तर डोंगराचे पाणी त्या खाडीतून वाहते त्या बांधामुळे सर्व पाणी तिथे अडेल आणि संपुर्ण गाव तो पाण्याखाली जाईल. तर माझे सभागृहाला असे निवेदन आहे की तो जो भराव टाकलेला आहे तो भराव काढण्याचे ह्याचे मध्ये ह्या खर्चामध्ये घेतलेला आहे का?

**मा. उपमहापौर :-**

डॉ. बावस्कर त्यांच्या प्रश्नाला उत्तर द्यावे.

**डॉ.बावसकर :-**

मा. महापौर महोदया, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जी अंदाजित संख्या दिलेली आहे. ही जरी संख्या दिलेली असली तरी प्रत्येक नाला हा साफसफाई मध्ये कंसीडर केला जाईल. प्रत्येक नाल्याची साफसफाई करणे गरजेचे आहे आणि ती आपण करूया. फक्त हे दिलेले आहेत ते अंदाज आहेत किंवा जो नावे उपलब्ध होती परंतू नाले साफसफाई करताना आयत्या वेळेला किंवा त्याप्रभागातील जेव्हा नाले असतील ते संबधित सन्मा. नगरसेवकांना विचारून किंवा त्यांच्या प्रभागातील नाल्याचं त्याच्याशी विचारणा किंवा चर्चा करूनच ही संपूर्ण नाले सफाई करण्यात येईल.

**जोजफ गोन्सालविस :-**

मला फक्त असा प्रश्न विचारायचं आहे नाल्याची व्याख्या काय? नाला म्हणजे खाडी वगैरे येते त्याच्यात.

**डॉ. बावसकर :-**

नाला म्हणजे महानगरपालिका हद्दीतील प्रभागातील जे वेगवेगळे गटारे आहेत ती जी मोठया नाल्यांना मिळतात खाडीच्या ठिकाणी ज्याठिकाणी मिळतात. खाडी ह्यामध्ये येत नाही. परंतू खाडीच्या तोंडाशी जे नाले असतील ते तेथून सुरूवात करायची असते साफसफाईला नाले ज्याठिकाणी खाडीला मिळतात त्या ठिकाणाहून सुरूवात केल्यानंतर आपल्याला त्याचा खरा अंदाज येतो आणि त्याच ठिकाणाहून आपण सुरूवात करणार आहेत. परंतू महानगरपालिका हद्दीत जेवढे नाले आहेत.

**जोजफ गोन्सालविस :-**

एक मिनीट खाडीच जर तोंडाच बंद केले असेल तर ते ह्याच्यामध्ये येते का?

**डॉ. बावसकर :-**

खाडीच तोंड आपण साफ करणार आहोत.

**रोहिदास शं. पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय सन्मा. नगरसेवक जोजफ घोन्सालविस यांचा जो विषय होता व ते मांडताहेत उगाच लांबलचक नेण्यापेक्षा जो मुद्दाचा विषय आहे की, नव्या खाडीतली ती खाडीच एका बिल्डरने भराव टाकुन बंद केली होती आणि त्याची जी तक्रार आहे त्या खाडीच्या मातीच्या भरावामुळे पुर्ण पालीगाव पाण्याखाली गेल जातंय असं अनुभव आहे. गेल्यावेळी जेव्हा डॉ. अशोक मोडक आमदार आले होते. प्रत्यक्ष पाहणी करून सांगितले होते की बिल्डरला तुम्ही फॉर करून नका लोकांच्या जनतेच्या सेवेसाठी आपण काम करीत आहोत तो मातीचा भराव निघणं तिथे जरूरीचं आहे. आता सन्मा. सदस्यांनी आपल्या त्यांच्यात फक्त सुचना केली आहे की आपण जी तरतूद केलेली आहे. त्याच्यात मातीचा भराव ताबडतोब तुम्ही करून घ्या कारण ह्या तीन कामांना तुम्हाला प्राधान्य द्याव लागेल ह्या निवेदनामध्ये आपण कुठेही असं मुदत दिलेली नाही. आपण जसं जानेवारी, फेब्रुवारी मध्ये प्रस्ताव आणतो. अशा पद्धतीने आपण प्रस्ताव आणलेला आहे. नव्या वर्षाचं प्रस्ताव त्यामुळे एप्रिलमध्येच येणार पण पाऊस आता पधरा दिवसांनी सुरू होणार आहे. असं जेव्हा भाकीत येत असेल तर पहिल्या पावसामध्ये मुळ हे जे नाले आहेत. ते साफ झाले नाही तर तो पहिलाच पाऊस होतो तो मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील सगळया कारखानदारांच, दुकानदारांच चाळीत राहणाऱ्या नागरीकांचं लाखो नाही तर कोटी रुपयांच नुकसान करते पहिल्या दिवसामध्ये आणि जर ह्या महापालिकेला क्रेडीट घ्यायचे असेल, लोकांचे धन्यवाद घ्यायचे असेल किंवा प्रशासकीय कुठेतरी नोंद करून घ्यायची असेल तर ह्या महापालिकेने चांगलं काम केले तर ह्या कामाला गती देणे अत्यंत जरूरीचे आहे. पण जेथे कुठेही उल्लेख नाही की २५ मे च्या आधी हे

काम करायचं आहे आणि हे वार फुटींगवर काम करायचं आहे. ह्या सभागृहाने जर फक्त प्रशासकीय मंजूरी दिली आणि त्याकामामध्ये जर शिथिलता राहिल तर तुम्हाला कोणालाही त्याचे क्रेडीट मिळणार नाही. क्रेडीटचा विषय बाजूला राहिला पण लोकांचे ह्यांचेमध्ये नुकसान होईल कारखानदारचं नुकसान होईल. अशातील विषय आहे. ज्या पद्धतीत आता सर्व सभासदांनी सांगितले आहे जसे गटारसफाई हा विषय वेगळा होता हा नालेसफाई एखादे गटार मागेपुढे झाले तरी मोठे नुकसान होणार नाही पण पावसाळी पाण्याचा निचरा होणार जसा मिरा रोडचा प्रभाग आहे. आज सगळयांच्याच लक्षात आलेले असेल की मिरा रोड बुडणार आहे, भाईंर पुर्वेचा प्रभाग आहे याला तळापर्यंतचे नाले साफ होणे आणि ते खाडी किनाऱ्यापर्यंत होणे हे जरूरीचे आहे. जाफरी खाडीवरचे आपल्या लक्षात आले असेल की जाफरी खाडीवरचा पुल आणि त्याला झालेली बाजूची भरणी मग ती कोणती एजन्सी काम करीत असेल आपले ठोसपत्र त्याला गेले पाहिजे किंवा आपला एक माणुस तिकडे डेपूट झाला पाहिजे. जसे चेणा नदीवरचे एक बंधारा आहे त्याचे नगरपालिकेचे पत्र गेल्याचे मला पत्र आलेले आहे. पण ते काम करून घेणे आपल्या अधिकारात आहे आणि ते करून घेतले पाहिजे नाहीतर कोट्यावधी रूपये जरी खर्च झाले तरी यश मिळणार नाही.

**जोजफ घोन्सालविस :-**

सभागृहाला माझी अशी विनंती आहे की, त्या बांधामुळे संपुर्ण पालिका बुडणार आहे तर तो तुम्ही भराव उचलणार का? मला याच्यावरती रुलींग पाहिजे मॅडम.

**उपमहापौर :-**

घोन्सालवीस साहेब आपलाच मुद्दा सांगतोय, नालेसफाई संदर्भामध्ये सर्व नगरसेवकांचे सभागृहाचे मत यािठकाणी आपण ऐकलेलो आहोत त्याच बरोबर घोन्सालवीस साहेबांनी जो विषय याठिकाणी मांडलेला आहे की नाल्यामध्ये भराव केलेला आहे मला असे वाटते आयुक्त साहेब आपण सबंधीत अधिकाऱ्यांना, सबंधीत नगरसेवकांना त्या ठिकाणी पाहणी करून योग्य कारवाई करण्याचे आदेश आणि त्वरीत द्यावे. त्याचबरोबर नालेसफाईच्या संदर्भामध्ये बरेच वर्षापासून होतात. पेमेंट केले जाते पण नगरसेवक संतुष्ट होत नाहीत, जनता संतुष्ट होत नाही. म्हणून माझी एक विनंती आहे, या सभागृहाला कि स्थायी समितीमध्ये सर्वपक्षीय सदस्य आहेत आणि नालेसफाईचे टेंडर शेवटी स्थायी समिती देणार आहे. आणि पेमेंटसुद्धा स्थायी समितीच्या माध्यमातून होणार म्हणून सर्व पक्षाचे प्रत्येक सभासदांची एक छोटीसी समिती त्या स्थायी समितीच्या सदस्यामधून तयार व्हावी आणि त्यांनी या सर्व नाल्यांची पाहणी करावी आणि त्यांच्या कंर्फमेशन नंतर त्या संबंधीत कॉन्ट्रॅक्टरला पुढचे पेमेंट व्हावे अशा प्रकारची माझी सुचना आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. उपमहापौर साहेबांनी या ठिकाणी जी सुचना केलेली आहे ती निश्चितपणे चांगली आहे. स्वागतार्ह आहे. परंतू तसे करीत असताना त्या त्या प्रभागातील सदस्याचा समावेश करून घ्यावा जेणे करून पुढे अडचण उद्‌भवणार नाही कारण स्टँडीग कमिटीमध्ये जे ठराव होतात.

**उपमहापौर :-**

पुढे मी सांगतोय सन्मा. सदस्य आसिफ शेख माझे याबद्दल थोडसे ॲडीशन असे आहे की ज्या नालेसफाईचे काम ज्या ज्या ठेकेदारांना दिले जाते त्या त्या ठेकेदारांनी त्या प्रभागाच्या सदस्यांशी संपर्क साधून त्यांची सुद्धा विचार अंमलात आणण्याचा प्रयत्न करायला पाहिजे त्यांच्या सुद्धा सुचनांना त्यांनी ऐकले पाहिजे आणि त्याच्याकडून सुद्धा आयुक्त साहेब त्यांनी एक पत्र घेतले पाहिजे की काम जे काय कॉन्ट्र क्टर दारांनी केलेले आहे, ते संतुष्टजनक आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम या विषयावर बोलते साहेब म्हणाले की त्या त्या विभागातील नगरसेवकांना भेटले पाहिजे. नालेसफाईच्या संदर्भामध्ये एक आठ दिवसापुर्वी दोन पत्र लिहिली आहेत नगरपरिषदेला. पद्धत सांगते तुम्हाला ह्याच्यापुढे होऊ नये म्हणून आपल्याकडे पद्धत आहे. सोसायटीची काहीपत्र येतात आरोग्य विषयक किंवा नगरसेवकांची पत्र येतात ती पत्र आयुक्त साहेबांच्या नावाची असतात, स्थायी समितीच्या नावाची असतात किंवा आणखीन कोणाची असतात. ती पत्र इथे येतात माहिती नाही. आयुक्त साहेब त्याच्यावर काय रिमार्क मारतात कदाचित खाली पाठवित असतील की आरोग्य विभागाकडे जा किंवा पाणी पुरवठा विभागाकडे जा किंवा काही ते पत्र खाली आल्यांनंतर त्याचा पेक्षा आणखीन खालच्या अधिकाऱ्याकडे येते त्याच्या पेक्षा आणखीन कमी येत असेल कदाचित बीपी रोडला येत असेल तिथले लोक ते पत्र नगरसेवकांचे पत्र माहिती नाही सर्व सामान्य सोसायट्यांचे काय होत असेल ते ही पुढे मी बोलणार आहे ते नगरसेवकांचे पत्र घेऊन

तो मुकादम आपल्या घरी येतो. मॅडम याच्यावर  सही करा तुमचे पत्र आहे का सही करा, तर आमच्या साहेबांनी सांगितले आहे त्याच्यावर सही करा म्हटले याच्यावर लिहिलेले आहे याच्यावर इंप्लीमेंट झाली का सही करायला ते माहित नाही आम्हाला सांगितले आहे सही घेऊन या. म्हणजे आम्ही सही केली म्हणजे ते काम झाले असे तुम्हाला म्हणायचे आहे का? साहेब मला हे सांगायचे आहे. करू नका हे मला कळते. मी सही नाही केली परंतू तुमच्या कामकाजाच्या पद्धतीवर मी इथे बोलते की ही पद्धत काय झाली? सोसायटी चे पत्र सुद्धा तुमचे मुकादम घेऊन येतात. मॅडम ही सोसायटी कुठे  आहे. मला आमच्या  साहेबांनी सांगितले आहे याच्यावर त्यांची सही घेऊन या. तुमचा त्याच्यावर निर्णय काय झाला त्याच्यानंतर सही घ्या तुम्ही.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही एकीकडे नगरसेवकांना विश्वासात घेत नाही. म्हणून तक्रार करता. एकीकडे तूम्हाला आलेल्या तक्रारीचे निरसन करण्यासाठी सबंधितांनी तुम्हाला संपर्क साधला तो तुम्हाला नको असतो म्हणजे प्रशासनाने निश्चित काय करायचे आहे.

**प्रभात पाटील :-**

मला हेच म्हणायचे आहे निरसन केल्यानंतर तूम्ही सही घ्या.

**मा. आयुक्त :-**

निरसन नाही झाले तर सही करायचे तुम्हाला बंधन आहे का? तुमच्यावर दबाव टाकून सही घेतली जाते का?

**प्रभात पाटील :-**

मला तेच तर म्हणायचे आहे. निरसन करायला सुचवा ना त्यांना, तुम्ही मला का बोलता. त्यांना सांगा ना निरसन केल्यानंतर तुम्ही सह्या घ्या.

**मा. आयुक्त :-**

आम्ही त्यांना असेच सांगितलेले असते. तुमच्या कडे जाऊन हट्टाने सह्या घ्या अशा सुचना दिलेल्या नसतात आम्ही.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही त्यांना असे सांगितले आहे ते मग येतात का?

**मा. आयुक्तः-**

अशी कोण व्यक्ती मला ते सभागृहात सांगण्याऐवजी मला सांगायला पाहिजे होते तुम्ही.

**प्रभात पाटील :-**

तेच तर सांगते ना मी बोलते ना मुकादम येतात म्हणून.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही सांगा ना मला कोणी तक्रार केली त्याची

**प्रभात पाटील :-**

अहो, मुकादमांना पाठवणार कोण आहे. बोलावे त्यांनी असा हात करून चालणार नाही साहेब ही पद्धत बरोबर नाही तुमची म्हणजे माझा प्रश्न फालतु वाटला का तुम्हाला.

**मा. आयुक्त :-**

प्रश्न फालतु नाही. पद्धत चुकीची नाही. ज्या नगरसेवकांने तक्रार केलेली आहे त्या नगरसेवकांचे समाधान झाले की नाही. त्या सोसायटीमध्ये प्रश्न सुटला की नाही. हे जर आमचा कर्मचाऱ्यांनी तुम्हाला विचारले, नसेल सुटला तर तुम्ही सुचना द्या कि मला हे काही बरोबर वाटले नाही. त्याच्यामध्ये तुम्हाला वाईट कशाचे वाटते मला कळत नाही.

**प्रभात पाटील :-**

मग पुढे मी तेच सांगितले त्यांना की मला पाहिजे तसा रिपोर्ट आलेला नाही. तुझ्या साहेबाला नीट वाचायला सांग आणि नीट वाचायला सांगितल्या नंतर त्यांनी जाऊन त्या नाल्याची मेंजरमेंट घेतलेली आहे आणि पुढे त्याच्यानुसार कामकाज सुरू झालेले आहे. मा. महापौर मॅडम मला म्हणायचे आहे तुमचा ठराव होऊ द्या. ह्या पद्धतीमध्ये ही पद्धत अशी बरोबर असेल तर आयुक्तांनी सांगावे. हयाच पध्दतीने कामकाज चालू राहणार आहे. त्यांनी सांगावे की माझी पद्धत बरोबर आहे म्हणून.

**मा. महापौर :-**

तुम्ही पद्धत सांगा ती आम्ही अंमलात आणु.

**प्रभात पाटील :-**

मी कशाला, मला तर ती चुकीची वाटते म्हणून मी आवाज उठवला.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला काय पद्धत आवडते ते तुम्ही सांगा.

**प्रभात पाटील :-**

माझी एकच पद्धत आहे मला एकच म्हणायचे आहे की आम्ही दिलेल्या पत्रानुसार त्याच्यावर काय कारवाई केल्यानंतर आमची सही घ्या की आम्ही ह्या ह्या पद्धतीने त्याच्यावर कारवाई करणार आहोत. आम्ही दिलेल्या पत्रावर आमचीच सही घ्यायला येता याचा मतलब काय आहे. कारवाई झाल्यानंतर सही घ्या तुम्ही. आणि कृपया मी सांगतो तुम्हाला तुम्ही जे असे हातवारे करता महापौर, उपमहापौर करतात किंवा आयुक्त महापौरांना करताना एखादा नगरसेवक बोलत असतांना माझा ह्याच्यावर आक्षेप आहे. म्हणजे समोरचा बोलणारा माणूस हा काहीतरी फालतुगीरीने बडबड करतो असे सुचवायचे असते का तुमच्या हातवाऱ्यांमधून माझा आक्षेप आहे आणि तो आक्षेप नोंदवावा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, सन्मा. सदस्या प्रभात ताईंनी या ठिकाणी जे व्यक्तव्य केले, संभाषण वगैरे दिलेले आहे. त्याच्या भुमिकेशी मी देखील सहमत आहे कारण प्रशासनामार्फत साहब अशा गोष्टी होत असतात आणि मी सांगितले ग्रामपंचायतची नगरपालिका झाली, नगरपालिकेची महानगरपालिका झाल परंतू प्रशासन अजुनही ग्रामपंचायत प्रमाणे चाललेले आहे. ही वस्तुस्थिती आहे त्यामुळे त्यांनी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या भावनांशी मी पुर्णपणे सहमत आहे. कारण आम्ही पण जेव्हा तक्रारी करतो ती पद्धत तशीच असते म्हणून मी आपल्याला सांगतो आपण आयुक्त या नात्याने या प्रशासनावर आपली जी वचक पाहिजे ते वचक निर्माण करा. वचक कधी निर्माण होईल, एखाद दोघांना घरी बसवा तेव्हा वचक निर्माण होईल. बघा नाही कामाला लागले तर मी राजीनामा देवून घरी बसतो. तुम्ही एक प्रायोगीक तत्वावर करून बघा. एखाद्याला जबाबदार ठरवा कारण करतात चुका बऱ्याच प्रत्येक विभागात चुका झालेल्या आहेत त्यामुळे प्रभात ताईंची जी भुमिका आहे त्या भुमिकेशी मी सहमत आहे कारण हा चेष्टाचा विषय नाही तर ह्या ठिकाणी आपण निश्चितपणे विचार करण्यापेक्षा कृतीवर आपण भर द्यावा आणि ती कृती अंमलात आणून नागरीकांना आपण दाखवून देवू शकतो की आपले जे प्रशासन आहे ते अगदी पारदर्शक आहे आणि निश्चितपणे येथून आपण लोकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणार आहोत. या ठिकाणी ध्रुवकिशोर पाटील यांनी जो ठराव मांडला आहे. त्या ठरावाला मी अनुमोदन करत आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम माझा एक महत्वाचा विषय आहे. आपण जे नवीन गटारे बनविले आहे. मा. आयुक्त साहेब मी आपणाला एक सुचना देतोय ही जी बंद गटार आहेत त्या बंद गटारांची नाले कॉन्ट्रक्टर साफ करणार आहेत. की महानगरपालिका साफ करणार आहे. ह्याच्यावर आम्हाला सुचना करायची आहे बंद गटारे आहेत नगरपालिकेचे कर्मचारी आहेत ते सांगतात आम्ही साफ नाही करणार आणि आता आपण जे कॉन्ट्रक्टर देणार आहोत ते मोठे नाले फक्त साफ करणार कि जी फुटपाथ बनवलेले आहेत. ती देखील साफ करणार त्याचा खुलासा अजुन आम्हांला मिळालेला नाही कारण नगरपालिका साफ करीत नाही. गटारे जी बनवलेली आहेत. फुटपाथ जे बनविलेले आहेत त्याच्या मध्ये आजपण माती ढीग, दगडे आहेत आणि आत मध्ये गोण्या आहेत. हयाच्यामुळे येत्या पावसाळयात निश्चितपणे फुटपाथ जे बनवलेले आहेत. त्याच्यामुळे मोठा प्रॉब्लेम होणार आहे. पाणी साफ होणार नाही आणि ती पण कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने साफ करणार कि नगरपालिका तर्फे साफ करणार याचा खुलासा दया.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो या शहराच्या स्वच्छते करीता सेनेटरी इन्स्पेक्टर आहेत हे सर्व जबाबदार आहेत तर हे सेनेटरी इन्स्पेक्टर आहेत गावाची देखभाल साफसफाई त्यांनी बघायची असते. माझी आयुक्तांना अशी विनंती आहे. कि जर तुम्हांला सजा दयायची असली तर तुम्ही सेनेटरी इन्स्पेक्टर पासुन सजा दयावी तर हे संबध गाव साफसफाई होईल आणि त्याची स्चच्छता बरोबर होईल असे माझे मत आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय आताच मा. उपमहापौरांनी जी सुचना मांडली ती अतिशय चांगली आहे. कारण महापालिकेमध्ये स्थायी समितीमध्ये शिवसेनेनचे प्रतिनिधीत्व नाही

आणि नालेसफाईच्या संदर्भात जी कमिटी बनवायची आहे. मा आयुक्त, मा. महापौर व मा. उपमहापौरांना आमची नम्र विनंती आहे. शिवसेनेला या कमिटीमध्ये प्रतिनीधी म्हणून घ्यावे अशी मी आपणाकडे विनंती करीत आहे.

**लीला पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते नवघर खाडीवर इंदिरानगरच्या बाजुला जी खाडी आहे तिथे उघाडी आहे. त्यांना पण झडपा नाहितच. तसेच नवघर पुर्वेला पणी जी उघाडी आहे त्यांना पण झडपा नाही. त्याच्यामुळे भरतीचे पाणी गावात येते त्या पाण्याबरोबर गटाराचे सुध्दा असते. अक्षरशः नवघरच्या अर्ध्यागावात पाणी घुसते. आताही आपण इथे बसलेलो आहोत. पण तिथे आपल्या अधिकाऱ्यांना पाठवून खात्री करुन घ्या कि घाणीचे पाणी घरात घुसलेले असते याच्यावर तुम्ही जास्तीत जास्त लवकर विचार करावा

**प्रभात पाटील :-**

मॅडम असेच सेम पत्र मी महानगरपालिकेला दिलेले आहे. तर त्याच्यावर तो माझी रिटर्न सही घ्यायला आला. मॅडम बोलल्या तेव्हा विषय मी मांडलेला आहे. आणि आयुक्ताच्या नावाने पत्र दिलेले होते काय इंप्लीमेंट झाल असेल लगेच तर तुम्ही मला सांगता तुमची पध्दत चुकीची आहे. मी हयाच विषयावर पत्र दिलेले आहे.

**तुलशीदास म्हात्रे:-**

मा. आयुक्त साो. हया विषयाशी धरुन बोलतो मघाशी दिनेश नलावडे यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या लोकांनी करोडो रुपये कमिशन खाण्यासाठी गटाराचे नाले बनवले, त्याच्यावर स्लॅब टाकले, रस्ते क्रॉस आहेत. तिथे स्लॅब आहेत. त्यांना बांबु लावलेले आहेत. पाऊस पडल्या बरोबर भाईंदर जलमय होणार आहे. यांच्यावर लक्ष दयायची अतिशय गरज आहे. बावसकर कधी गेलेत का ? गटाराच्या खाली घुसलेत का ? आणि मिलन पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे जे सेनेटरी इंन्स्पेक्टर आहेत आम्ही या गावचे स्थानिक लोक आहोत. आम्हांला सर्व माहित आहे. जे ओरिजनल नाले आहेत ते बिल्डर लोकांनी बंद केले आहेत. माझ्या पाठीमागे एक नाला आहे. तो बंद केला आणि आपले कागदावर रेषा ओढणारे अधिकारी नवीन येतात आणि जे नाले ओरिजनल आहेत ते सोडून त्यांनी रस्त्याच्या कडेला नाले केलेले आहेत. त्याच्यातुन पाणी जाणार आहे का हया दोन गोष्टी तुम्ही लक्षात ठेवा. बावीसकर काय बोलते नगरपालिका क्षेत्रात ते खाडीच्या नगरपालिकेची बंदिस्ती आहे. बंदिस्तीच्या खाली खाडीतुन जे पाणी जाते तोच नाला जर बंद झाला असेल तुम्ही तिथे जे. सी.बी. घुसविली नाही तर पाणी जाईल का या शहराचा पाण्याचा निचरा होईल का त्या बाईंनी सांगितले आणि उघाडीचे दरवाजे आता खांबीत आहेत. गेली १० वर्षापासून आम्ही नगरसेवक आहोत ९१ पासून खांबीतला माहितच आहे जेव्हा जेव्हा उघाडीचे दरवाजे तुटले जातात.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौरांना विनंती करतो की त्यांनी जेवणाची वेळ जाहिर करावी.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर मॅडम सर्व सन्मा. सदस्यांच्या भावना तीव्र आहेत कि जेवणाची वेळ निश्चित पाहिजे परंतु सदस्यांनी देखील मला बोलता येते म्हणून मी काहीही बोलेन आणि कितीही बोलेन कितीही वेळ बोलेन असा दृष्टीकोन ठेवू नये. सदस्या अतिशय सुज्ञ आहेत. आपल्याला माहिती आहे. परंतु मी फार वेळ बोललो म्हणजे फार मोठी मर्दुमकी गाजवली अशी भावना करु नये. अत्यंत महत्वाचे विषय आहेत . काही सदस्या मला काहीतरी बोलायचे आहे. म्हणून बोलत असतात. तुमचा अभ्यास फार आहे. या क्षेत्रात आम्हांला माहीती आहे. यापुढे सभागृहामध्ये आजच निर्णय व्हावा जेवणाची वेळ कुठली असावी. आम्हांला नक्कीच उपवास आहे. आजची सभा ताबडतोब झाली पाहिजे ही आमची भावना आहे. बऱ्याच लोकांना कार्यक्रम आहेत. मा. महापौर मॅडम हया देखील ईस्टरच्या उत्सवामध्ये बीझी असतील. परंतु सदस्यांनी मग नंतर ओरड करायची मला बोलायला मिळाले नाही किंवा मला बोलया येते काही गोष्टी असंबध असतात हा ही भाग आता लक्षात आलेला आहे. आरोग्य विषयक अतिशय महत्वाचे प्रश्न आहेत. आयुक्त साो. सदस्यांनी सुचना केल्यानंतर आपण ताबडतोब त्याच्यावर मा. महापौर मॅडमशी चर्चा करुन हयाच्यावरती निर्णय घेतला पाहीजे. एका विषयाला अनुमोदन दिल्यानंतर पुन्हा पुन्हा तोच विषय आणि तोच विषय काढत असतील वेगवेगळे सदस्य तर ती गंभीर बाब आहे. आपण आता याबाबतीत तिन्ही विषय आरोग्य बाबतीत आहेत आणि महत्वाचे आहेत. हयाबाबत काय तो निर्णय घ्यायचा आहे. जर लंच हावर दयायला असेल तर किती वेळ दयाल कारण जेवणाची वेळ टळून गेलेली आहे.

**आसिफ शेख :-**

वेळ टळून गेलेली आहे. जेवण झाले पाहिजे आपण ज्या पध्दतीने याठिकाणी वक्तव्य करत आहात. मर्दुमकीची ही भाषा योग्य नाही या सभागृहात. वेळ दीड ते दोन वाजेपर्यंत जेवण झाले पाहिजे. आता तात्याही बोलले मला डायबिटीस आहे. मला वेळेवर जेवण लागते आणि डायबिटीसचे जे पेन्शंट आहेत. त्यांना विचारा विजय पाटलांना डायबिटीज आहे. आपल्याला जी भुमिका ज्याठिकाणी मांडायची आहे. त्याला आपण विषय मांडत नाही. कही पे निगाहे कही पे निशाना जिने दो जालीम बनाव न दिवाना अशी दुटप्पी भुमीका घेऊन चालणार नाही. जिथे आपल्याला बोलायचे आहे तिथे आपण गप्प बसता. आता जेवणाची वेळ झालेली आहे. तुम्हांला काय त्रास होतो. मा. महापौर साो. आपणांस विनंती आहे. सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आपला एक तर ईस्टरचा पण सण आहे. उर्वरित विषय जेवणांनतर किंवा पुढच्या मिटींगला घ्या.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम जेवणाची सुट्टी जाहीर करा अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

**आसिफ शेख :-**

उर्वरित विषय पुढच्या सभेत घ्यावे असा मी ठराव मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सदर विषय हे आजच घेतले पाहिजेत आरोग्याचे प्रश्न आहेत. आता खरेदी केली तर पावसाच्या अगोदर येईल. पुढच्या मिटींगला न घेता जेवणाची सुट्टी दया. महत्वाचे विषय आहेत. आरोग्याचे प्रश्न आहेत. हया मिटींगमध्ये झालेच पाहिजेत डिसाईड फक्त दोन विषय आहेत. ऑक्ट्रॉयचा विषय तुम्ही कसा काय केलात.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम परवानगीने बोलते आताच आमचे सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी जे विधान केले कि असबध्द बडबड करतात. किंवा बोलता येते बोलण्याची हौस पुरते म्हणून बोलून घेतात. या सभागृहा मधील सदस्यांच्या भावनाशी ते या पध्दतीने खेळत असतील तर माझा हयांच्या विधानाला आक्षेप आहे. सभागृहातील सदस्य काळजीपूर्वक आपले प्रश्न येथे मांडत असतात. आणि सभागृहातील सदस्यांचे असबध्द हे बोलण ठरवारे ते कोणी नाही आहेत. प्रत्येक जण आपले प्रश्न याठिकाणी पोटतिडकीने मांडत आहेत. आणि कृपया त्यांनी याच्यापुढे याठिकाणी अशी विधाने मांडू नयेत.

**प्रकरण क्र. ०४ :-** **<u>पावसाळ्यापुर्वी नाले सफाई करणे बाबत.</u>**

**<u>ठराव क्र.०४</u> :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र ७९ कि.मी असून मनपा क्षेत्रात २४१.५० कि.मी लांबीची कच्ची / पक्की गटारे आहेत. शहरामध्ये ८२ कच्चे व पक्के नाले असून सदरचे नाले सफाई करणे कामी तीन झोनमध्ये विभागणी केली आहे. शहरातील नाले उघड्या स्वरुपाचे असल्याने नाल्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ-कचरा जमा होतो. काही ठिकाणी कच्चे नाले जमा झालेला गाळ खोदाई करुन सदरचे नाले खाडीपर्यंत जोडणे आवश्यक आहे. नाल्यातील गाळ जेसीबी / पोकलन मशिन तसे च मजुरांमार्फत पावसाळ्यापूर्वी उपसून काढणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे कच्चे व पक्के नाले खोदाई / सफाई करतांना निघालेला माती, गाळ, कचरा उचलून महानगरपालिका सांगेल त्या ठिकाणी डंपर / ट्रकद्वारे वाहतूक करणे इत्यादी व नाले सफाई अंतर्गत येणारी इतर सर्व कामे पावसाळ्यापूर्वी करणे आवश्यक आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई करण्याकरीता कच्च्या व पक्क्या नाल्यांची सहा गटात विभागणी केली असून प्रत्येक गटातील नाले सफाई करीता येणारा अंदाजित खर्च पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | विभाग | एकुण खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) | ७,९१,४९१/- |

| | | |
|---|---|---|
| २ | मुर्धे ते उत्तन | २,०५,८७९/- |
| ३ | नवघर | ४,९६,५३०/- |
| ४ | खारीगांव | ११,७४,८२०/- |
| ५ | मिरारोड | १३,०८,५०४/- |
| ६ | मिरा ते चेना | ११,३२,३६६/- |
| | एकुण | ५१,०९,५९०/- |

वरील खर्च प्रशासनाने त्यांचे अहवालात नमुद केलेल्या नाल्या संदर्भातील आहे. परंतु मा. महासभेत झालेल्या चर्चेनुसार त्यांचे प्रीााागातील काही नाल्यांचा यात समावेश झालेला नसल्याची शक्यता विचारात घेऊन जे नाले प्रशासकीय अहवालात समाविष्ट केलेले नसतील असे सर्व नाले पावसाळ्यापुर्वी साफ करणे आवश्यक आहे. त्यामुळे अंदाजित खर्च वाढण्याची शक्यता आहे त्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

वरील तक्त्याचे अवलोकन करता नाले सफाई करणे कामी आवश्यक असणारे जेसीबी/पोकलन मशीन, डंपर, नालेसफाई करणे कामी आवश्यक मजूर आदी पुरवठा करणे कामी स्वतंत्र निविदा काढून जे.सी.बी. लहान पोकलन तसेच पोकलनसाठी पाण्यांत ठेवण्यांत येणारी बोट व नालेसफाई करणे कामी मजुरांचे दर मंजूर करून त्यांचे मार्फत नाले सफाई करुन घेण्यांत येणार आहे. सदर मंजूर दरातच कंत्राटदाराने चार महिन्याकरीता जे.सी.बी., पोकलन मशीन, बोट व मजुर पुरवठा करुन त्यांचे मार्फत आकस्मीक परिस्थीती उद्‌भवल्यास वेळोवेळी गरजेनुसार साफसफाईची कामे व नाले सफाई करण्यांत येणार आहे. या कामी सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात एकत्रित रु. पाच कोटीची तरतुद केली आहे. तरी शहरातील सर्व नाले सफाई पावसाळ्यापूर्वी करणे कामी येणाऱ्या अंदाजित रु. ५१,०९,५९०/- व मा. महासभेच्या झालेल्या चर्चेनुसार जे नाले प्रस्तावात समाविष्ट नाहीत त्यांचे सफाईसाठी येणाऱ्या वाढीव खर्चास ही महासभा प्रशासकी व वित्तीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**(सचिवांनी प्रकरण क्र. ५ चे वाचन केले.)**

**रिटा शाह :-**

या ठरावामध्ये मला एक शंका विचारची आहे की, वर उल्लेख केलेला आहे विभागात पण याच्यामध्ये कुठल्या विभागाचा उल्लेख झालेला नाही. ते कोणकोणते विभाग.

**सचिव :-**

भाईंदर पश्चिम दोन विभाग, पूर्व दोन विभाग, मिरारोड एक विभाग, हायवे एक व उत्तन एक विभाग.

**रीटा शहा :-**

भाईंदर पश्चिम दोन ते कुठे ?

**मा. आयुक्त :-**

ते जागा मिळण्यावर अवलंबुन आहे.

**रीटा शहा :-**

म्हणजे समाजमंदीर वगैरे तिथे पण आपण भरु शकतो. गोषवारा आम्हांला दिलेला आहे. कोणाला काय बोलायचे असेल ते बोला आणि ठराव मांडून घ्या.

**रोहिदास शंकर पाटील :-**

क्र. ५ चा विषय पुर्ण झालेला नाही याची नोंद घ्या

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम परवानगीने बोलतोय याच्यात आकडे दिलेले आहेत त्याच्यामध्ये तफावत दिसते मला आरोग्य केंद्रावर जे वैदयकिय कर्मचारी करारपध्दतीने घेतल्यास २१ लाख ४८ हजार प्लस फर्निचर साहित्य औषधे स्टेशनरी वगैरे २५ लाख दोन्ही मिळून किती झाले ४६ लाख आणि इमारती जागे भाडे १० लाख म्हणजे ५६ लाख. ५६ लाखामध्ये ५ लाख जमा होईल म्हणजे ५१ लाख

आणि शेवटी त्यांनी लिहिले आहे. ४७ लाख म्हणजे ४-५ लाखाचे लफडे आहे. म्हणजे आकडयामध्ये चुक आहे कि काय साहेब. आपण भाडे पकडलेले आहे ते पकडून याच्यामध्ये जास्त लिहीलेले आहे. भाडे, साहित्य सगळे पकडलेले आहे. कमी लागेल पण जास्त कसे लागणार. तुम्ही जास्त पकडलेले आहे परत.

**रीटा शहा :-**

आवश्यक ती दुरुस्ती करणार पण ४-५ लाखाचे कसे जास्त दिले ते अजुन सांगत नाहीत. अंदाज आहे ते बरोबर आहे त्यांनी सांगितले भाडयाचे हयाचे त्याचे सगळे मिळून ४१ लाख होतात. मग हे जास्त कसे झाले. जास्त कसे दाखवतात एंडींगला. अंदाजित आहे हे मला मान्य आहे. पण अंदाज चुकला तर आपण सर्व चुकणार आहे.

**हरेश गावंड :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, पेणकरपाडा ते चेणा या विभागासाठी एकच आरोग्य क्रेंद्र ठेवलेले आहे. पेणकर पाडा ते चेणा हा परिसर ६ किलोमीटर आणि २ किलोमीटर रुंदीचा आहे. आणि मध्यंतरी एकाच भागात ठेवले तर संपुर्ण ग्रामिण भाग आहे. झोपडपट्टी आहे. गाव व्हिलेज आहे. आदिवासी भाग असल्याने त्या भागात आदिवासी भागाकरीता एक व हायवेच्या पट्टयाकरीता एक अशी दोन केंद्र असावीत असे आमच्या सर्व हायवेच्या पट्टयातील नगरसेवकांतर्फे आपणांस विनंती करीत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. गावंड साहेबांनी जे सांगितलेले आहे ते बरोबर आहे कारण काशिमिरा ते चेणा, मिरा गाव पेणकर पाडा या संपुर्ण भागासाठी तुम्ही एक आरोग्य केंद्र दिलेले आहे आणि ग्रामिण क्षेत्रातच गरीब लोकांची संख्या जास्त आहे. आणि याची सेवा गरीब लोकांना मिळावी असा खरा अर्थ महानगरपालिकेचा असेल तर विभागामध्ये दोन आरोग्य केंद्र असणे गरजेचे आहे. तेथील लोकसंख्या पाहता त्या भागामध्ये दोन आरोग्य केंद्र करण्यात यावी अशी आम्ही काशिमिरा हायवे पट्टयातर्फे मागणी करतो.

**जीवी हिरा वाडे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहीदास शंकर पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय. महापालिका हद्दीमध्ये आरोग्य केंद्र सुरु करावी. असा आपला विषय आहे. आपण आता शासनातर्फे किंवा जिल्हापरिषदे तर्फे चालणाऱ्या आरोग्य केंद्राचा आपल्याला अनुभव आहे. एक केंद्र उत्तनमध्ये चालते. एक भाईंदरमध्ये चालते. त्याच्यातील असलेल्या सुविधा आणि आपण एक महत्वकांक्षी कार्यक्रम घेत आहोत. आपण सभागृहाच्या भावना, सभागृह कधी कधी घाईत असते असेही लक्षात येते. कधी कधी सभागृह चिंतेत असते असेही लक्षात येते हा पन्नास लाख रुपयांचा विषय आहे असेही म्हणत नाही. मी ५० च्या ठिकाणी १ कोटी रुपयांचा असला तरी हा शहराला आवश्यक असलेला विषय आहे. पण खरोखर मला असे वाटते कि ज्या पध्दतीने आपण मंजुरी घेत चाललेलो आहोत. कामाच्या पध्दतीने मंजुऱ्या घ्यावा. इथपर्यंत ठिक आहे. पण खरोखर त्यांचे आयोजन नियोजन करण्याची आपली क्षमता तयार झाली का. आजच्या सभेमध्ये जो विषय आणला गेला तर हा विषय इतका महत्वाचा आजच आणून त्याला मंजुरी दयायला पाहिजे होती. हयाची कोणती मुदत संपते असे नाही. पण जसे डॉ. बावसकरांनी आपल्याला तीन चार योजना दिलेल्या आहेत. त्या तीन चार पैकी तीन योजना नक्कीच यशस्वी झाल्या. सभागृहाचे किंवा नागरिकांचे त्यांना मत पडले असे होऊन जर हे होत असेल नाहीतर आपण घाईघाईमध्ये आज ५ केंद्र कि ७ केंद्र सातच्या ठिकाणी कमी पडत असतील तर ७च्या ठिकाणी आठ करा नऊ करा असा विषय होऊ शकेल. महापालिकेच्या आरोग्य केंद्रावर साधारण सर्व सामान्य माणूसच येतो. त्यामुळे कानाकोपऱ्यामध्ये ती आरोग्य केंद्र निघाली तर कोणी विरोध करायचे काही कारण नाही. आवश्यक असेल तर डॉक्टर साो. त्यांची संख्या वाढवा. पण ती संख्या वाढवते वेळी खरोखर तुमची क्षमता वाढली आहे का. तुमचा आत्मविश्वास बोलतोय का किंवा हे आरोग्य केंद्र आपण पुढच्या महिन्यात चालू केले तर ते आपल्याला उपयोगात पडेल. एकतर सफाईचे कामकाज आता जो २ महिन्याचा कालावधी आहे तो तुमचा रात्रदिवस काम करायचा कालावधी आहे. एक मिनिटांची तुम्हांला उसंत मिळणार नाही. आम्ही घाईघाईत तुम्हांला मंजुरी दिली आणि तुम्ही घाईघाईत एक नकाशा तयार करुन दाखवला आणि त्याचा एक अनुभव आहे कि ठाणे महानगरपालिकेने जेव्हा छत्रपती शिवाजीमहाराज हॉस्पिटल सुरु केले ४ वर्षे ते तसेच चालले होत. नंतर मेडिकल कॉलेज आल तेव्हा

ते हॉस्पिटल नीट चालायला लागले आपण आरोग्य केंद्रे उभी करतो टॅक्स वाढवून आपल्याकडे फार मोठी निधी जमा झाला असे जर आपण स्वप्नात चाललो तर त्याची अडचण ठरेल याची आजच आवश्यकता आहे कि उशीरा केला तरी चालेल मा. महापौर सो. आयुक्त सो. याचा तुम्ही नीट अंदाज घ्यावा. याला कोणी विरोध करायचा प्रश्न येणार नाही. इथे आपण कोटयावधी रुपयांना एका क्षणात मंजुरी देतो हि तर ५० लाखाची आहे. लोकांच्या आरोग्याचा, जीवीताचा प्रश्न आहे. चिंता फक्त एवढीच कि व्यवस्थेची नीट घडी बसली असेल तर त्याच्यावर विरोध करायचा प्रश्न नाही. आम्ही चिंता व्यक्त करतो कि या पिरीयड मध्ये आहे. नाहीतर मग उदघाटन म्हणून आपण इथे दवाखाना सुरु केला. तिथे दवाखाना सुरु केला आणि कार्यक्रम खानापुर्ती झाली असे केले तर ५० लाख रु. पाण्यात जातील असे मला वाटते. आपण योग्यवेळी मंजुरी जरी घेतली त्याचा निर्णय घेतेवेळी पुन्हापुन्हा तपासुन परिस्थिती पुन्हा पुन्हा ती व्यवस्था नीट होईल का नाहीतर मघाशी प्रभात मॅडमनी सांगितले कादाचित त्याच्या पक्षानी त्यांना साथ दिली नसेल. तो त्यांच्या पक्षाचा विषय आहे.

**उपमहापौर :-**

आज रोहिदास पाटलांचे कॉग्रेस पक्षाशी फार प्रेम झालेले दिसते. धन्यवाद आभारी आहोत.

**रोहिदास शं. पाटील :-**

जसे मधाशी सांगितले कि त्यांचा विषय चिंतेचा होता, आर्थिक बाबीचां होता, त्यापेक्षा कार्यक्षमतेचा विश्वास घेण्याचा विषय होता. जेव्हा आपण डेप्युटीशनवर घेतो. माझेही तुमच्याकडे पत्र आहे. माझाही आग्रह होता कि ज्यावेळी असा डेप्युटेशनवर येणारा कोणताही अधिकारी रिकामा हाताने येतो. जातेवेळी रिकामा जातो. ठेवून काही जात नाही. घेऊन काय जातो असे ही मला बोलायचे नाही. पण त्यांची नैतीक जबाबदारी जी आहे ती राहत नाही. आपला परमनंट स्टाफ राहण हयाचा अर्थ इथे डेप्युटीशनवर आल्यावर त्यांच्या विरुध्द बोलतोय असाही नाही पण अनुभव आपल्याला नक्की आहे. या महानगरपालिकेला डेप्युटेशनचा अनुभव नक्की आहे. कि जेव्हा आपण २० टक्के पेमेंट जास्त देतो. रिक्रुटमेंट केली तर आपले २० टक्के वाचतील आता गरज आहे त्या ठिकाणी जरुरीचे आहे पण आयुक्त म्हणून आणि महापालिकेचे धोरण म्हणून आपला परमनंट स्टाफ मिळणे जरुरीचे आहे. त्यांना कामा आत्मीयता नाही असाही मी आरोप करत नाही पण ते मुदतीवर असतात. जातेवेळी मघाशी सांगितले कि आम्हांला नकाशे मिळत नाहीत. पेपर मिळत नाहीत त्यांना काम केले पाहिजे मुदत पुरी करायची आहे. पगार तर मिळणार आहे. अशी भावनाझाली तर महापालिकेचे नुकसान होते पुन्हा एकदा सांगतोय आरोग्य खात्यामध्ये जेवढी रिक्रुटमेंट आपण तयार केलेली आहे. हे रिक्रुटमेंट आजच्या सभेने मंजुरी दिल्यावर उदया त्या रिक्रुटमेंटची सुरुवात होईल. तर ती सुरुवात झाली तर ती योजना पूर्ण कार्यान्वित होईल त्याच वेळी त्याचा विचार करावा. सभेने मंजुरी दयावी त्या ठिकाणी विरोधही करु नये असे मला वाटते. पुन्हा सभागृहाने ही तयारी केलेली आहे. आणि आपण करतो. सभागृहात याविषयी डॉक्टरांनी निवेदन करावे, नाही करावे त्याचा मी आग्रह धरत नाही. पण जी वास्तविकता आहे ती आपल्या समोर मांडलेली आहे. आयुक्त सो. त्याची दखल घ्यावी.

**प्रभात पाटील :-**

माझ्या ज्या भावना होत्या त्या कमीत कमी एका सदस्याला कळल्या.

**आसिफ शेख :-**

त्याच्या अगोदर मी तुम्हांला समर्थन दिलेले आहे. कॉग्रेस आणि राष्ट्रवादी बरोबर आहे ना. आणि रोहीदाजी पाटील यांनी जबाबदारी घेतलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहीदासजी पाटील यांनी दिलेला विषय वेगळा आहे. त्यांनी समर्थन केलेला विषय वेगळा होता आणि रोहिदास पाटलांनी केलेला विषय वेगळा आहे. म्हणून मी त्यांचे आभार मानते.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय सेल्स टॅक्स ऑफीस आपण जे कॅन्सल केले आणि आपले जे जुने ऑफिस आहे तिथे वॉचमन लोक आहेत त्यांना वापरायला देत आहोत तर त्या ऑफिसमध्ये ओपीडी करायचा ठराव आम्ही मागच्यावेळी सुचना केली होती तर ती सुचना त्या लोकांनी बाहेर काढून आपण त्यांचे काय घेऊन खालेले नाही त्यांची ती व्यवस्था बघतील आणि तिथे ओपीडी चालु करुन दोन खाटांचे प्रोविजन करावे अशी माझी सुचना आहे.

**प्रकरण क्र ५ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य केंद्र सुरु करणे व करार पध्दतीने वैद्यकिय कर्मचारी घेणे बाबत.**

**ठराव क्र.०५**

महानगरपालिका क्षेत्र, लोकसंख्या, लोकसंख्या वाढीचा वेग, महानगरपालिका हद्दीतील विविध विभागातील सामाजिक व आर्थिक स्थर आणि महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेऊन महानगरपालिका हद्दीतील वेगवेगळया विभागात एकूण सहा आरोग्य केंद्रे व एक फिरता दवाखाना सुरु करण्यासाठी प्रशासनाकडून प्रस्ताव सादर केलेला आहे. महानगरपालिका हद्दीतील सद्याची व भविष्यातील वाढती लोकसंख्या व उपलब्ध वैद्यकिय सुविधांचा विचार केल्यास महानगरपालिका हद्दीतील खालीलप्रमाणे एकूण सात आरोग्य केंद्रे व एक फिरता दवाखाना सुरु करण्यात यावा असे ही महासभा ठरवित आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | आरोग्य केंद्राची संख्या |
|---|---|---|
| १ | भाईंदर पूर्व | २ |
| २ | भाईंदर पश्चिम | २ |
| ३ | उत्तन | १ |
| ४ | मिरा रोड | १ |
| ५ | काशिमिरा | १ |

वरील आरोग्य केंद्रे सुरु करण्यासाठी खालील तपशिलाप्रमाणे वैद्यकिय, निमवैद्यकिय व अवैद्यकिय कर्मचारी वर्ग आवश्यक आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | वैद्यकिय अधिकारी | : | पद संख्या ८ |
| | शैक्षणिक पात्रता | : | मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.बी.बी.एस. पदवी महाराष्ट्र मेडीकल काऊंसिलची नोंदणी आवश्यक. |
| | अनुभव | : | शासकीय वा निमशासकीय सेवेतील वैद्यकिय अधिकारी म्हणून अनुभवास प्राधान्य. |
| | वय | : | ३५ वर्षे पर्यंत मागासवर्गीयांसाठी शासकीय नियमानुसार शिथीलसम |
| | वेतनश्रेणी | : | ८०००-२७५-१३५०० अधिक नियमानुसार व इतर अनुज्ञेय भत्ते |
| २) | परिचारिका /एन.एस.एम | : | पदसंख्या ८ |
| | शैक्षणिक पात्रता | : | शासनमान्य संस्थेतून जनरल नर्सिंग व मिडवाईफरी पदविका उत््तीर्ण. महाराष्ट्र नर्सिंग काऊंसिलची नोंदणी (आर.एन.आर. एम.) आवश्यक |
| | अनुभव | : | शासकीय/निमशासकीय / खाजगी संस्थेत परिचारिका/ एन.एम.म्हणून दोन वर्षाचा अनुभव |
| | वय | : | ३० वर्षे- मागासवर्गीयांसाठी शासकीय नियमानुसार शिथीलक्षम. |
| | वेतनश्रेणी | : | ५०००-१५०-८००० आर्थिक नियमानुसार इतर अनुज्ञेय भत्ते. |
| ३) | प्रस्ताविका /ए.एन.एम | : | एकूण पदे २१ |
| | शैक्षणिक पात्रता | : | शासनमान्य संस्थेतील ए.एन.एम. अभ्यासक्रम उत्तीर्ण. महाराष्ट्र नर्सिंग काऊंसिलची नोंदणी आवश्यक. |
| | अनुभव | : | शासकीय/निमशासकी संस्थेतील प्रस्ताविका/ए.एन.एम. म्हणून दोन वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | वय | : | ३० वर्षेपर्यंत |
| | वेतनश्रेणी | : | ४०००-१००-६००० व आर्थिक नियमानुसार इतर अनुज्ञेय भत्ते |
| ४) | फार्मासिस्ट कम लिपीक | : | पद संख्या ८ |

| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | : | १२ वी पास व शासनमान्य संस्थेतील फार्मासिस्ट मधील पदविका महाराष्ट्र फार्मसी काऊंसिलची नोंदणी आवश्यक. |
| अनुभव | : | शासकीय/निमशासकीय संस्थेतील अनुभवास प्राधान्य |
| वय | : | ३० वर्षे पर्यंत मागासवर्गीयासाठी नियमानुसार शिथिलक्षम |
| वेतन | : | ४५००-१२५-७००० व अधिक नियमानुसार इतर अनुज्ञेय भत्ते. |

५) शिपाई तथा सफाई कामगार पदसंख्या ८

| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | : | ९ वी पास |
| अनुभव | : | कमीतकमी २ वर्षे |
| वय | : | ३०वर्षे पर्यंत शासकीय नियमानुसार मागासवर्गीयांसाठी शिथीलक्षम. |
| वेतन | : | २५५०-५५-२६६०-६०-३२०० आर्थिक नियमानुसार इतर अनुज्ञेय भत्ते. |

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील आस्थापनेवर वरील पदे निर्माण करणेस ही महासभा मंजूरी देत आहे.

वरील पदांना महाराष्ट्र शासनाची मंजूरी आवश्यक असून शासनाची मंजूरी मिळेपर्यंत सदरची पदे खालील प्रमाणे ठोक पगारावर करार पध्दतीने करण्यात येऊन आरोग्य केंद्रे चालू करण्यात यावी असे ही महासभा ठरवित आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | मासिक रोक वेतन | संख्या | एकूण मासिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | रु.१०,०००/- | ८ | रु.८०,०००/- |
| २ | परिचारिका/एन.एम. | रु.४,५००/- | ८ | रु.३६,०००/- |
| ३ | प्रस्ताविका/ए.एन.एम | रु.३,०००/- | २१ | रु.६३,०००/- |
| ४ | फार्मासिस्ट कम लिपीक | रु.३,५००/- | | रु.२८,०००/- |

सदरच्या आरोग्य केंद्र व फिरत्या दवाखान्यासाठी फर्निचर, औषधे, साहित्य, उपकरणे, स्टेशनरी वैद्यकिय फर्निचर यासाठी अंदाजित रु.२५,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. त्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

आरोग्य केंद्र सुरु करण्यासाठी जागा शोधणे, इमारत बांधकाम करणे इ.साठी बराच कालावधी लागणार आहे. त्यासाठी संबंधित विभागातील महानगरपालिकेच्या इमारतीतील जागेत आवश्यक ती दुरुस्ती/फेरबदल करुन आरोग्य केंद्रे सुरु करण्यासाठी जवळ जवळ रु.१०,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. त्यास ही महासभा मंजूरी देत आहे. ज्याठिकाणी महानगरपालिकेच्या इमारती नाहीत अशाठिकाणी खाजगी संस्था अथवा जागा भाडयाने घेण्यात याव्यात असे ही महासभा ठरवित आहे.

**सूचक :- ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- चंद्रकांत वैती**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**(सचिवांनी विषय क्र.६ चे वाचन केले.)**

**आसिफ शेख :-**

मंजुर सन्मा. महापौर सो. याठिकाणी फक्त आरोग्याचे विषय पुर्ण करण्यात यावे.

**रीटा शाह :-**

मागून आसिफ शेख बोलतात ५,६,७ विषय घ्या आणि बाकीचे वगळून दया असे होत नाही. आरोग्याचे जसे विषय महत्वाचे आहेत. तसेच बाकीचे सुध्दा विषय महत्वाचे आहेत. घ्यायचे असतील तर सर्व विषय घ्या नाही घ्यायचे असेल तर पुढच्या मिटींगला घ्या असा निर्णय दया

**आसिफ शेख :-**

अहो मॅडम तसेच बोललो मी. जेवणाची सुट्टी दया किंवा उर्वरीत विषय पुढच्या सभेला घ्या असे माझे म्हणणे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सदर विषय आरोग्याच्या विषयाशी निगडीत आहेत सर्व विषय या मिटींगला संपवून टाका पुढच्या मिटींगला घ्यायची काही गरज नाही. आणि एवढा वेळ गेला त्यामध्ये आपले दोन विषय मंजुर झाले असते. तुम्ही सरळ वाचनाला सुरुवात करा.

**प्रकरण क्रमांक ०६ :- डंपींगग्राऊंडवरील कचरा सपाटीकरण करणेकामी सन २००३ - ०४ जे.सी.बी., पोकलन व ड्रोझर मशिन भाडयाने घेणेबाबत.**

**ठराव क्र. ०६ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील नागरी वसाहती, औद्योगिक वसाहती, भाजी मार्केट आदी मधून दररोज २६० टन कचरा निर्माण होतो. सदरचा कचरा महानगरपालिकेची तेरा वाहने (डंपर/टेम्पो) तसेच कंत्राटदारांची सात वाहने (डंपर/टेम्पो) असे एकूण वीस कचरा वाहतूक वाहनांमार्फत थेट पध्दतीने गोळा करुन डंपींग ग्राऊंड येथे टाकण्यात येतो. महानगरपालिकेच्या मालकीच्या जे.सी.बी. मशिन नादुरुस्त असल्याने अतिक्रमण नियंत्रण विभागास मंजुर झालेल्या दरातच आरोग्य विभागाकरिता जे.सी.बी./पोकलन मशीन उपलब्ध करुन डंपींग ग्राऊंडवरील कचरा सपाटीकरण करण्यात येत होता. सदर कंत्राटदारांच्या कामाची मुदत ३१ मार्च २००३ रोजी पूर्ण झालेली आहे. महानगरपालिकेच्या मालकीचे जे.सी.बी. मशिन दुरुस्तीची कार्यवाही वाहन विभागामार्फत सुरु आहे. या कामी बराच कालावधी लागणार आहे. दरम्यान काळात डंपींग ग्राऊंडवरील कचऱ्याचे सपाटीकरण करण्यांकरिता जे.सी.बी. / पोकलन मशिनची आवश्यकता आहे.

महानगरपालिकेच्या डंपींग ग्राऊंड खाडीलगत असल्यामुळे भरतीच्या वेळी डंपींग ग्राऊंडच्या ठिकाणी भरतीचे पाणी येऊन चिखल निर्माण होतो. त्यामुळे जे.सी.बी. मशिनद्वारे कचऱ्याचे सपाटीकरण करणे शक्य होत नाही. अशा वेळी चैन ड्रोझर व जे.सी.बी. / पोकलन मशिनचा वापर केल्यास डंपींग ग्राऊंडवरील कचरा वेळीच सपाटीकरण करणे शक्य होईल. याकामी सन २००३-०४ या आर्थिक वर्षाकरिता रु. १५ लक्ष एवढी तरतूद करण्यांत आली आहे. याकामी चैन ड्रोझर व जे.सी.बी. / पोकलन मशिनचे दर मंजूर करुन घेणे बाबत हि महासभा वित्तीय व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**(सचिव प्रकरण क्र. ७ चे वाचन केले)**

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण क्र. ७ मध्ये हॅन्डग्लोज ॲड केले पाहिजेत. गमबुट आणि मास्कच्यामध्ये ते ॲड करुन घ्या.

**रीटा शहा :-**

विषय क्र. ७ किटकनाशके औषधे खरेदी करणे विषयांतर्गत मला फक्त एवढेच सांगायचे आहे कि आपण हि सर्व औषधे मागवतो आणि डेंग्यु म्हणून एक मोहीम सुरु केली घरोघरी जाऊन औषध फवारणी करायचे तेव्हा पण मी आपल्या निर्दशनास आणून दिले होते वर बिल्डींगचे नाव लिहायचे व चाळीस फ्लॅटच्या सहया घ्यायच्या अशा पध्दतीने काहीच चाललेले नाही. दोन तीन लोकांच्या सहया घेतात. दोन तीन घरी जाऊन औषध टाकतात आणि ते चालू पडतात आणि आपण जेव्हा हे ठराव आमच्यासमोर आणता तेव्हा पॉपुलेशन आणि सर्व विचारात घेऊन तुम्ही औषधे मागवता. मग ही मोहीम सुरु असतानाच औषधे संपवतात. आणि ठेकेदार औषधे आणून देत नाही आणि एस आय लोंकांना विचारल्यावर सांगतात औषधे नाहीत म्हणून मोहिम बंद झालेली आहे. अश्याप्रकारे होत असेल तर ठराव आणायचा आणि मंजुर करायचा प्रश्न येत नाही आणि मिरा भाईंदर क्षेत्राचे भल होणार असे हि मला वाटत नाही कारण दहा पंधरा दिवस झाले नंतर सांगणार

आता औषधे संपली आहेत. आता औषधे आल्यांनतर आम्ही घरोघरी जाऊ असे परत निर्माण व्हायला नाही पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम जी औषध फवारणी होते. आपले कामगार जातात आयुक्त सो. तुम्हांला माझी विनंती आहे जे चोपडी सही करायला घेऊन जातात ती चोपडी मागवा तुम्ही. ती चौपडी आपण अजुनपर्यंत बघितली नसेल. एकही सफाई कामगार जो औषध फवारणी करतो तो मोदी पटेलला येतो आणि मग तो सरळ गावातील बिल्डींगची सही घेतोय. म्हणजे काही प्लानींगच नाही. त्याला कुठला वार्ड दिलेला आहे कुठले क्षेत्र दिलेले आहे. म्हणजे अशा पध्दतीने फवारणी केली तर महापालिकेचे लाखो रुपये खर्च झाले तरी त्याचा उपयोग होणार नाही. तुम्ही पुस्तके मागवा माझा आग्रह आह आपल्याला दोनचार पुस्तकामध्ये मी टीप लिहिलेली आहे. हे काय चाललेले आहे म्हणजे व्यवस्था काय आहे त्याच्यात.

**रीटा शहा :-**

हा विषय महत्वाचा आहे. लाखोरुपयांची औषधे मागवतो आपण ऑन द पेपर मग प्रॅक्टीकल तर काही येत नाही. ऑन द पेपर आपण ठराव मांडतो ऑन पेपर आपण औषधे मागवून घेतो मग खरोखर सामान आपल्याकडे उपलब्ध होत नाही काय ?

**डॉ. बावसकर :-**

यापुर्वी आपल्याकडे आवश्यक त्या प्रमाणात औषधे उपलब्ध नव्हती ज्यावेळेला डेंग्युफिवर बद्दल माहिती मिळाली . तातडीने थोडीशी औषधे मा. आयुक्तांच्या अधिकारामध्ये मागवली होती ती फवारण्यास सुरुवात केली आता निविदा मागवलेल्या आहेत. मा. महासभेची मंजुरी झाल्यानंतर निविदा उघडण्यात येतील. निविदा मंजुरी झाल्यानंतर प्रत्येक विभागामध्ये आवश्यक त्या प्रमाणामध्ये आपल्याला सर्व किटकनाशके, अळीनाशके आपल्याला उपलब्ध होऊ शकतील आणि जसे आज जे घडते कामगार कमी असल्यामुळे आपल्याला आवश्यकते प्रमाणे सर्व विभाग आपल्याला फवारणीसाठी कवर करता येत नाही. परंतु आजच्यामहासभेमध्ये मंजुरी मिळालेली आहे आणि यानुसार १५० कामगार जवळजवळ फवारणीसाठी उपलब्ध होणार आहेत त्यामुळे आपल्याला आवश्यकत्या प्रमाणामध्ये सर्व विभागामध्ये फवारणी करणे शक्य होईल आणि याचा रेकॉर्ड सुध्दा आपल्याला ठेवता येईल आपण केव्हावी हे रेकॉर्ड चेक करु शकता.

**रीटा शहा :-**

साहेब मी आपणासमोर सारखी उभे राहते कारण आम्हांला या सभागृहात या नगरपालिकेत दहा वर्ष झालेली आहेत. ऑन द पेपर सर्व होते लेबर येतात ऑन द पेपर, ऑन द पेपर किटकनाशके, औषधे येतात. सामान उपलब्ध होते पण ते सर्व ऑन द पेपर येते. प्रॅक्टीकली काहीच घडलेले नाही आणि म्हणून नेहमी नेहमी उठून मी संशय व्यक्त करते कारण पुढे महानगरपालिका झाल्यावर उपमहापौर सो. मागे सांगितले कि रॅकेट निर्माण झालेले आहेत आणि रॅकेट होत तसे ऑन द पेपर दिसतात लेबर ३००,४००,८००. पण वार्डात तर २-३ दिसतात. नेहमी विचारले तर सांगतात हजर आहे,गैरहजर आहे हे आहे ते आहे. कॉन्ट्रक्टरचे बहाणे काढतात आणि बिले बरोबर पास होतात त्यांची ४००-८०० कामगारांची यापुढे असे काय व्हायला नाही पाहिजे असे काही झाले नाही. कुठल्याही नगरसेवकांची कंप्लेंट असेल तर त्यांचे बील थांबवावे अशी माझी मागणी आहे.

**रमेश जैन :-**

किटक नाशके, अळी नाशके, डिसइनफेक्टंट इ. खरेदी के बारेंमे. मिरा भाईंदर क्षेत्र बहुत बडा है आजसे दससाल पहिले ग्रामपंचायत से नगरपालिका, नगरपालिकासे महानगरपालिका बनी उस समय जितने मच्छर नही थे, मलेरियाका प्रकोप नही था, उससे भी जादा मलेरिया का प्रकोप है उसका, कारण एक मात्र है रिस्टेट पैदा हो गया. खाली कर्मचारी कम होने के कारण नही है कॉलीटी ऑफ मेडिसन जो युज कर रहे है वो बिलकुल बेकार कर रहे है क्वालिटी ऑर क्कॉन्टीटी सुधारणी पडेगी. अगर क्वालिटी और क्वांटीटी नही सुधारेंगे मलेरिया कम होनेवाला नही है. जो क्वालिटी युज कर रहे है वो खाली ॲडल्ट को मारने की कर रहे है. जब तक ये लारवा और ओवाको मारनेकी दवाईया युज नही करेंगे तब तक मलेरिया हटनेवाला नही है ये मेरी सुचना है.

**मुझफ्फर हुसेन :-**

डॉ. बावसकर सन्मा सदस्य रमेश जैन यांनी विषय मांडलेला आहे कोणत्या प्रकारची औषधे तुम्ही वापरत आहात. त्याचे स्पष्टीकरण करावे.

**डॉ. बावसकर :-**

मा. महापौर महोदया महानगरपालिका हद्दीमध्ये डास नियंत्रन करण्यासाठी किंवा डांसावर नियंत्रण आणण्यासाठी डांस ज्याठिकाणी निर्माण होतात त्या ठिकाणी कार्यवाही करावी लागते. ते ठिकाण वेगवेगळे आहेत. काही डास स्वच्छ पाण्यामध्ये असतात तर काही डास प्रदुषित पाण्यामध्ये असतात गटारांच्या पाण्यामध्ये नाल्याच्या पाण्यामध्ये ज्या ठिकाणी फ्लो मेनटेन होत नाही अशा ठिकाणी मोठया प्रमाणात क्युलेक्स जातीचे डासाचे ब्रिडिंग होते. मोठया प्रमाणात पोलूटेड वॉटर ज्या ठिकाणी साचलेले आहे. अशा ठिकाणी मलेरिया एम.एल.ओ. जे आपण इंडियन ऑईल कॉर्पोरेशन कडुन खरेदी करतो व त्याचा वापर करतो .आपण तो वापर करणार आहोत. काही ठिकाणी नविन पध्दतीची किटकनाशक आलेली आहेत. उदा. वॅक्टोबॅक यामध्ये एक वॅक्टोबॅक एक कलचर सारख असत हे त्याठिकाणी टाकल्यानंतर मल्टीप्लाय होते आणि डासांची अंडी आणि लारवी असतात ती नष्ट होतात. ज्या ठिकाणी आपल्याला शक्य असेल तेथे बायोलॉजिकल मेथडस आपण वापरणार आहोत बायलोजिकल मेथड्रसमध्ये सर्वांत महत्वाचे म्हणजे गप्पी मासे, गप्पी माशांचा प्रयोग आम्ही मोठया प्रमाणात केलेला आहे आणि तो यशस्वी झाला आहे. ज्याठिकाणी ते शक्य होईल त्याठिकाणी आपण गप्पी माशांच ब्रिड जे शासकिय संस्थेमध्ये मोठया प्रमाणात उपलब्ध असते. त्याठिकाणी अळी नाशके किंवा किटक नाशकांचा वापर करावा लागणार आहे. अशा ठिकाणी आता नविन प्रकारची अळी नाशके उपलब्ध आहेत. पुर्वी बायटेक्स किंवा बेगॉन अशासारखी किटकनाशके किंवा अळीनाशके वापरली जायची ती पाहिजे तितकी प्रभावी नाहीत. जवळजवळ सर्वच नगरपालिका, महानगरपालिकेमध्ये हयाचा उपयोग कमी केलेला किंवा थांबवलेला आहे. जर अडल्टी साईड स्प्रे करायच असेल तर सोलफॅक, सॅफ्लोमेथरीन अशा प्रकारची औषधे आपण वापरणार आहोत आणि अळी नाशके म्हणून बऱ्याचशा ठिकाणी आपल्याला ॲबेट किंवा इतर अशाप्रकारच्या अळी नाशकांचा आपल्याला उपयोग करता येईल. हयांनतर आपण जी बंद गटारे आहेत किंवा झोपडपट्टीचा किंवा इमारतीचा कुठलाही विभाग आहे. संध्याकाळच्या वेळेला डांसाची घनता आपल्याला मुख्यतः दिसते. संध्याकाळी पाच ते सहा वाजे नंतर डास आपल्याला दिसायला लागतात. जे ॲडल्ड डास असतात त्यांचावर नियंत्रणासाठी बंद गटारामध्ये आपण हँड फोगींग मशीन कमी वजनाच पंधरा फोगींग मशीन आपण घेणार आहोत. प्रत्येक सॅनिटरी इन्सपेक्टरच्या विभागामध्ये दोन दोन फॉगींग मशीन देवून संध्याकाळी ६ ते ७ वाजेनंतर यांचे ऑपरेशन रात्री १२ वाजेपर्यंत करणार आहोत म्हणजे हे ॲडल्ड डास जे घरामध्ये व इतरत्र असतात त्यावर आपल्याला नियंत्रण आणता येईल. जी किटकनाशके/अळीनाशके मागविली जाणार आहेत. ती ३ ते ४ हफ्त्यामध्ये आपण मागवणार आहोत.

**रिटा शाह :-**

बोर्डावर लिहा, आणि आयकार्ड दया, कारण महिलांना ते माहितच नाही की घरोघरी ते अशी औषध घेवून येतात आणि फवारणी करतात. पहिल्यांदाच आपल्याकडे असा कार्यक्रम राबवायला चालू झालेला आहे. काही महिला तर कर्मचारी दुपारच्या वेळेला गेले तर दरवाजाच उघडत नाहीत. आणि नाही सांगून देतात. हे विचारात घेवून केबल वर जाहिरात दया, काहितरी करा पण अस काही तरी करुन ते लोकांना कळू दया.

**डॉ. रमेश जैन :-**

महानगरपालिकावाले ज्या प्रकारे मेडीसीन स्प्रे करतात त्याचप्रमाणे काही लोक पैसे घेवून हेपॉटायटीसचे इजेक्शन देऊन कलेक्शन करतात. आणि ते अजूनही चालू आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हि गंभीर बाब आहे प्रायव्हेट कुठली तरी संस्था आहे , आणि ते हॅण्डबील काढतात आणि तीन डोस तीनशे रुपयांत आणि वर संस्थेचे नाव लिहीतात महानगरपालिका. अशा पत्राने लोक कंन्फ्युझन होतात. आपल्या वेस्टच्या विनायक समाजमंदिरात हा कार्यक्रम झालेला आहे. म्हणजे लोकांची दिशाभुल होते आहे. असे प्रायव्हेट लोक असतील आणि अनुभवी नसतील , कुठलही इंजेक्शन मारुन ते हेपॉटायटीसचे देतोय , याची दखल धेतली पाहिजे महानगरपालिकेने.

**डॉ. रमेश जैन :-**

आपल्या समाजमंदिरात जो कार्यक्रम झालेला आहे ..

**डॉ. बावसकर :-**

मा. महापौर महोदया महापालिकेने असल्या कुठल्याही संस्थेस अथवा कंपनीस अशी परवानगी दिलेली नाही आहे. जर अशी तक्रार असेल तर ताबडतोब त्यावर कारवाई करु.

**उपमहापौर :-**

विषय क्र. ७ सर्वानुमते मंजूर.

**प्रभारी सचिव :-**

यावर ठराव आलेला आहे सुचक आहेत ध्रुवकिशोर पाटील व अनुमोदक आहे चंद्रकांत वैती आहेत.

**प्रकरण क्र. ७ :- किटकनाशके, अळीनाशके, दुर्गधीनाशके, डिसइनफेक्टंट इ. खरेदी करणेबाबत.**

**ठराव क्र.०७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र ७९.४० चौ.की.मी. आहे. ६४.९० कि.मी.लांबीची पक्की गटारे असून १४.५० कि.मी. लांबीची कच्ची गटारे आहेत. महानगरपालिका क्षेत्रात चार मासळी मार्केट, तीन भाजी मार्केट आहेत. महानगरपालिका क्षेत्र हे खाडीलगत असल्याने पावसाळयानंतर मोठया प्रमाणात सखल भागात पाणी साचून राहते. हया पाण्यामुळे डासांची मोठया प्रमाणावर पैदास होते. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सध्या मोठया प्रमाणात डबकी ओपन प्लॉट तसेच विकास कर्त्यांचे रिकामे भुखंड असल्यामुळे त्या ठिकाणी पाणी साचून राहते. परिणामी त्या भागात डास उत्पत्ती होण्यास पोषक वातावरण तयार होते.

सदर डबक्यांवर व मोकळया जागेत साचलेल्या पाण्यावर डास, अळीनाशके फवारणी करणे गरजेचे आहे. सदर कामी डासनाशके, अळीनाशके, जंतुनाशके मोठया प्रमाणावर गरज लागणार आहे. आरोग्य विभागात सध्या जंतुनाशक फवारणी करणे कामी ४६ कामगार आहेत. पुढील आर्थिक वर्षात आरोग्य विभागात साफसफाई कामे प्रभाग निहाय खाजगीकरण करण्यात येणार आहेत. तसेच पुढील आर्थिक वर्षापासून महानगरपालिकेमार्फत जंतूनाशक फवारणी करणे कामी १५० कामगारांची नेमणूक करावयाची आहे. हया कामगारांना नविन स्प्रे पंप ६० नग व धुरीकरण करण्यासाठी हॅन्ड फॉग मशीन १५ नग आवश्यकता आहे.

याकामी डास नाशक, जंतूनाशकांची ही मोठया प्रमाणावर आवश्यकता आहे. तसेच डासांचा उपद्रव कमी करणेकरीता जैविक पध्दतीने नियंत्रण आणण्यासाठी गप्पी मासे व व्हेक्टो बॅक हयांची ही गरज जागणार आहे. डंपींग ग्राऊंडवर तसेच भाजी मार्केट, मासळी मार्केट येथे दुर्गंधी नाशक म्हणून ए.एफ.एम. लिक्वीडची गरज आहे. सार्वजनिक ठिकाणी रिक्षा स्टॅंड, एस.टी. स्टॅंड, ओपन प्लॉट आदी ठिकाणी फवारणी करणेकरिता जंतूनाशक पावडरची आविश्यकता आहे. आरोग्य विभागात सन २००३-०४ या वर्षाकरिता लागणाऱ्या जंतुनाशकाची तसेच फवारणी करणेकामी कामकाजाच्या कामगारांना फवारणी नंतर हात धुणे करिता साबण, औषध फवारणी करतेवेळी वापरावयाचे मास्क, गमबुट देणे आवश्यक आहे. याकामी सन २००३-०४ वे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात किटकनाशके, अळीनाशके खरेदी करणेकामी रु.७० लक्ष एवढी तरतूद केलेली आहे.

तरी महानगरपालिका हद्दीत डास नियंत्रणासाठी किटकनाशके, अळीनाशके, इत्यादी खरेदी करणेस हि महासभा प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**उपमहापौर :-**

विषय क्रमांक ८ घ्यावा.

**(प्रभारी सचिवांनी विषय क्र.८ चे वाचन केले)**

**आसिफ शेख :-**

विषय क्रमांक आठ संदर्भात मिरा भाईंदर परिसरातील नागरीकांच्या हिताच्या दृष्टीकोनातून भाईंदर पश्चिमेला ज्या प्रमाणे चौहाण साहेबांनी चौपाटी प्रस्तावित करण्याची मागणी केलेली आहे. त्याचप्रमाणे शहरवासियांना नाटयगृह संदर्भात आपण भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविलेला आहे. त्याचप्रमाणे आपला जिल्हा परिषदेचा जो रस्ता आहे भाईंदर पोलिस स्टेशनपासून उत्तन पर्यंत तो रस्ता हस्तांतरण करण्याच्या संदर्भातला प्रस्ताव पेंडींग आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र जी

आहेत जिल्हा परिषदेची ती अजून हस्तांतरीत  झालेली नाहीत. तर असे संपूर्ण प्रस्ताव एकत्र करुन कब्रस्तानाचा एक विषय आमच्या भाईंदर पश्चिमेचा आहे मागील सभेत जो होता तो या सभेत आलेला नाही आहे. तसे सर्व प्रस्ताव सर्व एकत्रित करुन हा विषय पूढील सभेत ठेवण्यात यावा असा मी याठिकाणी ठराव मांडीत आहे.

**नितीन ठाकुर :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

या ठरावाला विरोध आहे. कारण जी कब्रस्तानाची गोष्ट केलेली आहे अनेक सोसायटयांची हरकत आहे. आणि प्रत्येक रिझर्वेशन बदलताना हे निरनिराळे प्रश्न आहेत . हा जो कॉलेजचा आहे हा प्रायोरिटीमध्ये आपण पास करावा कारण भाईंदर पश्चिमेला एकही कॉलेज नाही आहे. जो विषय ठेवलेला आहे त्या ठरावाला माझ स्वतःच अनुमोदन आहे. आणि हा विषय जो एकत्र क्लब केला जातोय तर याच्यामध्ये सभागृहाला कंन्फ्युज केल जातंय. निरनिराळे विषय याला जोडू नका मेहरबानी करुन. सगळे विषय घ्या सर्वांना मंजूरी घ्या पण कॉलेज सारख्या चांगल्या कामाला तुम्ही विरोध करुन नका. हा विषय आणलेला आहे त्याला माझ तरी अनुमोदन राहणार आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे सभागृहाची दिशाभुळ करीत आहेत.  आम्ही सांगितले विरोध नाही तर संपूर्ण विषय एकत्र घ्या व एकत्र मंजूरी घेवून टाका. गावाचा विकास करायला पाहिजे. शहरातील नागरीकांना चांगल ....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही नाही स्थायी समितीने ज्या ठरावाला मंजुरी दिलेली आहे तो ठराव इथे आलेला आहे. या शहराचा शैक्षणिक दर्जा वाढवावा अशा पध्दतीचा ठराव आलेला आहे. आणि त्याला तुम्ही कब्रस्थाना सोबत जोडतात हे बरोबर नाही आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी कब्रस्थानाचा विषय नाही या ठिकाणी .

**मिलन पाटील :-**

महापौर मॅडम १८ ते २० वर्षे झाली ही संस्था येथे कार्यरत आहे. आणि या संस्थमध्ये चांगले चांगले विद्यार्थी पास होतात. आपल्या या ठरावाद्वारे आपला एकही पैसा लागत नाही. किंवा खर्ची पण होत नाही. तर आपले काही नुकसान न होता एक चांगले कॉलेज वेस्टमध्ये होत आहे. आणि या चांगल्या कामाकरिता मी ठराव पाठविलेला आहे. हा ठराव मंजुरीस घ्यावा अशी माझी नम्र विनंती आहे.

**आसिफ शेख :-**

आमचाकुठे विरोध आहे

**उपमहापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर .

**आसिफ शेख :-**

उम महापौर साहेब आपण कस रुलिंग देताय.

**उप महापौर :-**

ठिक आहे तुमचा विरोध नोंद करण्यात येईल.

**आसिफ शेख :-**

आम्ही विरोध केलाच नाही ना या ठिकाणी. उप महापौर साहेब मा. महापौर असताना आपण रुलिंग कस देताय. सभागृहाचा कामकाज काय आहे या ठिकाणी . ठराव आम्ही मांडलेला आहे आणि अनुमोदन नितीन ठाकुर यांनी दिलेल आहे. दोन ठराव या ठिकाणी आलेले आहेत.

**नितीन ठाकुर :-**

महापौर साहेब सर्व विषय एकत्र घेण्यात यावेत.

**रिटा शाह :-**

महापौर मॅडम आपण हे स्पष्ट करा की हा ठराव मान्य केलेला आहे किंवा नाही.

**आसिफ शेख :-**

नाही मान्य करु शकत नाही.

**महापौर :-**

ठराव पास झालेला आहे.

**रिटा शाह :-**

यांनी मांडलेला ठराव मान्य झालेला आहे की नाही झालेला.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम याच्यावर रुलिंग काय आहे.

**महापौर :-**

आलेल्या विषयाचा ठराव  मान्य केलेला आहे.

**प्रकरण क्र.०८ :- विकास आराखडयातील आरक्षण क्र.७१ शाळा कॉलेज विस्तार या आरक्षणातील जागेचे भूसंपादन करण्यास मंजूरी देणे.**

**ठराव क्र.०८**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना दि.१४.५.९७ रोजी मंजूर झाली असून मंजूर विकास योजनेत मौजे भाईंदर स.क्र.३६५ (नविन) ५ (जुना) हि.क्र.२ पै.स.नं.२६७ (नविन) ६ (जुना) हि.क्र.२ पै. (सि.स.नं.१३६९ पै. १४२८) या जागेत आरक्षण क्र. ७१ जागा क्षेत्र ०.६६ (हे) हे भाईंदर केळवणी मंडळाच्या जे. एच. पोद्यार शाळा विस्तारांसाठी आरक्षित ठेवण्यांत आले आहे.

भाईंदर केळवणी मंडळी संचालित जे.एच.पोद्यार शाळा ही गेल्या १८ / २० वर्षापासून शहरांत शैक्षणिक कार्य करित आहे. ही संस्था शहरांतील शिक्षणाची गरज भागवित आहे. वाढत्या लोकवस्तीमुळे शहराची वाढती शैक्षणिक गरज आपल्या अपुऱ्या जागेमुळे भागविणे संस्थेला अडचणीचे होत आहे. शहराची वाढती शैक्षणिक गरज विचारात घेता जे. एच. पोद्यार शाळा विस्तारासाठी आरक्षित ठेवण्यात आलेली वर नमुद केलेली जागा भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम १७ अन्वये **तातडीचे कलमाखाली** भुसंपादन करणेस मा.जिल्हाधिकारी सो., ठाणे यांना ही सभा विनंती करीत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील** **अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**रोहित सुवर्णा :-**

महापौर मॅडम सन्मा. सदस्य श्री. प्रकाश पांडुरंग ठाकुर हे आज या सभागृहामध्ये उपस्थित नाही आहेत. राष्ट्रगीत जेव्हा झाले तेव्हा ते उपस्थित नव्हते. पण रजिस्टरवर त्यांची सही आहे. आपण पहिल्या दिवशी बोललो होतो की ही पध्दत चालणार नाही. प्रत्येक नगरसेवकांनी येथे येवून सही करायची आहे.  प्रकाश ठाकुरच्या बाजूला कुठला नगरसेवक बसला होता त्यांनी सांगाव.

**ज्युडी डीसोझा :-**

आले होते. खुर्चीवर बसले होते.

**रोहित सुवर्णा :-**

कुठे बसले होते सांगा ना  आम्ही वॉच करतो त्यांच्यावर.

**याकुब कुरेशी :-**

खुर्चीला नंबर दिलेला आहे का सांगायला कुठल्या खुर्चीवर बसले होते.

**रोहित सुवर्णा :-**

महापौर मॅडम आपण त्यांना बघितलत का ?

**याकुब कुरेशी :-**

आम्ही बघितल आहे.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही नाही बघितले, महापौर मॅडम आपण बघितले का ?

**आसिफ शेख :-**

या ठिकाणी आपल्या सहयोगी नगरसेविका सन्मा. संगीता विजय म्हात्रे यांचे भाऊ संजय राऊत यांच दि. २/४/२००३ रोजी दुःखद निधन झालेल आहे. त्याबद्यल ही सभा शोक प्रस्ताव मांडीत आहे. आणि मृतात्म्यांस चिरशांती लाभो, व त्यांच्या परिवारास हे दुःख सहन करण्याची ईश्वर त्यांना शक्ति देवो असा या ठिकाणी मी ठराव मांडीत आहे.

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नयना म्हात्रे यांच्या आजी श्रीम. विठाबाई यांचसुध्दा निधन एक आठवडयापूर्वी झालं त्यांचा सुध्दा शोक प्रस्ताव या सभापूढे मी मांडीत आहे.

**दुःखवठा ठराव क्र. ०९ :-**

सन्मा. नगरसेविका संगीता विजय म्हात्रे यांचे भाऊ संजय राऊत यांचे दि. २/४/२००३ रोजी दुःखद निधन झाले. त्याचप्रमाणे सन्मा.नगरसेविका नयना म्हात्रे यांच्या आजी श्रीम. विठाबाई यांचे सुध्दा निधन झालेले आहे. त्यांच्या मृतात्म्यांस चिरशांती लाभो व त्यांच्या परिवारास हे दुःख सहन करण्याची ईश्वर त्यांना शक्ति देवो. हे सभागृह त्यांच्या दुःखात सहभागी आहे.

**सुचक :- आसिफ शेख** **अनुमोदन :- मिलन पाटील**
**मिलन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**प्रभारी सचिव :-**

सर्वांनी श्रध्दांजलीसाठी दोन मिनिटे जागेवर उभे रहावयाचे आहे.

**जयंत पाटील :-**

अहो साहेब हा शोक प्रस्ताव मांडलेला आहे शोक सभा नाही आहे. शोक सभेमध्ये राष्ट्रगीत होत नाही , शोक प्रस्ताव मांडलेला आहे. शोक प्रस्ताव आणि शोक सभा हया दोन्ही निरनिराळया गोष्टी आहेत.

**महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा.उपआयुक्त, मा. प्रभारी सचिव, अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधु आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**प्रभारी सचिव :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतोय सभेचे कामकाज संपलेले आहे.

**सभा संपल्याची वेळ**
**संध्या. ४.२० वाजता**

**महापौर,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभारी सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**